



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार १३ जून २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## हवामानाच्या संकटाला तोंड देण्यासाठी सज्ज रहा-पंतप्रधान



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**प्रशांत महासागरात निर्माण होत असलेल्या अल निनोच्या परिस्थितीमुळे मोठे संकट उद्भवण्याचा अंदाज व्यक्तकेला जात आहे. जगभरातील हवामान संशोधन संस्थांनी याबद्दलची अंदाज मांडले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अल निनोच्या परिस्थितीमुळे उद्भवणा-या संकटांकडे लक्ष वेधले. राज्यांनी जलसंधारणासाठी अधिक प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. त्याचबरोबर नीती आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिल बैठकीदरम्यान हवामानाशी संबंधित संकटांना तोंड देण्यासाठी देशाने एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाच्या ११वी गव्हर्निंग कौन्सिल बैठक पार पडली. सर्व २८ राज्ये आणि ५ केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधी याला उपस्थित होते. या बैठकीत पंतप्रधान मोदी यांनी संभाव्य हवामान संकटांकडे लक्ष वेधले. हवामानातील बदलांमुळे शेती, जलसाठे आणि उपजीविकेसमोर मोठी आव्हाने उभी राहू शकतात; त्यामुळे पूर्वतयारी आणि संसाधनांचे दीर्घकालीन नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत पंतप्रधान मोदी यांनी मांडले. सरकारच्या निवेदनानुसार, पंतप्रधानांनी विशेषतः एल निनो ⇨(पान २ वर)

## शेतीसाठी कॅन, बॅरलमध्ये डिझेल मिळण्याबाबत गोंधळाची स्थिती

### ◆ ऐन पेरणी हंगामात इंधन टंचाई ◆

**मुंबई :** केंद्र सरकारने एका दिवसात एका व्यक्तीला, एका वाहनासाठी जास्तीत जास्त २०० लिटर पेट्रोल, डिझेल विक्री करण्याचे आदेश दिले आहेत. वाहनांशिवाय पेसोने मान्यता दिलेल्या कंटेनरमध्येच इंधन देण्याचे आदेश दिले आहेत. पण, बाजारात पेसो मान्यता प्राप्त कंटेनर उपलब्ध नसल्यामुळे शेतक-यांना ट्रॅक्टरसह अन्य शेती यंत्रांसाठी कॅनमध्ये डिझेल मिळणार की, नाही, या बाबत गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर खनिज तेलाचे उत्पादन, वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. टंचाईची स्थिती असल्यामुळे किरकोळ विक्रीसाठीच्या पेट्रोल, डिझेलचा वापर उद्योग, व्यावसायिक संस्थांकडून केला जात असल्यामुळे अनेक ठिकाणी सरासरीपेक्षा जास्त इंधनाची विक्री होताना दिसत आहे. त्यामुळे केंद्र सरकारने पेट्रोल, डिझेलचा काळाबाजार, साठेबाजी, गैरवापर रोखण्यासाठी एका दिवसात एका व्यक्तीला, एका वाहनासाठी जास्तीत जास्त २०० लिटर पेट्रोल, डिझेल विक्री करण्याचे आदेश दिले आहेत. वाहनांशिवाय पेट्रोलियम, ज्वलनशील पदार्थ सुरक्षा संघटनेने (पेसो) मान्यता दिलेल्या कॅन, कंटेनरमध्येच इंधन देण्याचे आदेश दिले आहेत. पण, बाजारात पेसो मान्यता प्राप्त कॅन, कंटेनर उपलब्ध नसल्यामुळे शेतक-यांना ट्रॅक्टरसह अन्य शेती यंत्रांसाठी कॅनमध्ये डिझेल मिळणार की, नाही, या बाबत गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे.



**पेट्रोल पंप चालकांची कोंडी-**राज्यात शेतक-यांना डिझेल मिळत नसल्याच्या तक्रारी आल्यानंतर राज्य सरकारने ⇨(पान २ वर)

# ग्राहकाला 200 लिटरपेक्षा जास्त डिझेल नाही

## व्यावसायिक वापरकर्त्याला रिटेल पेट्रोल पंपावरून इंधन खरेदी करता येणार नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सामान्य ग्राहक एका दिवसात जास्तीत जास्त २०० लीटर डिझेलच खरेदी करू शकतील. हे डिझेल पुन्हा विकण्यावर पूर्णपणे बंदी असेल. याशिवाय, आता कारखाने आणि व्यावसायिक वापरकर्त्यांना किरकोळ विक्री केंद्रातून इंधन मिळणार नाही. केंद्र सरकारने ११ जून २०२६ रोजी याबाबत आदेश जारी केला आहे. आता या मोठ्या ग्राहकांना केवळ मोठ्या प्रमाणात विक्री करणा-या ठिकाणांहूनच इंधन खरेदी करावे लागेल.

देशाच्या काही भागांमध्ये किरकोळ पंपांवर अचानक वाढलेली असामान्य विक्री लक्षात घेउन सरकारने हे पाउल उचलले आहे. ही बंदी सुरु वातीला ९० दिवसांसाठी लागू करण्यात आली आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, या निर्णयामुळे सामान्य ग्राहकांसाठी इंधनाची कमतरता भासणार नाही. पेट्रोलियम मंत्रालयाने 'मोटर स्पिरिट अँड हाय स्पीड डिझेल (टेम्पररी




रेग्युलेशन ऑफ सप्लाय थ्रु रिटेल आउटलेट्स) ऑर्डर, २०२६' जारी केला आहे. यानुसार, आता कोणतीही फॅक्टरी, व्यावसायिक संस्था किंवा मोठ्या संस्था सामान्य गाड्यांसाठी असलेल्या पेट्रोल पंपावरून डिझेल-पेट्रोल खरेदी करू शकणार नाहीत. त्यांना त्यांच्या स्वतःच्या ग्राहक पंपावरून किंवा निश्चित केलेल्या बल्क सप्लाय चॅनेलद्वारेच तेल घ्यावे लागेल.

नवीन आदेशानुसार, रिटेल पंपांवर डिझेलची विक्री आता केवळ वाहनांच्या इंधन टाकीत किंवा पेट्रोलियम अँड एक्सप्लोसिव्ह सेफटी ऑर्गनायझेशन (PESO) द्वारे मंजूर केलेल्या कंटेनरमध्येच केली जाईल. याव्यतिरिक्त, कोणताही ग्राहक किंवा वाहन एका दिवसात जास्तीत जास्त २०० लिटर डिझेल खरेदी करू शकेल. या डिझेलची पुन्हा विक्री करण्यावर पूर्णपणे बंदी असेल. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, देशाच्या काही भागांमध्ये किरकोळ पेट्रोल पंपांवर पेट्रोल आणि डिझेलची विक्री अचानक खूप वाढली होती. तपासात असे समोर आले की किरकोळ आणि घाउक किमतींमध्ये मोठा फरक असल्यामुळे कारखाने आणि व्यावसायिक वापरकर्त्यांनी घाउक तेल मागवणे बंद केले आणि ते थेट सामान्य पेट्रोल पंपांवरून गाड्या पाठवून तेल खरेदी करू लागले. यामुळे सामान्य जनतेसाठी तेलाच्या तुटवड्याचा धोका निर्माण होत होता. दिल्लीच्या उदाहरणावरून समजून घ्यायचे झाल्यास, किरकोळ पंपांवर डिझेलची किंमत ९५.२० प्रति लिटर आहे, तर घाउक डिझेल खरेदी करणा-या उद्योगांना तेच डिझेल १३४.५० प्रति लिटरने मिळत आहे. म्हणजेच दोन्ही किमतींमध्ये सुमारे ३९.३० प्रति लिटरचा थेट फरक आला होता. या मोठ्या फरकामुळे मोठे खरेदीदार किरकोळ पंपांकडे वळत होते.

## महिला व ज्येष्ठ नागरिकांना एनसीएमसी स्मार्ट कार्ड बंधनकारक

**मुंबई :** राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता आणि डिजिटल व्यवहारांना चालना देण्यासाठी १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक प्रवाशांसाठी एनसीएमसी (नॅशनल कामन मोबिलिटी कार्ड) स्मार्ट कार्ड बंधनकारक करण्यात येणार आहे. या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर एनसीएमसी स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला वेग आला आहे. आतापर्यंत राज्यातील सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी सुमारे २५ लाख स्मार्ट कार्ड कार्यान्वित करण्यात आले आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्डही लवकरच सुरू करण्यात येत असल्याने लाभार्थ्यांनी विलंब न करता आपली प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी आणि कार्ड वितरण प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी राज्यभरात ४ हजारांहून अधिक एनसीएमसी स्मार्ट कार्ड वितरण केंद्रे कार्यरत आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील नागरिकांना सहजपणे कार्ड उपलब्ध व्हावे यासाठी ही केंद्रे सक्रियपणे सेवा देत आहेत. विहित शुल्कापेक्षा अधिक रक्कम आकारून स्मार्ट कार्डची विक्री करणा-या वितरण केंद्रांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा केंद्रांचा वितरण परवाना तत्काळ रद्द करण्यात येईल.



## जीडीपीच्या आकड्यांत गडबड-रघुराम राजन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**देशाच्या अर्थव्यवस्थेने सरलेल्या २०२५-२६ आर्थिक वर्षामध्ये अपेक्षेपेक्षा सरस ७.७ टक्के दराने वाढ साधणारी कामगिरी नोंदवल्याचे शुक्रवारी जाहीर अधिकृत आकडेवारीने स्पष्ट केले. त्याआधीच्या म्हणजेच आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये देशाची अर्थव्यवस्था ७.१ टक्के दराने वाढली होती. मोदी सरकारच्या वतीने करण्यात आलेल्या या दाव्यावर मात्र भारतीय रिझर्व्ह बँकेचे (आरबीआय) माजी गव्हर्नर रघुराम राजन यांनी शंका उपस्थित केली आहे. त्यांनी भारताच्या आर्थिक विकासाच्या चित्रावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

रघुराम राजन यांनी मुलाखतीमध्ये राजन यांनी आकसलेली कॉर्पोरेट गुंतवणूक आणि आटलेली परकीय गुंतवणूक यांचा मेळ घालणे अवघड असल्याचे म्हटले. ते म्हणाले, अर्थव्यवस्थेत काहीतरी गडबड आहे. बातम्यात दिसणारी विकासदरासंबंधीची आकडेवारी आणि गुंतवणुकीसंबंधीची माहिती यात काहीतरी विसंगती आहे. रघुराम राजन म्हणाले, मला समजत नाही, जर अर्थव्यवस्था खरोखरच ७ टक्क्यांनी वाढत असेल तर देशातील उद्योगांची गुंतवणूकही वाढायला हवी. पण तसे होताना दिसत नाही. त्यामुळे नक्कीच काहीतरी गडबड आहे. गेल्या १० वर्षांपासून कंपन्यांची गुंतवणूक वाढत नाही आहे. ही खूप आश्चर्याची गोष्ट आहे याचा अर्थ असा शकतो की, आपला विकासदर आकड्यांमध्ये जेवढा जास्त दिसतोय, तेवढा तो प्रत्यक्षात नाही, असेही ते म्हणाले.



**जीडीपीच्या आकड्यांवर प्रश्नचिन्ह-**जीडीपी संदर्भात दिलेल्या आकडेवारीवर तुमचा विश्वास आहे का? असा प्रश्न मुलाखतीत विचारला असता रघुराम राजन म्हणाले, व्यवसायिकांच्या वर्तनावरून दिसते की, हे आकडे प्रत्यक्ष आर्थिक वास्तवाचे प्रतिबिंब दाखवत नसावेत. उद्योजक गुंतवणूक करत नाहीत, यावरून असे दिसते की, ते जीडीपीच्या वाढीच्या आकड्यांशी सुसंगत मागणी त्यांना दिसत नाही.

**एआय चे धोके-**कृत्रिम बुद्धिमत्तेबद्दलच्या (एआय) जागतिक उत्साहामुळे मोठ्या आर्थिक आणि राजकीय धोक्यांकडे दुर्लक्ष होत आहे, असे रघुराम राजन काही दिवसांपूर्वी म्हणाले होते. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ असलेल्या रघुराम राजन यांनी थेट परकीय गुंतवणुकीतील घट आणि कमकुवत झालेल्या भांडवली ओघाकडे बोट दाखवले. ते म्हणाले, देशातील आणि विदेशातील गुंतवणूकदार नवीन गुंतवणूक करण्यास फारसे उत्सुक दिसलेले ⇨(पान २ वर)

## बँकांमधील ठेवी घटल्याने बँका संकटात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**उद्योग, कंपन्या आणि अन्य क्षेत्रांकडून कर्ज घेण्याचे प्रमाण वाढत असताना बँकांमधील ठेवींमध्ये घट झाली आहे. त्यामुळे बँकिंग व्यवस्थेतील निधीवरील ताण वाढला असून कर्ज आणि ठेवी यांच्यातील तफावत अवघ्या दोन महिन्यांत ३.८ लाख कोटी रु पयांवर पोहोचली आहे.

३१ मे २०२६ रोजी संपलेल्या पंधरवड्यात बँकांच्या कर्जवाढीचा दर १७.७ टक्क्यांवर पोहोचला. चालू आर्थिक वर्षातील हा आतापर्यंतचा सर्वोच्च दर असून जून २०२४ नंतरची ही सर्वाधिक वार्षिक वाढ आहे. ३१ मार्च २०२६ पासून बँकांनी दिलेल्या कर्जात १.५ लाख कोटी रु पयांची वाढ झाली असून देशातील एकूण कर्जरक्कम २१५.२ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. बँकिंग क्षेत्रातील सूत्रांच्या मते, कच्च्या तेलाच्या किमती वाढल्यामुळे तेल विपणन कंपन्यांच्या कर्जाच्या गरजा वाढल्या आहेत. तसेच केंद्र सरकारच्या आपत्कालीन कर्ज हमी योजनेमुळेही कर्ज घेण्याचे प्रमाण वाढले आहे. दुसरीकडे ठेवींच्या बाबतीत उलट चित्र आहे. ३१ मार्च ते ३१ मे या कालावधीत बँकांमधील एकूण ठेवी २.३ लाख कोटी रु पयांनी घटल्या आहेत. त्यामुळे देशातील एकूण ठेवी २६० लाख कोटी रु पयांवर आल्या आहेत. कर्जवाढ आणि ठेवींमधील घट यामुळे बँकिंग व्यवस्थेत ३.८ लाख कोटी रुपयांची तफावत निर्माण झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात मात्र ठेवींमध्ये ३६.५ लाख कोटी रुपयांची वाढ झाली होती तर, कर्जवाटप ३१.१ लाख कोटी रु पयांनी वाढले होते. तज्ज्ञांच्या मते, ठेवींची वाढ तुलनेने मंद राहिली असून ३१ मे २०२६ रोजी ठेवींचा वाढीचा दर १२.२ टक्के होता. हा दर कर्जवाढीच्या तुलनेत ५०० बेसिस पाइंट्सनी कमी आहे.




**कर्ज-ठेव गुणोत्तरावर परिणाम-**या परिस्थितीचा परिणाम कर्ज-ठेव गुणोत्तरावर (क्रेडिट-डिपाझिट रेशोवर) झाला आहे. ऑक्टोबर २०२५ पासून हे गुणोत्तर ८० टक्क्यांपेक्षा जास्त राहिले असून मे २०२६ अखेरीस ते ८२.८ टक्क्यांवर पोहोचले आहे. म्हणजेच बँकांकडे जमा होणा-या प्रत्येक १०० रु पयांच्या ठेवीमागे सुमारे ८३ रुपये कर्ज म्हणून वितरित केले जात आहेत.

**रोख्यांमधील गुंतवणूक कमी-**वाढत्या कर्ज ⇨(पान २ वर)


## मुंबई विमानतळावर 11.82 कोटींचा गांजा जप्त

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सीमाशुल्क विभागाने अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात मोठी कारवाई केली. या कारवाईत ११.८२ कोटी रु पयांचा हायड्रोपोनिक गांजा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी बँकाकहून आलेल्या एका महिला प्रवाशाला अटक करण्यात आली आहे.सीमाशुल्क विभागाच्या नियमित तपासणीदरम्यान बँकाकहून आलेल्या महिलेच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. यानंतर अधिका-यांनी तिच्या ट्रली बॅगची कसून तपासणी केली. तपासणीदरम्यान, बॅगेतून व्हॅक्यूम-सील केलेले १२ पारदर्शक प्लास्टिकचे पॅकेट्स जप्त करण्यात आले. या पॅकेट्समध्ये एकूण ११.८२४ किलोग्रॅम हायड्रोपोनिक गांजा लपवण्यात आला होता. या गांजाची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत सुमारे ११.८२ कोटी रुपये आहे. आरोपी महिला एका खासगी कंपनीत रिलेशनशिप मॅनेजर म्हणून काम करत होती, असे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

## जेवनातून 150 विद्यार्थ्यांना विषबाधा

**उधमसिंग नगर :** उत्तराखंडमधील उधम सिंग नगर येथील गोविंद वल्लभ पंत कृषी आणि तंत्रज्ञान विद्यापीठात जेवणानंतर १५० विद्यार्थ्यांना विषबाधा झाली. जेवण केल्यानंतर साधारण एक ते दीड तासाने विद्यार्थ्यांना उलट्या आणि जुलाबाचा त्रास होउ लागला. विद्यापीठ प्रशासनाने तात्काळ सर्व विद्यार्थ्यांना रु ग्णालयात हलवले. गोविंद वल्लभ पंत कृषी आणि तंत्रज्ञान विद्यापीठातील पटेल भवनमध्ये अभियांत्रिकीचे १८५ विद्यार्थी राहतात. पटेल भवनातील मेस चालकाने विशष भोजन आयोजित केले होते. शाकाहारी विद्यार्थ्यांना पनीर तर मांसाहारी विद्यार्थ्यांना बटर चिकन, नान, भात आणि रसमलाई देण्यात आली होती. जेवण केल्यानंतर साधारण एक ते दीड तासाने विद्यार्थ्यांना उलट्या आणि जुलाब होउ लागले. वसतिगृह प्रशासनाने वसतिगृह व्यवस्थापक, वार्डन आणि डीन स्टुडंट वेल्फेअर यांना याबाबत माहिती दिली.

## खरात प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून निकम यांची नियुक्ती



**मुंबई/प्रतिनिधी :**अंधश्रद्धा, तंत्र-मंत्राच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात मोठी घडामोड समोर आली आहे. राज्यभरात खळबळ उडवून देणा-या या प्रकरणात सरकारची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी राज्य शासनाने ज्येष्ठ वकील ॲड. उज्ज्वल निकम यांची नियुक्ती केली आहे. अशोक खरात याच्याविरोधात अनेक महिलांनी गंभीर स्वरूपाच्या तक्रारी दाखल केल्यानंतर नाशिक पोलिसांनी त्याला अटक केली होती. या प्रकरणाचा तपास विशेष तपास पथकाकडे सोपवण्यात आला असून तपासादरम्यान पोलिसांच्या हाती अनेक धक्कादायक पुरावे लागल्याचा दावा करण्यात आला आहे. खरातच्या कार्यालय आणि फार्म हाउसवर झालेल्या कारवाईत महिलांचे शोषण केल्याचे ⇨(पान २ वर)



## राज्याच्या तिजोरीचा पहिला हक्कदार शेतकरी

**नागपूर/प्रतिनिधी :**शेतक-यांसाठी ठोस उपाययोजना करण्यात अपयशी ठरलेले महायुती सरकार मात्र न केलेल्या कामाचे श्रेय घेण्यात आघाडीवर असल्याची टीका काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. अन्नदात्याला मदत करायची असेल तर ती सन्मानाने द्यावी, हातचे राखून नव्हे. राज्याच्या तिजोरीवर पहिला हक्क शेतक-यांचाच असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

लातूर जिल्ह्यातील एका शेतकरी दाम्पत्याने स्वतः नांगर ओढत शेती केल्याचा व्हीडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. या घटनेने सरकारला लाज वाटायला हवी होती; मात्र सरकारने त्या दाम्पत्याला एक बैल देउन त्याचे मोठे प्रसिद्धीकरण केल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला. शेतक-यांप्रती संवेदनशील असल्याचा आव आणत फोटोसेशन आणि जनसंपर्क मोहीम राबविण्यात आली, मात्र प्रत्यक्षात दिलेला बैल आजारी निघाल्याने शेतकरी दाम्पत्यावर त्याच्या



उपचारांचा अतिरिक्त खर्च करण्याची वेळ आली आहे, असे त्यांनी नमूद केले.शेतक-यांना शाश्वत आणि परिणामकारक मदत देण्याऐवजी केवळ जाहिरातबाजी व दिखाव्यासाठी मदतीचा आव आणणे ही भाजपची कार्यपद्धती असल्याचे या घटनेतून पुन्हा स्पष्ट झाले आहे, अशी टीकाही त्यांनी केली. शेतकरी कर्जमाफीबाबतही सरकारने असाच दिखाउपणा केल्याचा आरोप करत, या योजनेचा प्रत्यक्ष लाभ अनेक शेतक-यांना मिळालेला नाही. उलट उर्वरित कर्ज फेडण्यासाठी त्यांच्यावर दबाव वाढल्याचे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. शेतक-यांच्या प्रश्नांबाबत सरकारची अनास्था पुन्हा एकदा समोर आली असून, केवळ प्रसिद्धीच्या मोहापेक्षा शेतक-यांना प्रत्यक्ष दिलासा देणा-या धोरणांची अंमलबजावणी करण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**जाहिरातबाजी करू नका-**बळिराजाला शाश्वत मदत करण्याऐवजी केवळ जाहिरातबाजी आणि दिखाव्यासाठी सरकार मदतीचा आव आणत आहे. भाजपची ही प्रवृत्ती शेतक-यांच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. केवळ या एकाच घटनेत नव्हे, तर शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावरही सरकारने असाच ⇨(पान २ वर)

## सरसकट कर्जमाफीसाठी रोहित पवारांचे अन्नत्याग आंदोलन



**पंढरपूर /प्रतिनिधी :** शेतक-यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलन पंढरपुरात सुरू केले. सरकारने जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी. जोपर्यंत सरकार जाहीर करत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरू राहील, असा इशारा आमदार रोहित पवार यांनी दिला. राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार हे सरकारच्या कर्जमाफी आणि विविध प्रश्नांवर रस्त्यावर उतरले आहेत. अन्नादात्यासाठी अन्नत्याग आंदोलनाला पंढरपुरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शुक्रवारी सुरुवात केली. सध्या विधान परिषदेची आचार संहिता आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रोहित पवारांनी विचार करावा, असे पत्र जिल्हाधिका-यांनी त्यांना दिले होते. पण त्या पत्राकडे दुर्लक्ष करीत आंदोलन नियोजित स्थळीच सुरू करण्यात आले. ज्या ठिकाणी आंदोलन करणार आहेत, तिथे कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थेचे कारण देत शुक्रवारी सकाळी पोलीस प्रशासनाने आमदार पवार यांना नोटीस बजावली आहे. मात्र, पवार आंदोलनावर ठाम राहिले. या आंदोलनाला सुरुवात करण्याआधी संत नामदेव पायरी येथे जाउन दर्शन घेतले. त्या ठिकाणी आरती केली. फडणवीस सरकारला सरसकट कर्ज माफी करण्याची बुद्धी दे, असे साकडे आमदार रोहित पवार यांनी घातले. त्या नंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून आंदोलनाच्या ठिकाणी हातात संविधान घेवून आमदार रोहित पवार दाखल झाले. ⇨(पान २ वर)

## राज्यावर एल निनोचा मोठा परिणाम होणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** अल निनोच्या संदर्भात आपण तयारी करत आहोत. मी माझ्या अर्थसंकल्पाच्या भाषणामध्येच एल निनोच्या संदर्भात वाच्यता केली होती. त्याचा मोठा परिणाम आपल्या राज्यावर होईल. त्यामुळे त्याची तयारी आपण सुरू केली आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यासंदर्भात केल्या जात असलेल्या उपाययोजनांबद्दलही मुख्यमंत्री बोलले. मुंबईमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पत्रकार परिषद झाली. यावेळी त्यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले. आपण त्याचा टास्क फोर्स तयार केला. जलसंधारणाची कामे कशा प्रकारे मोठ्या प्रमाणात करता येतील, हाही आपला प्रयत्न आहे. कारण पाउस कमी पडल्यानंतर मोठी धरणे कामी येत नाहीत. पाउस कमी पडल्यानंतर जलसंधारणाचे छोटे साठेच कामी येतात. त्यामुळे त्यावर खूप मोठ्या प्रमाणात आपण भर दिलेला आहे असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**चारा टंचाई टाळण्यासाठी कृषी विभागाला सूचना-** प्रत्येक जिल्ह्याला उद्दिष्ट देउन ही जलसंधारणाची कामे कशी पूर्ण करायची, हे आपण सांगितले आहे. चा-याची टंचाई निर्माण होउ शकते. त्यादृष्टीने आपण पशुसंवर्धन विभाग आणि कृषि विभाग यांना सूचना देउन वैरण विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. जेणेकरून आपल्याकडे चारा उपलब्ध असेल अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. ही गोष्ट खरी आहे की, ज्या पद्धतीचे अंदाज दिले जात आहेत, त्यात अडचण मोठी असेल; पाउस कमी पडणार आहे. त्यातून आपण मार्ग काढू. विशेषतः शेतक-यांना आम्ही सल्ला देत



आहोत. राज्य सरकारकडून दिल्या जाणा-या मार्गदर्शनानुसारच जर शेतक-यांनी पेरणी केली, तर दुबार पेरणीची वेळ येणार नाही. नेहमीच्या पद्धतीने पेरणी केली, तर पावसाच्या अभावामुळे पेरण्या वाया जातील. दुबार पेरणीची वेळ येईल असे आवाहन फडणवीस यांनी राज्यातील शेतक-यांना केले आहे.



# अंजनगावचे ठाणेदार सुरज बोंडे यांच्या नेतृत्वात अवैध धंदे हद्दपार

## पोलीस ठाण्याची कार्यक्षमता, सामाजिक सलोख्यावर भर

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी:-** अंजनगाव सुर्जी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुरज बोंडे यांनी पदभार स्वीकारल्यापासून शहर आणि हद्दीतील कायदा-सुव्यवस्थेचे चित्रच बदलले आहे. त्यांच्या कठोर पण संयमी कार्यपद्धतीमुळे हद्दीतील सर्व अवैध धंदे पूर्णपणे बंद झाले असून, नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. ठाणेदार बोंडे यांनी पदभार घेताच अवैध दारू, मटका, जुगार आणि इतर गैरप्रकारांविरोधात विशेष मोहीम राबवली. गुप्त माहितीच्या आधारे ठिकठिकाणी छापे टाकून अनेक अवैध अड्डे उद्ध्वस्त केले. सातत्यपूर्ण कारवाई आणि कडक देखरेखीमुळे आता हद्दीत एकही अवैध धंदा सुरू नसल्याची स्थिती आहे. यामुळे गुन्हेगारीचे प्रमाणही लक्षणीयरित्या घटल्याचे स्थानिक नागरिक सांगतात.शहरातील शांतता आणि सुव्यवस्था



राखण्यासाठी ठाणेदार बोंडे यांनी सर्व धर्मांच्या प्रतिष्ठित नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि तरुणांना एकत्र आणले आहे. सण-उत्सवांच्या काळात ते स्वतः पुढाकार घेऊन शांतता समितीच्या बैठका घेतात. सर्वांना विश्वासात घेऊन सविस्तर मार्गदर्शन केल्यामुळे गेल्या काही काळात शहरात कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही. 'कायदा सर्वांसाठी समान आहे' हा संदेश त्यांनी कृतीतून दाखवून दिला आहे.

पोलीस ठाण्यात येणाऱ्या घरगुती तक्रारींमध्येही बोंडे यांची भूमिका कौतुकास्पद ठरत आहे. छोट्या-छोट्या कारणांवरून होणारे वाद थेट कोर्ट-कचेरीत नेण्याऐवजी, ते दोन्ही पक्षांना समोरासमोर बसवून समजावून सांगतात. समुपदेशनाच्या माध्यमातून अनेक कुटुंबांतील तणाव निवळला असून, वाद सामंजस्याने मिटले आहेत. यामुळे पोलीस ठाण्यावरील ताण कमी होण्यासोबतच नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास वाढला आहे. ठाणेदार सुरज बोंडे यांच्या या कामगिरीमुळे अंजनगाव सुर्जी शहरात त्यांचे नाव आदराने घेतले जाते. महिला वर्गातही त्यांच्याबद्दल विशेष आदर असून, पोलीस ठाण्यात तक्रार घेऊन जाण्यास महिला आता निर्भयपणे पुढे येत आहेत.एकंदरीत, ठाणेदार सुरज बोंडे यांच्या नेतृत्वाखाली अंजनगाव सुर्जी पोलीस ठाणे हे केवळ कायद्याचे रक्षक न राहता, सामाजिक परिवर्तनाचे केंद्र बनत आहे.

# ग्राहकांचे फोन उचला, विज विषयक समस्या तातडीने सोडवा

## पालकमंत्री यांनी संपर्क केल्यानंतर महावितरण संचालकांचे निर्देश

अमरावती/प्रतिनिधीः- वीज ग्राहकांच्या तक्रारींना तत्काळ प्रतिसाद देऊन त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. ग्राहकांचे फोन न उचलणे अथवा तक्रारींकडे दुर्लक्ष करणे यापुढे खपवून घेतले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा महावितरणचे संचालक (संचालन) सचिन तालेवार यांनी क्षेत्रीय कार्यालयांना दिला.

अमरावती येथील वीज समस्येची गंभीर दखल घेत अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संचालक (संचालन) यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर तालेवार यांनी अमरावती परिमंडळाचे मुख्य अभियंता अशोक साळुंकेसह, अधीक्षक अभियंते व सर्व कार्यकारी अभियंत्यांची तातडीची व्हिडिओ कॉन्फरन्स घेऊन वीज सेवा अधिक प्रभावी करण्याबाबत सूचना दिल्या.




यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, वीज ही अत्यावश्यक सेवा असल्याने ग्राहकांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा देणे ही महावितरणची जबाबदारी आहे. ग्राहकांच्या तक्रारी नोंदविण्यासाठी नियंत्रण कक्ष स्थापन करून त्यांच्या समस्या तत्काळ जाणून घ्याव्यात व त्यांचे निराकरण करावे. नियोजित देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी सकाळी ७ ते ११ या वेळेतच वीजपुरवठा बंद ठेवावा. तसेच वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी संबंधित ग्राहकांना पूर्वसूचना देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्याचबरोबर वीज बिलाच्या संदर्भात वीज ग्राहकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी स्थानिक स्तरावर कॅम्प घेऊन, त्याचे तातडीने निराकरण करण्याचेही निर्देश यावेळी त्यांनी दिले.

तसेच महावितरणच्या नियंत्रण कक्षासह लाईनमन, शाखा अभियंता, कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता आणि मुख्य अभियंता यांनीही ग्राहकांच्या दूरध्वनीला प्रतिसाद देणे बंधनकारक असल्याचे सांगत, ग्राहकसेवेत कोणतीही हयगय सहन केली जाणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

# १ व १० वरिल उर्वरित

## शेतीसाठी कॅन, बॅरलमध्ये डिझेल

शेतक-यांना कॅन, बॅरलमध्ये डिझेल देण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सध्यस्थितीत शेतक-यांना ट्रॅक्टरसह अन्य यंत्रांसाठी कॅनमध्ये डिझेल दिले जाते. पण, केंद्र सरकारच्या नव्या आदेशात वाहनांशिवाय पेसोने मान्यता दिलेल्या कंटेनरमध्येच पेट्रोल, डिझेल देण्याचे आदेश दिले आहेत. पण, पेसोने ठरवून दिलेल्या निकषांची पुर्तता करणारे कंटेनर बाजारात उपलब्ध नाहीत. त्यामुळे आता शेतक-यांना कॅन, बॅरलमध्ये डिझेल द्यायचे की, नाही, असा प्रश्न पेट्रोल पंप चालकांसमोर निर्माण झाला आहे, अशी माहिती फेडरेशन ऑफ ऑल महाराष्ट्र पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष अमित गुप्ता यांनी दिली आहे.

ऐन पेरणी हंगामात इंधन टंचाई ?

राज्यात खरीप हंगामाची तयारी पूर्ण झाला आहे. पुरेसा पाउस होताच पेरण्या सुरू होतील. ग्रामीण भागात आता बैलजोड्यांऐवजी लहान ट्रॅक्टरद्वारे पेरणी होते. पाउस झाल्यानंतर दहा ते पंधरा दिवसांत पेरण्या उरकतात. अशा वेळी कॅनमध्ये डिझेल न मिळाल्यास किंवा पुरेसे डिझेल न मिळाल्यास शेतक-यांसमोरील अडचणींत वाढ होणार आहे. ट्रॅक्टर शिवाय शेतीच्या मशागतीसाठी पावर ट्रिलर, पावर विडर, चिखलणी यंत्र, पाणी उपशासाठी डिझेल इंजिन, औषध फवारणीसाठीच्या एचटीपीईसाठी डिझेल इंजिनचा वापर केला जातो. त्यामुळे शेतक-यांना कॅन, बॅरलमध्ये डिझेल मिळणार का, पेरणी हंगामातही २०० लिटरची अट कायम राहणार का, या बाबतचा संभ्रम सरकारने दूर करावा, अशी मागणी शेतक-यांकडून केली जात आहे.

**राज्य सरकारशीही या बाबत चर्चा करू-** वाहनांशिवाय पेट्रोलियम, ज्वलनशील पदार्थ सुरक्षा संघटनेने (पेसो) शिफारस केलेल्या कंटेनरमध्येच डिझेल देण्याच्या सूचना आहेत. असे कंटेनर बाजार उपलब्ध नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागात शेतक-यांना कॅन, बॅरलमध्ये डिझेल द्यायचे की, नाही, असा संभ्रम आहे. या बाबत संघटनेने पेसोला पत्र लिहून या बाबत योग्य ते दिशानिर्देश देण्याची विनंती केली आहे. राज्य सरकारशीही या बाबत चर्चा करू, अशी माहिती फेडरेशन ऑफ ऑल महाराष्ट्र पेट्रोल डीलर्स असोसिएशनचे अध्यक्ष अमित गुप्ता यांनी दिली.

## जीडीपीच्या आकड्यांत गडबड

नाहीत. परकीय गुंतवणूकदारही भारतात पैसे गुंतवण्यास कचरत आहेत.

**परकीय गुंतवणूक घटली-** थेट परकीय गुंतवणूक कमालीने घटली आहे. ते भारतात कारखाने स्थापन करण्यासाठी पैसा आणत नाहीत. पोर्टफोलिओ इन्व्हेस्टर्स समभाग विकून बाहेर पडत आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेवरील अविश्वासाशी हे वर्तन सुसंगत आहे, असेही ते म्हणाले.

**२०४७ पलीकडे स्पष्ट धोरण नाही-**२०४७ पर्यंत विकसित देश बनविणे या उद्दिष्टापलीकडे भारताकडे कोणतेही स्पष्ट आर्थिक धोरण दिसत नाही अशी टीका रघुराम राजन यांनी केली. रोजगार निर्मिती, नागरिकांचा विकास आणि उत्पादन वाढविण्यासाठी सरकारची नेमकी रणनीती काय, हे अद्याप स्पष्ट नाही. २०४७ मध्ये भारताला विकसित देश बनविणे, यापलीकडे भारताची दूरदृष्टी काय आहे, हे कोणालाही माहीत नाही. तुम्ही कशावर भर देणार आहात? विकासाचे धोरण काय आहे? तुम्ही देशातील लोकांमध्ये किती गुंतवणूक करणार आहात? यापैकी काहीही स्पष्ट नाही, असेही रघुराम राजन म्हणाले.

## बँकांमधील ठेवी घटल्याने

मागणीची पूर्तता करण्यासाठी बँकांनी सरकारी रोख्यांमधील गुंतवणूकही कमी केली आहे. जानेवारी २०२६ मध्ये सरकारी रोख्यांमधील गुंतवणुकीची वाढ केवळ २ टक्क्यांवर आली होती. त्यानंतर मे अखेर ती ४.९ टक्क्यांपर्यंत वाढली असली तरी ठेवींचे संकलन अपेक्षेप्रमाणे न झाल्याने बँका उपलब्ध निधी कर्जवाटपासाठी वापरत असल्याचे दिसून येते. तज्ज्ञांच्या मते, कर्ज घेण्याचे प्रमाण ठेवींच्या वाढीपेक्षा अधिक राहिल्यास आगामी काळात बँकांपुढे निधी उभारणीचे आव्हान आणखी वाढू शकते.

### खरात प्रकरणात विशेष सरकारी

कथित १०० हून अधिक अश्लील व्हीडीओ सापडल्याची माहिती तपास यंत्रणांनी दिली आहे. खरातविरोधात लैंगिक अत्याचार, फसवणूक तसेच महाराष्ट्र नरबळी आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये विविध गंभीर गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता सरकारने विशेष सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे.

**दोषींना हमखास शिक्षा मिळणार?-** अशोक खरात याचे काही बडे राजकीय नेते आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिका-यांशी संबंध असल्याच्या चर्चाही रंगत आहेत. त्यामुळे आता निकम यांच्या नियुक्तीनंतर या प्रकरणातील तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया अधिक वेगाने होण्याची शक्यता व्यक्तकेली जात आहे. अनेक गाजलेल्या खटल्यांमध्ये प्रभावी युक्तिवाद करून दोषींना शिक्षा मिळवून देणारे उज्ज्वल निकम आता या प्रकरणात सरकारची बाजू मांडणार असल्याने राजकीय वर्तुळातही मोठी खळबळ उडाली आहे.

## राज्याच्या तिजोरीचा पहिला

दिखाउपणा केल्याचा दावा त्यांनी केला आहे. कर्जमाफीच्या नावाखाली शेतक-यांना कोणतीही ठोस मदत न मिळता, उलट उर्वरित कर्ज भरण्यासाठी सरकारकडूनच दबाव आणला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

**श्रेय लाटण्यात महायुतीचा हातखंडा-**काम काहीही करायचे नाही आणि न केलेल्या कामाचे श्रेय लाटण्यात महायुती सरकारचा हातखंडा असल्याचे वडेट्टीवार म्हणाले. अन्नदात्याला जे काही द्यायचे आहे, ते सन्मानाने द्या; हातचे राखून देउ नका. राज्याच्या तिजोरीवर पहिला हक्क जर कोणाचा असेल, तर तो या कष्टाळू शेतक-यांचाच आहे अशा शब्दांत त्यांनी सरकारला खडेबोल सुनावले आहेत. ?शेतक-यांच्या आत्मसन्मानाशी खेळणा-या या घटनेमुळे राजकीय वर्तुळात संतापाची लाट उसळली असून सरकार केवळ जाहिरातींच्या मागे धावत असल्याचा आरोप विरोधकांकडून अधिक तीव्रतेने केला जात आहे.

## सरसकट कर्जमाफीसाठी रोहित

या वेळी जिल्ह्यातील राष्ट्रवादी कांग्रेस ( श.प. ) पक्षाचे आमदार राजू खरे, भाजपाच्या बैठकीला हजर राहिलेले, राष्ट्रवादीचे आमदार अभिजित पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि काही शेतकरी उपस्थित होते.गेल्या आठ महिन्यांपूर्वी सरकारने कर्जमाफीचे सर्व निकष बँकांकडून यादी मागवत जाहीर केलेले होते. याची सगळी माहिती विधानसभेमध्ये चर्चेच्या वेळेस मिळाली होती. त्यावेळेस रोहित पवारांनी त्या निकषाला हरकत घेणे गरजेचे होते. त्या ठिकाणी त्यांनी बोटचेपे धोरण घेतले आणि हे आंदोलन पंढरपूर येथे घेतले. सध्या अधिक महिन्यामुळे भाविकांची प्रचंड गर्दी आहे. या गर्दीला वेठीस धरून प्रशासनावर ताण यावा म्हणून ही स्टंटबाजी करण्याचे काम रोहित पवार करत आहेत.जर रोहित पवार यांना शेतक-यांचा इतका कळवळा असेल, तर हे आंदोलन त्यांनी शेत शिवारामध्ये घ्यायला हवे होते, म्हणजे ख-या अर्थाने शेतक-यांच्या प्रश्नाला न्याय मिळाला असता. आता त्यांनी मात्र आपल्या आंदोलनावर ठाम राहून सरसकट कर्जमाफी मिळेपर्यंत उपोषण मागे घेउ नये. कुठल्याही आश्वासनावर त्यांनी उपोषण मागे घेउ नये, अशी खोचक टीका भाजप किसान मोर्चाचे सचिव माउली हळणवर यांनी केली.

## हवामानाच्या संकटाला तोंड

परिस्थितीच्या संभाव्य प्रभावाविषयी सावध राहण्याचा इशारा दिला आणि राज्यांनी जलसंधारणांच्या कामांवर लक्ष केंद्रित करण्याची गरज असल्याचे सांगितले. अल निनो ही मध्य आणि पूर्व प्रशांत महासागरातील पाण्याचे तापमान वेळोवेळी वाढण्याची एक नैसर्गिक प्रक्रिया आहे, ही प्रक्रिया सामान्यतः भारतातील मान्सून कमकुवत करण्याशी संबंधित आहे. कारण अल निनो सक्रिय झाल्यानंतर भारतात पाउस कमी पडतो. जागतिक हवामान संघटनेने यासंदर्भात आधीच इशारा दिला आहे. २०२६ च्या मध्यापासून अल निनोची स्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे आणि त्याचा परिणाम जगभरातील हवामान पद्धतींवर होईल असे म्हटले गेले आहे.

## मोर्शी तालुक्याला गारपिटीचा तडाखा

दुकान वरील टीनपत्रे उडाली.त्यामुळे तेथील वाहतूक पूर्णतः विस्कळीत झाली.राय कॉलनी परिसरात बोराएवढी गार पडली,झाडे कोसळली सिंभोरा रोडवरील श्रीराम कॉलनी येथे झाडे कोसळून फोर व्हीलर वाहनावर पडल्यामुळे आर्थिक नुकसान झाले.दरम्यान दीड ते दोन तास विद्युत पुरवठा खंडित झाला होता. हिवरखेड महसूल मंडळातील दापोरी डोंगर यावली,घोडदेव,सालबर्डी पाळा,मायवाडी,भाईपूर यासह अनेक गावांमध्ये गारपिटीचा सर्वाधिक फटका बसला असून संत्रा बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.अनेक ठिकाणी संत्र्यांची फळगळ झाली असून झाडांवरील फळांना गंभीर इजा पोहोचली आहे.काही भागांत गारपिटीमुळे झाडांच्या फांद्या तुटल्या असून आगामी हंगामावरही त्याचा विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हजारो रुपयांचा खर्च करून संत्रा बागांचे संगोपन करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता आर्थिक संकट उभे ठाकले आहे. अशा परिस्थितीत प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागांचे सर्वेक्षण करून पंचनामे करणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

## कर्तव्य बजावा, अन्यथा मेळघाटात

अपघातातील रुग्णावरही उपचार न करता थेट अमरावतीला रेफर केले जाते. अमरावती ते तळेगाव दरम्यान एकही मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल नाही. रुग्णालयात नियमित वैद्यकीय अधिकारी नाहीत, तर कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेली ट्रॉमा केअर युनिटची इमारत आणि साहित्य धूळ खात पडून आहे.

या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी थेट मुख्यमंत्र्यांकडे या भागात मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याची मागणी केली होती. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना प्रत्यक्ष रुग्णालयाची पाहणी करण्याची विनंती केली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी ही धडक कारवाई केली.

**एकच डॉक्टर हजर; जिल्हाधिकारी संतापले!**

जिल्हाधिकारी आशिष येरेकर सकाळी अचानक रुग्णालयात पोहोचले तेव्हा तिथे कर्तव्यावर केवळ नाईट शिफ्टमधील एकच डॉक्टर उपस्थित होते. हा ढिसाळ कारभार पाहून जिल्हाधिकाऱ्यांचा पारा चढला. त्यांनी तात्काळ कर्मचाऱ्यांचे उपस्थिती रजिस्टर, औषध साठा, एक्स-रे व्यवस्था, वॉर्डातील रुग्णांची स्थिती, सार्वजनिक शौचालय, डायलिसिस सेंटर आणि रुग्णालयाच्या परिसराची बारीक पाहणी केली. महामार्गाची भीषण स्थिती पाहता येथे ट्रॉमा केअर युनिट तातडीने सुरू करण्याची गरजअसल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणारा

याच संधीचा फायदा घेत जवळच मजुरीचे काम करणारा आरोपी सचिन कुयटे याने घरात प्रवेश करून मुलीचा विनयभंग केला.दुपारी शेजारील महिलेने मुलगी रडत असल्याची माहिती तिच्या आईला दिली. त्यानंतर आई घरी परतली असता मुलगी घाबरलेल्या अवस्थेत होती. तिने घडलेला प्रकार सांगितल्यानंतर फ्रेजरपूरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली.

या तक्रारीवरून भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५(१)(i) तसेच पोक्सो कायद्याच्या कलम ८ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार विशेष पथक तयार करण्यात आले. आरोपी गुन्हा करून परिसरातून पसार झाला होता. मात्र पोलिसांनी तांत्रिक माहिती, गुप्त बातमीदारांचे जाळे आणि कौशल्यपूर्ण तपासाच्या आधारे त्याचा शोध घेत राहटगाव परिसरातून त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्याला अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र राजुलवार, उपनिरीक्षक राहुल महाजन, ज्योती देवकते तसेच फ्रेजरपूरा पोलीस ठाण्याच्या पथकाने ही उल्लेखनीय कारवाई केली.

## तुकाराम मुंढेंच्या आदेशाचा परिणाम

? याबाबत गावात चर्चेला उधान आले असून अन्न व औषधी प्रशासनाच्या कारवाईच्या भितीने कुण्यातरी व्यापाऱ्याने एक्सपायर झालेल्या मालाची विल्हेवाट लावण्याचा हा प्रयत्न केल्या जाऊ शकतो.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार गावातील लहान दुकानात बऱ्याच वेळा एक्सपायर झालेले खाद्य पदार्थ विकण्याच्या तक्रारी समोर येत आहेत. काही नागरिकांनी आरोप केला आहे की अशा प्रकरणात संबंधित विभागाकडून नियमित चौकशी होत नसल्याने अशा प्रकारचे एक्सपायर झालेले उत्पादन ग्रामिण बाजारपेठेत पोहचविल्या जाते.शहानूर नदी किनारी मोठया प्रमाणात फेकलेल्या चिप्स पाकीटचा प्रकार समोर आल्यानंतर नागरिकांनी संबंधित विभागामार्फत चौकशीची मागणी केली आहे. या खाद्य पदार्थांची गुणवत्ता तपासून सखोल चौकशी मोहीम चालविण्यात यावी तरच ग्रामिण भागात ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यावर अंकुश लावल्या जाऊ शकतो.

## १३ लाखांचा सोयाबीन ट्रक घेऊन

मध्ये २०० क्विंटल सोयाबीन भरून सोलापूर साठी पाठवण्यात आले होते. ट्रक ६ जूनच्या रात्री आठ वाजता अमरावती वरून निघाला होता. रस्त्यामध्ये चालकाने तुळजापूर येथे राहण्याची माहिती दिली. ७ जून रोजी व्यापारी मनीष भट्ट यांनी चालकाशी संपर्क केला तर त्याचा मोबाईल बंद होता. यानंतर त्यांनी सोलापूर येथील कंपनीशी संपर्क केला तर माहिती मिळाली कि सोयाबीन त्यांच्याकडे अद्याप नाही पोहोचले. १३ लाख रुपये किमतीचे सोयाबीन लंपास करण्यात आल्याच्या प्रकरणात पोलिसांनी ट्रक चालका विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे त्याचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे.

## नोएडा येथून आंतरराज्यीय

व इतर पुरावे जप्त करण्यात आले आहेत. सक्करसाथ परिसरातील रहिवासी सुधीर बालकृष्ण भंडारी यांनी यापूर्वी एका वित्तीय संस्थेकडून घेतलेले कर्ज पूर्णपणे फेडले होते. दरम्यान, जानेवारी २०२६ मध्ये स्वतःला वित्तीय कंपनीचा प्रतिनिधी सांगणाऱ्या अज्ञात व्यक्तीने त्यांच्याशी संपर्क साधून ३० लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाल्याचे सांगितले. त्यानंतर प्रक्रिया शुल्क, फाईल मंजुरी, अधिकारी शुल्क आणि इतर कारणे सांगत आरोपींनी वेळोवेळी पैसे मागितले.

'पैसे भरले नाहीत तर कर्ज रद्द होईल, आधी भरलेली रक्कमही परत मिळणार नाही,' अशा धमकीवजा संदेशांमुळे भंडारी यांनी विविध खात्यांमध्ये एकूण १३.८७ लाख रुपये जमा केले. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर सायबर पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. आर्थिक व्यवहारांचे विश्लेषण करताना या फसवणुकीचे धागेदोरे उत्तर प्रदेशातील नोएडा येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार विशेष पथक दिल्ली-नोएडा येथे रवाना करण्यात आले. तपासादरम्यान कमलेश दाताराम शर्मा याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या चौकशीतून राहुल ठाकुरप्रसाद पांडे आणि छोटलाल कल्लू यांची नावे समोर आली. पोलीस त्यांच्या मागावर असतानाच आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. स्थानिक पोलिसांच्या मदतीने सापळा रचून दोघांनाही नोएडा येथून अटक करण्यात आली.पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, शाम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे आणि पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिकेत कासार यांच्या नेतृत्वातील पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

## ब्राम्हणवाडा थडी पोलिसांची गुटका

२४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तर दुसरा आरोपी फरार आहे. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अवैध दारू, गुटखा, रेती, गौवंश वाहतूक व इतर बेकायदेशीर धंद्यांविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. त्यानुसार शुक्रवारी सकाळी ब्राम्हणवाडा थडी पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार घाटलाडकी ते ब्राम्हणवाडा थडी मार्गावर महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी नितीन अलोने यांच्या शेतासमोरील रस्त्यावर नाकाबंदी केली. दरम्यान, घाटलाडकीकडून येणारी मारुती (एमएच-०४-ईटी-०८८९) ही कार अडवून तपासणी केली असता त्यामध्ये प्रतिबंधित विमल पान मसाला, बाजीराव गोल्ड गुटखा, मस्तानी व व्ही-१ बिग सुगंधित तंबाखू आढळून आली. कारवाईदरम्यान २ लाख ५० हजार रुपये किमतीचे वाहन व १ लाख २ हजार २४० रुपये किमतीचा गुटखा व तंबाखू असा एकूण ३ लाख ५२ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी वाहन चालक मोहम्मद जाबीर अब्दुल रशीद (वय ३६) आणि वाहन मालक मोहम्मद मुतल्लीफ सौदागर (वय ३५, दोघे रा. सौदागरपुरा, ब्राम्हणवाडा थडी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३, २२३, २७४, २७५ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव, उपनिरीक्षक नागोराव पवार, राजेंद्र पवार तसेच ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

## राजुरा तलावात बुडालेल्या तरुणाचा

नगर नंबर दोन) असे मृतक तरुणाचे नाव आहे. रेस्क्यू पथकाने अथक प्रयत्नानंतर त्याचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढला आहे. माहितीनुसार नेहमी प्रमाणे अब्दुल वहीद अब्दुल वहाब आपल्या मजूर मित्रांसोबत कामावर गेला होता.सायंकाळी परत येत असताना तो नेहमी प्रमाणे राजुरा तलावात आंघोळ करण्यासाठी गेला असता पाण्याचा अंदाज न आल्याने तो तलावात बुडाला. मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला पण त्यांचे प्रयत्न निरर्थक ठरले. घटनेची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन पथकाला देण्यात आली. पथकाने गुरुवारी रात्री शोध कार्य केले पण त्यांना यश आले नाही. शुक्रवारी सकाळी सहा वाजता आपत्ती व्यवस्थापन पथकाच्या गोताखोरांनी शोध कार्य सुरू केले. दरम्यान ६.१५ च्या दरम्यान अथक प्रयत्नानंतर अब्दुल वहीदचा मृतदेह पाण्याच्या बाहेर काढण्यात आला. शव पोस्टमार्टमसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शोध व बचाव पथकाचे सचिन धरमकर, विशाल निमकर, कौस्तुभ वैद्य, सुमित बांबल, आकाश निमकर यांनी कारवाई मध्ये सहभाग घेतला.

## विहिरीत पडलेल्या महिलेचे

नाव आहे. माहिती नुसार शुक्रवारी सकाळी आशा सुरेश दुधे अचानक तोल गेल्याने पंचीबाई वाडी येथील विहिरीत पडली होती. घटनेची माहिती तेथे उपस्थित नागरिकांनी तात्काळ आपदा विभागाला दिली. विभागाने पोलीस कंट्रोल रूम आणि अग्निशमन विभागाला सूचित केले. अग्निशमन विभागाचे निलेश आजणे, संजय चव्हाण, मनीष उताणे राहुल धोंडे अमोल निस्ताने मोहम्मद ताहीर घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रोपवेच्या मदतीने आशा दुधे यांना विहिरीच्या बाहेर काढले. त्यांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. महिलेची प्रकृती स्थिर आहे.

## मानव सुगंधेला उच्च न्यायालयाकडून

याच्या वतीने न्यायालयात मांडण्यात आले की, त्याला केवळ सहआरोपीच्या जबाबाच्या आधारे या प्रकरणात गोवण्यात आले आहे. आक्षेपार्ह व्हिडिओ तयार करणे किंवा प्रसारित करणे यामध्ये त्याचा कोणताही थेट सहभाग असल्याचे पुरावे उपलब्ध नाहीत. तो २० वर्षीय विद्यार्थी असून त्याच्या परीक्षा २० जूनपासून सुरू होणार असल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

सरकारी पक्षाने जामिनाला विरोध करताना मुख्य आरोपी अयान अहमदचा मित्र असल्याने मानवने कथितरित्या खोलीची व्यवस्था करून दिल्याचा आरोप केला. मात्र तपास अद्याप सुरू असून आरोपपत्र दाखल होणे बाकी असल्याचेही नमूद करण्यात आले.

या प्रकरणाची सुनावणी करताना न्यायमूर्ती एम. एम. नेरलिकर यांनी निरीक्षण नोंदविले की, तपास यंत्रणेने आरोपीविरुद्ध अद्याप कोणतेही ठोस पुरावे सादर केलेले नाहीत. तसेच त्याला मुख्यत्वे सहआरोपीच्या जबाबाच्या आधारे आरोपी करण्यात आले आहे.

आरोपीचे वय, शैक्षणिक स्थिती आणि आगामी परीक्षा विचारात घेऊन न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला. न्यायालयाने ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक मुचलका व तितक्याच रकमेच्या दोन जामीनदारांवर त्याची सुटका करण्याचे आदेश दिले.

तसेच साक्षीदारांवर दबाव आणू नये, पुराव्यांशी छेडछाड करू नये, पोलिसांना आपला पत्ता व मोबाईल क्रमांक उपलब्ध करून द्यावा आणि प्रत्येक सोमवारी संबंधित पोलीस ठाण्यात हजेरी लावावी, अशा अटीही न्यायालयाने घातल्या आहेत.

## वेतनासाठी स्वच्छता कामगारांचे

नियमित वेतन कर्मचाऱ्यांना नाही मिळत, अनेकांच्या पगारातून कपात केली जात आहे. मात्र कपातीचे कारण स्पष्ट केले जात नसल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी आहे. तसेच वेतन पे स्लीप दिली जात नसल्याने कामगारांना आपल्या पगाराची अचूक माहिती मिळत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. आंदोलनात महिला सफाई कर्मचाऱ्यांचाही सहभाग असून महिला कर्मचाऱ्यांनाही मानसिक त्रास दिला जात असल्याचा आरोप केला आहे. याशिवाय करारातील अटी नुसार ५८ वर्षावरील कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करू नये, प्रलंबित वेतन तातडीने अदा करावे आणि सर्व कामगारांना न्याय द्यावा अशा विविध मागण्या आंदोलन करताना मांडल्या आहे. हमारी मांगे पुरी करो अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. संतप्त कर्मचाऱ्यांनी जोपर्यंत मागण्या मान्य नाही होत तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा दिला आहे. सामाजिक कार्यकर्ता शैलेश मेघवानी यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन कामगारांच्या मागण्यांना पाठिंबा दिला. कामगारांच्या या आंदोलनामुळे स्वच्छतेच्या व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## शहरातील अस्वच्छेतेविरुद्ध

कचरा उचलण्यात यावा अशी मागणी शिवसैनिकांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मुखवटा घालून केली. या आंदोलनाची दखल न घेतल्यास यापेक्षा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. आंदोलन करणाऱ्यांमध्ये माजी नगरसेवक प्रदीप बाजड, नितीन तारेकर, राजेंद्र व्यवहारे, सागर ढोके, अभिजीत खर्चे ,आदित्य वाटकर ,हर्षद पाटील सह परिसरातील व्यापारी आणि दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उपनिरीक्षकाने गेटमॅनला केली

अधिकाऱ्याने गेटमनला मारहाण करण्यास सुरुवात केली. पोलिसाच्या तावडीतून सुटण्यासाठी भयभीत झालेला गेटमन तेथून थेट पळत सुटला आणि क्रॉसिंगपासून तब्बल १ किलोमीटर अंतरावर असलेल्या पांढुर्णा स्थानक व्यवस्थापकाच्या कक्षामध्ये पोहोचला.हा हायव्होल्टेज ड्रामा एवढ्यावरच थांबला नाही. तो पोलीस उपनिरीक्षक गेटमनचा पाठलाग करत थेट स्थानक व्यवस्थापकाच्या कक्षामध्ये घुसला. तिथे स्टेशन प्रशासनाच्या समोरच त्याने गेटमनला पुन्हा धमकावल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या गंभीर प्रकारामुळे स्थानक परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.या संपूर्ण गोंधळात रेल्वे सिग्नलिंग आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याने, पांढुर्णा स्थानकावर आलेली १२१५९ अमरावती-जबलपूर एक्स्प्रेस पुढे रवाना होऊ शकली नाही. अखेर रेल्वे प्रशासन आणि सुरक्षा दलाच्या मध्यस्थीनंतर, परिस्थिती नियंत्रणात आली. तब्बल ४० मिनिटांच्या विलंबाने ही गाडी पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आली. कायद्याचे रक्षकच जर अशा प्रकारे रेल्वे कर्मचाऱ्यांवर हात उचलून रेल्वे सेवेचा बोजवारा उडवणार असतील, तर सामान्य जनतेच्या सुरक्षेचे काय? असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. संबंधित दोषी पोलीस उपनिरीक्षकावर कडक कारवाई करण्याची मागणी रेल्वे कर्मचाऱ्यांकडून केली जात आहे.

## अचलपूर विद्युत वितरण कंपनीच्या

चौधरी यांनी नुकताच आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला असून, वीज वितरण व्यवस्थापन अधिक सक्षम व ग्राहकाभिमुख करण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. शहरासह ग्रामीण भागातील वीजपुरवठा सुरळीत ठेवणे, तांत्रिक बिघाडांचे तातडीने निराकरण करणे, प्रलंबित कामांना गती देणे तसेच ग्राहकांच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, १३ जून २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# अडोळी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रभागाचे आरक्षण जाहीर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी वार्डनिहाय आरक्षण सोडत आज सकाळी ११ वाजता ग्रामपंचायत चावडी येथे विशेष ग्रामसभेत पारदर्शकपणे पार पडली.

तहसील कार्यालयामार्फत प्राधिकृत अधिकारी मंडळ अधिकारी जी. एस. इपर यांच्या अध्यक्षतेखाली ही प्रक्रिया पूर्ण झाली.

यावेळी ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन व ग्राम महसूल अधिकारी संध्या मार्कड यांनी सहाय्यक म्हणून काम पाहिले. यावेळी ग्रामपंचायत प्रशासक भगवान भानुदास इढोळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, खंडोबा कंट्रक्शनचे संचालक प्रमोद इढोळे, माजी सरपंच संतोष विठ्ठल इढोळे यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सतीश इढोळे, उपाध्यक्ष अमोल खंडारे, श्रीराम पाटील इढोळे, बद्री इढोळे, दीपक भागवत इढोळे, पुरषोत्तम इढोळे, अंगणवाडी ताई छाया खंडारे, महिला बचत गटाच्या सागरबाई इढोळे, संजीवनी पडघान, प्रसंगणक परिचालक रवी इढोळे, ग्रामपंचायत कर्मचारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अडोळी येथे एकूण ११ सदस्यांसाठी होणाऱ्या या निवडणुकीत एकूण ४ प्रभागा मिळून अनुसूचित जातीचे (एण) ४ सदस्य नागरिकांचा मागास प्रवर्ग (धँ) १ सदस्य आणि सर्वसाधारण ६ सदस्य असतील. महिलांना ५०इ आरक्षण आरक्षण आहे. प्राधिकृत अधिकारी जी. एस. इपर यांनी सर्व प्रक्रिया नियमानुसार व शांततेत पार पाडले.

**वार्डनिहाय आरक्षण असे**

नियमानुसार अडोळी येथे ग्रामपंचायतीच्या ४ वार्डासाठी आरक्षण पुढीलप्रमाणे आहे. यावेळेस अनुसूचित जातीच्या दोन महिलांसाठी लहान मुलाच्या हाताने चिट्ठी काढून आरक्षण जाहीर करण्यात आले.

**वार्ड क्र. १ - एकूण ३ सदस्य**
१. अनुसूचित जाती
२. नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री
३. सर्वसाधारण स्त्री

**वार्ड क्र. २ - एकूण ३ सदस्य**
१. अनुसूचित जाती स्त्री
२. सर्वसाधारण ३. सर्वसाधारण स्त्री

**वार्ड क्र. ३ - एकूण ३ सदस्य**
१. अनुसूचित जाती स्त्री
२. सर्वसाधारण ३. सर्वसाधारण स्त्री

**वार्ड क्र. ४ - एकूण २ सदस्य**
१. अनुसूचित जाती
२. सर्वसाधारण

# 'गोपाला गोपाला...!' अकोट ग्रामीणमध्ये अवैध धंद्यांचा 'कृष्णावतार' कोण?

## रेती, दारू, गुटखा, गोवंश वाहतुकीपासून हप्तेखोरीपर्यंत चर्चांचा भडका; गृहरक्षक दलाचा जवानही कथित वसुलीत?

■ ॲड. समीर ठाकूर ■

**अकोला :** 'गोपाला गोपाला, देवकीनंदन गोपाला...' ही म्हण भक्तिभावाने उच्चारली जाते; मात्र अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत सध्या हीच म्हण वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. श्रीकृष्णाच्या नावाशी साधर्म्य असलेल्या एका पोलिस कर्मचाऱ्याभोवती फिरणाऱ्या कथित हप्तेखोरी, अवैध धंद्यांना संरक्षण आणि नागरिकांशी उर्मट वर्तनाच्या चर्चांनी संपूर्ण तालुक्यात खळबळ उडवून दिली आहे. अकोट ग्रामीण हद्दीत अवैध रेती वाहतूक, गौण खनिजांची तस्करी, गोवंश वाहतूक, अवैध दारू विक्री, गुटखा आणि इतर बेकायदेशीर व्यवसाय गेल्या काही महिन्यांत बिनधास्तपणे सुरू असल्याचे चित्र आहे. या सर्व प्रकारांमागे एका वादग्रस्त कर्मचाऱ्याचे कथित 'आशीर्वादछत्र' असल्याची चर्चा आता दबक्या आवाजातून उघडपणे होऊ लागली आहे.

अकोट ग्रामीण पोलिस ठाण्याच्या कार्यपद्धतीबाबत इतक्या मोठ्या प्रमाणावर चर्चा सुरू असताना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याची दखल घेणे अपेक्षित असल्याचे मत व्यक्त होत आहे. कथित हप्तेखोरी, अवैध धंद्यांना संरक्षण, गृहरक्षक दलाच्या जवानाचा वापर, तक्रारदारांशी गैरवर्तन या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी झाल्यास वास्तव समोर येऊ शकते.

सध्या सर्व आरोप आणि चर्चा या स्थानिक स्तरावर व्यक्त होत असलेल्या दाव्यांवर आधारित आहेत. त्यामुळे सत्य परिस्थिती काय आहे, हे निष्पक्ष चौकशीअंतीच स्पष्ट होऊ शकते. मात्र एक गोष्ट निश्चित आहे; अकोट ग्रामीणमध्ये सुरू असलेल्या या चर्चांनी पोलिस विभागासमोर अनेक अस्वस्थ करणारे प्रश्न उभे केले आहेत. आणि म्हणूनच जनतेत आता एकच चर्चा आहे ती म्हणजे 'गोपाला गोपाला... नेमकं चाललंय तरी काय?'.

### रेतीमाफियांसाठी स्वतंत्र 'वसुली यंत्रणा'?

सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे अवैध रेती वाहतुकीतून कथित हप्तेवसुलीसाठी चक्क एका गृहरक्षक दलाच्या जवानाची नेमणूक करण्यात आल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. कायद्याचे रक्षण करणाऱ्या यंत्रणेशी संबंधित व्यक्तीच जर अशा कथित व्यवस्थेचा भाग बनत असतील, तर ही बाब गंभीर मानली जात आहे.

स्थानिक स्तरावर अशीही चर्चा आहे की, रेती व्यवसायाशी संबंधित वाहनांकडून नियमित स्वरूपात आर्थिक व्यवहार केले जातात आणि त्यासाठी स्वतंत्र साखळी तयार करण्यात आली आहे. या चर्चांमध्ये किती तथ्य आहे, याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

### 'वरली बहाद्दर'च्या खांद्यावर हप्तेखोरीचा डोलारा?

ग्रामीण भागातील अवैध धंदे चालविणाऱ्यांकडून कथित हप्ते गोळा करण्यासाठी एका स्थानिक व्यक्तीला पुढे करण्यात आल्याची चर्चा आहे. संबंधित व्यक्तीच्या माध्यमातून व्यवहार होत असल्याचे बोलले जात असून, या चर्चेमुळे पोलिस यंत्रणेच्या प्रतिमेवरच प्रश्न उपस्थित होत आहेत. अधिकृत नोंदीत सर्व काही सुरळीत दिसत असताना, गावपातळीवर मात्र वेगळीच कुजबुज सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे या चर्चांचा तपास होणे गरजेचे असल्याचे जाणकारांचे मत आहे.

### तक्रारदारांचा 'उद्धार' की अपमान?

अवैध धंद्यांच्या कथित संरक्षणापेक्षा अधिक संतापजनक बाब म्हणजे पोलिस ठाण्यात येणाऱ्या नागरिकांना मिळणारी कथित वागणूक. वरिष्ठ अधिकारी अनुपस्थित असताना तक्रारदारांना बोलावून घेणे, त्यांच्याशी उर्मट भाषेत बोलणे, दमदाटी करणे आणि अपमानास्पद वर्तन करणे, अशा स्वरूपाच्या तक्रारी अनेकांकडून व्यक्त होत असल्याची चर्चा आहे. पोलिस दलाची प्रतिमा जनतेचा विश्वास जिंकणारी असावी, अशी अपेक्षा असताना काही व्यक्तींच्या वर्तनामुळे संपूर्ण विभागावर प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत.

### अवैध दारूवाल्यांचे 'श्यामालय'?

ग्रामीण भागातील अवैध दारू व्यवसायाशी संबंधित काही मंडळींना विशेष संरक्षण मिळत असल्याचीही चर्चा रंगली आहे. अनेक ठिकाणी कारवाई होत असताना काही विशिष्ट घटक मात्र वारंवार बचावत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे 'कारवाईची तलवार' नेमकी कोणावर चालते आणि कोणाला अभय मिळते, हा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# 'जग म्हणते युद्ध नको, बुद्ध हवा; बाबासाहेबांनी दिलेला बुद्ध आपण किती स्वीकारला?' - भंते बी. संघपाल



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा शाखा वाशिमच्या वतीने त्रिरत्न बुद्ध विहार, नालंदा नगर येथे आयोजित दहा दिवसीय श्रामणेर प्रशिक्षण शिबिराचा समारोप उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ भगत होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून भंते बी. संघपाल महाथेरो (मुंबई) उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात भगवान गौतम बुद्ध, सम्राट अशोक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. उपस्थितांना त्रिशरण व पंचशील देण्यात आले.

धम्मदेशनामध्ये भंते बी. संघपाल यांनी 'जग म्हणते युद्ध नको, बुद्ध हवा; परंतु बाबासाहेबांनी दिलेला बुद्ध आणि धम्म आपण किती स्वीकारला आहे, याचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे,' असे सांगितले. त्यांनी बाबासाहेबांच्या २२ प्रतिज्ञांचा प्रसार, धम्माचे आचरण आणि संघटन बळकट करण्याची आवश्यकता अधोरेखित केली.

शिबिरात २० श्रामणेर प्रशिक्षणार्थींना विविध विषयांचे मार्गदर्शन करण्यात आले.

# चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शाळेतच केली रोपवाटिका तयार; बालविकास मंदिर शाळेचा स्तुत्य उपक्रम

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील तहसील कार्यालया जवळील बोरगाव रोडवरील श्री व्यंकटेश सेवा समिती वाशिम द्वारा संचालित बालविकास मंदिर प्राथमिक शाळा मालेगाव येथे विद्यार्थ्यांच्या मदतीने पर्यावरण पूरक झाडांच्या बिया गोळा करून त्याची एक रोपवाटिका तयार करण्यात आली. या रोपवाटिके तील कडूनिंब, जांभूळ, आंबा, वड अशा दीर्घकाळ टिकणाऱ्या वृक्षांची रोपे विद्यार्थ्यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त भेट म्हणून दिली जातात व ती वाढवण्याची शपथ सुद्धा घेतली जाते, तसेच शाळेमध्ये वेळोवेळी सांस्कृतिक कार्यक्रमाला येणाऱ्या अतिथींना शाल व श्रीफळ न देता या रोपवाटिके तील रोपे भेट म्हणून दिली जातात. सदर रोपवाटिका शाळेत अतिशय चांगल्या पद्धतीने वाढवून तयार केली जाते. सदर रोपवाटिकेतील



रोपांची शाळा परिसरात तसेच शाळा बाहेरील परिसरात सुद्धा लागवड करण्यात आली. वाढते जागतिक तापमान लक्षात घेता विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाची सवय लागावी व विद्यार्थ्यांचे निसर्गातील प्रेम वाढावे म्हणून आमच्याकडून शाळेतच रोपटे तयार करून विद्यार्थ्यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त रोपटे भेट देत ती जगवण्याची शपथ विद्यार्थ्यांना दिली जाते आज रोजी शाळा परिसरात एकूण १२० झाडे आहेत व प्रत्येक झाडावर त्या झाडाचे नाव, क्रमांक व त्यांचे उपयोग असे पोस्टर लावलेले आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी वाढदिवसानिमित्त रोपटे शाळेला भेट दिली आहेत त्यांचे नाव सुद्धा त्यावर टाकलेले आहे. तसेच गेल्या ११ वर्षापासून हा उपक्रम शाळेत राबविला जातो. सदर रोपवाटिके साठी मुख्याध्यापक विठ्ठल भिसडे यांच्या मार्गदर्शनात आणि वृक्षारोपण विभाग प्रमुख संदीप कांबळे यांच्या व शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी तसेच परिसरातील इतर व्यक्तींचे, पालकांचे मोलाचे सहकार्य रोपवाटिका तयार करण्यासाठी लाभले.

# सत्कारात बुके-शाल नको; गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य द्या

## शिवसेना विदर्भ प्रवक्ते प्रा. प्रकाश डवले यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

शिवसेनेच्या विदर्भ प्रवक्तेपदी नियुक्ती झाल्यानंतर प्रा. प्रकाश डवले यांनी समाजाभिमुख संदेश देत कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिकांना आगळेवेगळे आवाहन केले आहे. आपल्या सत्कारासाठी बुके, शाल अथवा इतर भेटवस्तू न आणता गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या, पेन, पेन्सिल व शैक्षणिक साहित्य आणावे, असे त्यांनी जाहीरपणे म्हटले आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने प्रा. प्रकाश डवले यांची शिवसेना प्रवक्ते (विदर्भ) या महत्त्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीनंतर विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असताना त्यांनी समाजहिताचा संदेश देणारा हा उपक्रम हाती घेतला आहे. 'जनसेवाच माझे ध्येय, ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण,' अशी भूमिका मांडत प्रा. डवले यांनी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी समाजाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले. सत्कारासाठी खर्च होणारी रक्कम शैक्षणिक साहित्याच्या स्वरूपात



गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचल्यास त्यांच्या शिक्षणाला मोठा आधार मिळेल, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी विदर्भातील नागरिकांच्या समस्या व अडचणी सोडविण्यासाठी आपण सदैव उपलब्ध असल्याचे सांगितले. विदर्भातील कोणत्याही प्रश्नासंदर्भात नागरिकांनी थेट संपर्क साधावा. प्राप्त समस्या शासन स्तरावर मांडून त्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. राजकारणासोबत सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या या उपक्रमाचे शिवसैनिकांसह विविध स्तरांतून स्वागत होत असून, विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पुढाकार घेण्याच्या त्यांच्या आवाहनाची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

# धामणा येथील श्री मारोती संस्थानसाठी विश्वस्त नेमणार

**अकोला :** धर्मादाय सहआयुक्त, अमरावती यांच्या आदेशानुसार धामणा येथील श्री मारोती संस्थानसाठी महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४७ प्रमाणे नवीन विश्वस्तांची नेमणूक करण्यात येणार आहे. या न्यासात कोणाला विश्वस्त होण्याची इच्छा असेल तसेच यासंबंधीच्या चौकशी प्रकरणांमध्ये कोणाला काही हरकत घ्यावयाची असेल किंवा पुरावा द्यावयाचा असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून आपले म्हणणे ३० दिवसांच्या आत सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती यांना पाठवावे. चौकशी पूर्ण करून निकालाबाबत योग्य आदेश दिले जातील, अशी नोटीस सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाच्या अधिक्षकांनी (न्याय) काढली आहे. धर्मादाय सहआयुक्त कार्यालयाचा पत्ता म्हाडाभवन, दुसरा माळा, तात्या टोपेनगर, माल टेकडीजवळ, अमरावती असा आहे.

# हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज व अनुदान योजनेसाठी अर्ज मागविले

■ प्रतिनिधी | वाशिम ■

हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्या. (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाअंतर्गत उपकंपनी) यांच्या बीज भांडवल व अनुदान योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्ह्यासाठी दोन प्रकरणांचे भौतिक उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी अनुसूचित जातीतील तसेच हिंदू खाटीक संवर्गातील पात्र इच्छुक अर्जदारांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छुकांनी महामंडळाच्या www.hksedcl.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज सादर करावा. अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचा फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशनकार्ड, दरपत्रक तसेच प्रकल्प अहवाल आदी आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक आहे. संपूर्ण प्रस्ताव महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नालंदा नगर, वाशिम येथे सादर करावेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी मुदतीत अर्ज सादर करून शासनाच्या स्वयंरोजगार व आर्थिक सक्षमीकरणाच्या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक एल. जे. भोयर यांनी केले आहे.

# महिलांनी नैसर्गिक शेती व नैसर्गिक निविष्ठा निर्मितीतून स्वयंरोजगाराच्या नव्या संधी निर्माण कराव्यात -अमृता देशमुख

■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्त्रीशक्ती महिला प्रभाग संघ, हराळ यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नैसर्गिक शेती व महिला सक्षमीकरणावर भर उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती रिसोड यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रीशक्ती महिला प्रभाग संघ, हराळ यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन दिनांक ११ जून २०२६ रोजी कृषी विज्ञान केंद्र, करडा (ता. रिसोड, जि. वाशिम) येथे उत्साहात संपन्न झाले.



या कार्यक्रमास अमृताताई देशमुख, उमेद अभियानाचे जिल्हा समन्वयक सुधीर खुजे, कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे, स्त्रीशक्ती महिला प्रभाग संघाच्या अध्यक्षा कांचन श्याम मांडे, सचिव सौ. मालता रामेश्वर गवळी, कोषाध्यक्ष सौ. अंजली श्रीनिवास वाते तसेच तालुका प्रभाग समन्वयक निलेश सरनाईक यांच्यासह महिला बचत गटांच्या पदाधिकारी व सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. प्रास्ताविकात निलेश सरनाईक यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेची उद्दिष्टे, संघटनात्मक महत्त्व आणि महिला बचत गटांच्या सर्वांगीण विकासातील योगदान याविषयी सविस्तर माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात अमृताताई देशमुख यांनी महिला बचत गटांच्या माध्यमातून ग्रामीण भागात घडत असलेल्या आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, महिलांनी नैसर्गिक शेतीच्या प्रसारात सक्रिय भूमिका बजावत जीवामृत, बीजामृत, दशपर्णी अर्क, नैसर्गिक कीडनाशके व इतर स्थानिक संसाधनाधारित कृषी निविष्ठांची निर्मिती करून स्वयंरोजगाराच्या शाश्वत संधी निर्माण कराव्यात. रासायनिक शेतीमुळे घटत चाललेल्या मृदा आरोग्याचे संवर्धन करण्यासाठी महिलांनी पुढाकार घेणे ही काळाची गरज असून, 'काळ्या आईचे आरोग्य सुदृढ करण्यासाठी नैसर्गिक शेती हा प्रभावी पर्याय आहे,' असे प्रतिपादन त्यांनी केले. यावेळी डॉ. आर. एल. काळे यांनी नैसर्गिक शेती, पीक विविधीकरण, एकात्मिक शेती पद्धती, स्थानिक संसाधनांवर आधारित कृषी निविष्ठांचा वापर आणि हवामान बदलाशी शाश्वत कृषी व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले.

# अफकॉन्सच्या सीएसआर उपक्रमामुळे ९४ कर्करोगग्रस्त बालक व पालकांच्या जीवनात नवी उमेद- मुख्यमंत्री

## समाजहितासाठी उद्योग क्षेत्राचे योगदान प्रेरणादायी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने सामाजिक उत्तरदायित्वातून (सीएसआर) बालरुग्णांसाठी कर्करोग निदान सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. त्यामुळे ९४ बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या जीवनात नवी उमेद जागविण्याचे प्रेरणादायी काम झाले आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सुविधेचे कौतुक केले आहे.

अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने २०२५-२६ मध्ये शिक्षण, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सीएसआरच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य असले तरी आरोग्य क्षेत्रातही महत्वाचे काम केले आहे. देशभरातील कर्करोगाचा संशय असलेल्या बालरुग्णांसाठी तातडीची निदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाअंतर्गत अफकॉन्सने टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून 'कर्करोगाचा संशयित आजार असलेल्या बालरुग्णांसाठी आपत्कालीन निदान सहाय्य सेवा' या योजनेसाठी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. या सहाय्यामुळे देशभरातील ९४ बालकांना कर्करोगाचे तातडीने निदान आणि आवश्यक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होऊ शकल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कर्करोगासारख्या गंभीर आजारामध्ये वेळेवर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे असते. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना आवश्यक तपासण्या करता येत नाहीत. अशा परिस्थितीत अफकॉन्सने दिलेली मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून अनेक बालकांच्या उपचार प्रक्रियेला गती देणारी आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणारी ठरली आहे. शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राची अशी साथ मिळाल्यास आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकासाची उद्दिष्टे अधिक वेगाने साध्य होऊ शकतात. म्हणूनच समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होणे आवश्यक आहे. कॉर्पोरेट क्षेत्राच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याचे नमूद करुन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अफकॉन्सने शिक्षण क्षेत्राबरोबरच महिला सक्षमीकरण आणि आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये केलेली गुंतवणूक ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. समाजातील गरजू घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा सीएसआर उपक्रमांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १९६ ■ शनिवार, १३ जून २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## अफकॉन्सच्या सीएसआर उपक्रमामुळे
# ९४ कर्करोगग्रस्त बालक व पालकांच्या जीवनात नवी उमेद- मुख्यमंत्री

**मुंबई जनमाध्यम:** अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने सामाजिक उत्तरदायित्वातून (सीएसआर) बालरुग्णांसाठी कर्करोग निदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे ९४ बालकांच्या आणि त्यांच्या पालकांच्या जीवनात नवी उमेद जागविण्याचे प्रेरणादायी काम झाले आहे,अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या सुविधेचे कौतुक केले आहे.

अफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने २०२५-२६ मध्ये शिक्षण, आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांमध्ये सीएसआरच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले आहेत. त्यामध्ये शिक्षण क्षेत्राला विशेष प्राधान्य असले तरी आरोग्य क्षेत्राशी महत्वाचे काम केले आहे. देशभरातील कर्करोगाचा संशय असलेल्या बालरुग्णांसाठी तातडीची निदान सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या उपक्रमाअंतर्गत अफकॉन्सने टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या माध्यमातून 'कर्करोगाचा संशयित आजार असलेल्या बालरुग्णांसाठी आपत्कालीन निदान सहाय्य सेवा' या योजनेसाठी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत केली आहे. या सहाय्यामुळे देशभरातील ९४ बालकांना कर्करोगाचे तातडीने निदान आणि आवश्यक वैद्यकीय तपासण्या उपलब्ध होऊ शकल्या.

### समाजहितासाठी उद्योग क्षेत्राचे योगदान प्रेरणादायी

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कर्करोगासारख्या गंभीर आजारामध्ये वेळेवर निदान होणे अत्यंत महत्त्वाचे असते.

आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना आवश्यक तपासण्या करता येत नाहीत. अशा परिस्थितीत अफकॉन्सने दिलेली मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून अनेक बालकांच्या उपचार प्रक्रियेला गती देणारी आणि त्यांच्या कुटुंबांना दिलासा देणारी ठरली आहे. शासनाच्या प्रयत्नांना उद्योग क्षेत्राची अशी साथ मिळाल्यास आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक विकासाची उद्दिष्टे अधिक वेगाने साध्य होऊ शकतात. म्हणूनच समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रातील भागीदारी अधिक बळकट होणे आवश्यक आहे.

कॉर्पोरेट क्षेत्राच्या सामाजिक बांधिलकीचे हे एक उत्कृष्ट उदाहरण ठरत असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अफकॉन्सने शिक्षण क्षेत्राबरोबरच महिला सक्षमीकरण आणि आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये केलेली गुंतवणूक ही शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. समाजातील गरजू घटकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी अशा सीएसआर उपक्रमांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते.

# बंद घाटातूनही रेती माफियांचा धुमाकूळ; प्रशासनाच्या डोळ्यांदेखत अवैध उपसा सुरूच




**विरुळ (आ) जनमाध्यम :** सालफळ येथील रेती घाट शासनाच्या लिलाव प्रक्रियेदरम्यान सुरू करण्यात आला होता. मात्र शासनाने घालून दिलेल्या नियमांनुसार रेतीची उचल होत नसल्याच्या तक्रारी काही नागरिकांनी संबंधित विभागाकडे केल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत प्रशासनाने अखेर सदर घाट बंद करण्याचा निर्णय घेतला. मात्र घाट बंद होण्याची चाहूल लागताच काही रेती तस्करांनी आधीच मोठ्या प्रमाणात रेतीचा साठा करून ठेवत रेती माफियांचे जाळे सक्रिय केल्याची चर्चा परिसरात रंगू लागली आहे.

सालफळ परिसरात विविध ठिकाणी रेतीचे ढिग्ये उभारून ही रेती आता चढ्या दराने विक्री केली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. घाट अधिकृतपणे बंद असतानाही रात्रीच्या अंधारात रेती चोरीचे प्रकार सुरू असल्याने महसूल विभाग आणि पोलिस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याचबरोबर नजिकच्या मारडा घाटातूनही मोठ्या प्रमाणात अवैध रेती उपसा सुरू असल्याची माहिती स्थानिक नागरिकांकडून पुढे येत आहे. रात्रीच्या वेळी ट्रॅक्टर आणि टिप्परच्या माध्यमातून खुलेआम रेतीची वाहतूक होत असताना संबंधित यंत्रणा मात्र चिडीचूप असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

अवैध रेती उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडत असून पर्यावरणालाही मोठा धोका निर्माण होत आहे. त्यामुळे सालफळ आणि मारडा परिसरातील सुरू असलेल्या अवैध रेती उपशावर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## १५ जुन रोजी महिला लोकशाही दिनाचे आयोजन

**वर्धा जनमाध्यम :** समस्याग्रस्त व पिडीत महिलांच्या प्रश्नांची शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी तसेच पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी प्रभावी उपाययोजना म्हणून राज्य, विभाग व जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्याअनुषंगाने दिनांक १५ जुन रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनामध्ये पिडीत महिलांच्या तक्रारी असल्यास जिल्हाधिकारी यांना उद्देशून विहित नमुन्यातील अर्ज द्विप्रतीत सादर करावे. तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे असावे. महिलांनी स्वत: उपस्थित राहणे आवश्यक आहे. विहित नमुन्यात नसणारे अर्ज, न्यायप्रविष्ठ, सेवा व आस्थापना विषयक प्रकरणे स्विकारण्यात येणार नाही. जिल्हास्तरावर दर महिन्याच्या तिसऱ्या व तालुकास्तरावर चौथ्या सोमवारला महिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. समस्याग्रस्त व पिडीत महिलांचे प्रश्न सोडविण्याचे दृष्टीने शासनाने एक व्यासपीठ निर्माण केले असुन महिला लोकशाही दिनाचा लाभ महिलांनी घ्यावा. असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांनी केले आहे.

## मेहंदीचा रंग फिकट होण्याआधीच वैष्णवी काळाच्या पडद्याआड

### -आजनसरा गावावर शोककळा; हृदय शस्त्रक्रियेनंतर तरुणीचे निधन

**आजनसरा जनमाध्यम :** लग्नाला वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच एका तरुण विवाहितेच्या अकाली निधनाने आजनसरा गावाव शोककळा पसरली आहे. संत भोजाजी महाराज पंढरपूर पालखीचे प्रमुख वारकरी प्रभाकरराव पारवटकर यांची कन्या वैष्णवी हिचे हृदय शस्त्रक्रियेनंतर निधन झाले. ती अवघ्या २५ वर्षांची होती.



गेल्या वर्षी आजनसरा येथील संत भोजाजी महाराज मंदिर सभागृहात वैष्णवीचा विवाह मोठ्या उत्साहात पार पडला होता. संसाराची नवी स्वप्ने उराशी बाळगत तिने नव्या आयुष्याला सुरुवात केली होती. मात्र, काही दिवसांपूर्वी तिची प्रकृती अचानक बिघडली. वैद्यकीय तपासणीत हृदयाला छिद्र असल्याचे निदान झाले. त्यानंतर उपचारासाठी तिला नागपूर येथील जमठा परिसरातील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

दरम्यान, ११ जून रोजी शस्त्रक्रियेनंतर तिची प्राणज्योत मालवली. डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली; मात्र उपचारादरम्यान तिचे निधन झाले. ही बातमी समजताच आजनसरा गावात हळहळ व्यक्त करण्यात आली. वैष्णवीच्या निधनाने पारवटकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावातील नागरिकांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले. शुक्रवारी शोकाकुल वातावरणात तिच्यावर आजनसरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# सुरक्षेच्या नावाने थातूरमातूर; जिल्हा परिषदेत एक्सपायर फायर सिलेंडर

### मुदतबाह्य अग्निशामक यंत्रांमुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ; प्रशासन झोपेतच

**वर्धा जनमाध्यम :** सिव्हील लाईन परिसरातील जिल्हा परिषद कार्यालयात बसविण्यात आलेली अग्निशामक यंत्रे मुदतबाह्य झाल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले असून प्रशासनाच्या निष्काळजी कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. जिल्ह्यातील महत्त्वाच्या शासकीय इमारतीतच नागरिकांच्या सुरक्षेचा बोजवारा उडाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दररोज शेकडो नागरिक, महिला, शेतकरी, विद्यार्थी व कर्मचारी विविध कामांसाठी जिल्हा परिषद कार्यालयात ये-जा करतात. मात्र आग लागल्यास जीव वाचविण्यासाठी लावण्यात आलेली अग्निशामक यंत्रेच निकामी ठरण्याची शक्यता असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक फायर एक्स्टिंग्विशरची मुदत संपूनही




प्रशासनाने त्याकडे कानाडोळा केल्याचा आरोप होत आहे.

भीम आर्मी संविधान रक्षक दलाचे जिल्हाध्यक्ष आशिष सोनटक्के यांनी या गंभीर प्रकाराची दखल घेत प्रशासनावर जोरदार हल्लाबोल केला आहे. लाखो रुपयांचा निधी इमारतीच्या रंगरंगोटी आणि दुरुस्तीवर खर्च केला जात असताना सुरक्षेच्या मूलभूत बाबींकडे दुर्लक्ष का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

मुदत संपलेले सर्व अग्निशामक सिलेंडर तातडीने बदलण्यात यावेत, संपूर्ण इमारतीचे स्वतंत्र फायर ऑडिट करण्यात यावे, संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी तसेच अग्निसुरक्षा नियमांचा अहवाल सार्वजनिक करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही भीम आर्मी संविधान रक्षक दलाने दिला आहे. जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# मृत्यूच्या दारातून पाच नीलगाईंना जीवदान

### पाण्याच्या शोधात विहिरीत पडल्या; वनविभागाची धाव, थरारक रेस्क्यू

**गाडेगाव जनमाध्यम :** उन्हाच्या तीव्र झळा आणि जंगलातील आटलेले पाणवठे यामुळे वन्यप्राणी आता थेट शेतशिवारात भटकताना दिसत आहेत. नजीकच्या पिपरी शिवारात अशोक गुरनुले यांच्या शेतातील विहिरीत पडलेल्या पाच नीलगाईंना वनविभागाने थरारक रेस्क्यू करत जीवदान दिले. या घटनेमुळे परिसरात वन्यजीवांबाबत चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

पिपरी शिवारातील विहिरीत काही नीलगाई पडून मृत्यूशी झुंज देत असल्याचे ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. त्यानंतर नागरिकांनी तातडीने वनविभागाला माहिती दिली. माहिती मिळताच प्रादेशिक वनविभागाचे उपवनसंरक्षक हरविर सिंग, सहाय्यक वनसंरक्षक हरिलाल सरोदे आणि वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी यांच्या मार्गदर्शनाखाली वनकर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.

विहिरीत पडलेल्या नीलगाईंना बाहेर काढण्यासाठी वनकर्मचाऱ्यांनी मोठी कसरत केली. जी. एस. सयाम, ए. एम. ढाले, पी. डी. कनेरी, ए. आर. पठाण, एम. आर. गांडोळे आणि जी. एस. बहाडे यांनी विहिरीत रॅम्प तयार करून पाचही नीलगाईंना सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यानंतर त्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले.

जंगलातील नैसर्गिक पाणवठे कोरडे पडल्याने वन्यप्राणी पाण्याच्या शोधात गाव व शेतशिवाराकडे वळत असल्याचा अंदाज वनविभागाने व्यक्त केला आहे. वाढत्या उष्णतेमुळे वन्यजीवांसाठी पाण्याची व्यवस्था करण्याची गरजही या निमित्ताने अधोरेखित झाली आहे.

# फांद्यांच्या कचाट्यात अडकून युवकाचा अंत

### झाड तोडताना भीषण अपघात; आर्वी तालुक्यातील घटनेने हळहळ

**वर्धा जनमाध्यम :** झाड तोडण्याचे काम जीवावर बेतल्याची हृदयद्रावक घटना आर्वी तालुक्यातील जुना सायखेडा येथे घडली. कडुनिंबाच्या झाडाची फांदी कापताना ती दुसऱ्या फांदीला अडकली आणि त्याच कचाट्यात युवकाचे डोके अडकल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. गुरुवारी सायंकाळी पाचच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

मंगेश चंद्रभान नागपुरे (३६) असे मृत युवकाचे नाव असून तो मूळचा सोनोरा (ढोक) येथील रहिवासी होता. काही महिन्यांपासून तो आर्वीच्या नेहरू वॉर्डमध्ये वास्तव्यास होता. मंगेश हा शुभम शैलेंद्र जळाये व शरद परतपुरे यांच्यासोबत जुना सायखेडा येथील हनुमान मंदिराजवळ कडुनिंबाचे झाड तोडण्याचे काम करीत होता.

मंगेश कटर घेऊन झाडावर चढला होता. दरम्यान मोठी फांदी कापल्यानंतर ती अचानक त्याच्याच दिशेने येऊन दुसऱ्या फांदीत अडकली. याचवेळी दोन फांद्यांच्या मध्ये मंगेशचे डोके अडकल्याने तो गंभीर जखमी झाला.

कमरेला दोरी बांधलेली असल्याने त्याला स्वतःची सुटका करता आली नाही.

घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी त्याला वाचविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. मात्र यश न आल्याने पोलिस पाटलांना माहिती देण्यात आली. त्यानंतर जेसीबीच्या सहाय्याने फांदी हटवून मंगेशला खाली उतरवण्यात आले.

तातडीने आर्वी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी आर्वी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेत पुढील तपास सुरू केला आहे.

## पद्म पुरस्कारासाठी अर्ज आमंत्रित

**वर्धा जनमाध्यम :** भारत सरकारच्यावतीने देण्यात येणा-या विविध राष्ट्रीय पुरस्कारांपैकी असलेल्या पद्म पुरस्कारासाठी जिल्ह्यातील इच्छुक पात्र व्यक्तींकडून अर्ज मागविण्यात येत आहे. इच्छिकांनी १५ जुन पर्यंत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलच्या https://awards.gov.in या संकेतस्थळावर अर्ज सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पद्म पुरस्कार हा पद्मविभुषण, पद्मभूषण आणि पद्मश्री हे देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक आहेत. गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्याकडून २०२७ च्या प्रजासत्ताक दिनाच्यानिमित्ताने जाहीर केल्या जाणा-या पद्म पुरस्कारासाठी राज्यातून नामांकने मागविण्यात येत आहे.

# वर्ध्यात १२ केंद्रांवर गट 'ब' परीक्षा; प्रशासनाची जय्यत तयारी

### १२ केंद्रांवर ३१२९ उमेदवारांची रविवारी परीक्षा; पारदर्शकतेसाठी कडक नियोजन

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र गट 'ब' (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा रविवारी (१४ जून) जिल्ह्यातील १२ परीक्षा केंद्रांवर होणार असून, त्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले आहे. परीक्षेच्या सुरळीत आणि पारदर्शक आयोजनासाठी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील विविध केंद्रांवरून एकूण ३ हजार १२९ परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत. शहरातील जानकी देवी बजाज विज्ञान महाविद्यालय, गो. से. वाणिज्य महाविद्यालय, सुशिल हिमतसिंगका विद्यालय, न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय, रत्नीबाई विद्यालय, केसरीमल कन्या विद्यालय, यशवंत महाविद्यालय, न्यू आर्ट्स-कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज, भरत ज्ञान मंदिरम् कॉन्व्हेंट अँण्ड ज्युनिअर कॉलेज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालय तसेच पिपरी मेघे येथील अग्रग्रामी हायस्कूल व श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा विद्यालय येथे परीक्षा होणार आहे.

परीक्षा सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत होणार असून, व्यवस्थापनासाठी उपकेंद्र प्रमुख, पर्यवेक्षक, समादेशक, लिपिक व शिपाई असे एकूण २७६ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जानकी देवी बजाज विज्ञान महाविद्यालय येथे ३६०, गो. से. वाणिज्य महाविद्यालयात २४०, सुशिल हिमतसिंगका विद्यालयात २१६, न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयात ३६०, रत्नीबाई विद्यालयात २४०, केसरीमल कन्या विद्यालयात २४०, यशवंत महाविद्यालयात २८८, न्यू आर्ट्स-कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेजमध्ये २४०, भरत ज्ञान मंदिरम् कॉन्व्हेंट अँण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये १७७, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यालयात २४०, अग्रग्रामी हायस्कूलमध्ये २८८ तसेच श्रीकृष्णदास जाजू ग्रामीण सेवा विद्यालयात २४० परीक्षार्थी परीक्षा देणार आहेत.

**परीक्षार्थ्यांना एक तास आधी हजर राहण्याचे आवाहन**

परीक्षा केंद्राच्या प्रवेशद्वारावरच उमेदवारांची तपासणी करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्र परिसरात मोबाईल वापरण्यास बंदी राहणार असून, परीक्षार्थ्यांनी परीक्षा सुरू होण्याच्या किमान एक तास आधी केंद्रावर उपस्थित राहावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**परीक्षेसाठी नियुक्त मनुष्यबळ**

- नोडल अधिकारी : १
- उपकेंद्र प्रमुख : १२
- पर्यवेक्षक : ४९
- समादेशक : १६३
- लिपिक : २४
- शिपाई : ४८

# न्यायालयाच्या आदेशाने विरुळ ग्रामपंचायतीत जुनीच कमेटी पुन्हा सत्तेवर

### दोन वर्षांपासून रखडलेला कारभार मार्गी लागण्याची अपेक्षा; पाणीटंचाईसह विकासाच्या प्रश्नांकडे लागले गावकऱ्यांचे लक्ष

**विरुळ आकाजी जनमाध्यम :** न्यायालयाच्या आदेशानंतर विरुळ ग्रामपंचायतीवर पुन्हा जुन्याच सरपंच, उपसरपंच व सदस्यांची प्रशासकीय कमेटी स्थापन करण्यात आली असून आता ग्रामपंचायतीचा कारभार हीच मंडळी पाहणार आहेत. नुकताच जुन्या कमेटीचा पदग्रहण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी ग्रामविकास अधिकारी मनवरे यांनी सभेचे वाचन करून सरपंच व उपसरपंच यांना पदभार सोपविला.



गेल्या दोन वर्षांपासून विरुळ ग्रामपंचायतीत लोकप्रतिनिधी नसल्याने गावाच्या विकासकामांना अक्षरशः खीळ बसली होती. अनेक योजना रखडल्या, तर मूलभूत सुविधांचे प्रश्न गंभीर बनले. विशेषतः गावात निर्माण झालेली पाणीटंचाई नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असून विविध विकासकामेही प्रलंबित आहेत. त्यामुळे नव्याने स्थापन झालेल्या प्रशासकीय कमेटीकडून गावकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका अद्याप न झाल्याने जिल्ह्यातील सरपंच संघटनेने न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने संघटनेच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर जुन्या पदाधिकाऱ्यांनाच प्रशासकीय स्वरूपात पुन्हा जबाबदारी देण्यात आली आहे.

कार्यक्रमाला सरपंच दुर्गाप्रसाद मेहेर, उपसरपंच नितीन पोलके, सदस्य सिंधु कोकड्डे, ज्ञानेश उईके, कैलास उपासे, पुरुषोत्तम पेटकर, निर्मला गोरे, कल्याताई, ज्येष्ठ नागरिक आनंदराव काटाने, प्रमोद सोनटक्के, पोलीस पाटील नीरज तुरके, पत्रकार विनोद महाजन, छोटू मेश्राम, अविनाश तेलंग, सूरज भेदूरकर यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## नोएडा येथून आंतरराज्यीय टोळीतील तिघे जेरबंद

**अमरावती/प्रतिनिधी:-** ३० लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाल्याचे आमिष दाखवून एका ६७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची तब्बल १३ लाख ८७ हजार ७०० रुपयांची ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या आंतरराज्यीय सायबर टोळीचा पर्दाफाश करण्यात अमरावती शहर सायबर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी उत्तर प्रदेशातील नोएडा येथून तिघा आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून मोबाईल, बँकिंग साहित्य व इतर पुरावे जप्त करण्यात आले आहेत. सक्करसाथ परिसरातील रहिवासी सुधीर बालकृष्ण भंडारी यांनी यापूर्वी एका वित्तीय संस्थेकडून घेतलेले कर्ज पूर्णपणे फेडले होते. दरम्यान, जानेवारी २०२६ मध्ये स्वतःला वित्तीय कंपनीचा प्रतिनिधी सांगणाऱ्या अज्ञात व्यक्तीने त्यांच्याशी संपर्क साधून ३० लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाल्याचे सांगितले. त्यानंतर प्रक्रिया शुल्क, फाईल मंजुरी, अधिकारी शुल्क आणि इतर कारणे सांगत आरोपींनी वेळोवेळी पैसे मागितले.

# एमआरपीच्या नावाखाली ग्राहकांची लूट; ग्राहक पंचायत रस्त्यावर

### गांधी पुतळ्यासमोर संतप्त आंदोलन; प्रशासनाला दिला इशारा

**वर्धा जनमाध्यम :** बाजारात वस्तूंवर छापलेल्या एमआरपीपेक्षा अधिक दर आकारून ग्राहकांची सर्रास होत असलेली आर्थिक लूट थांबविण्यात शासन अपयशी ठरत असल्याचा संताप व्यक्त करत अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा वर्धाच्या वतीने शुक्रवारी महात्मा गांधी पुतळ्यासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले. ग्राहकांची फसवणूक बंद करा, एमआरपीच्या नावाखाली चाललेली लूट रोखा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

देशव्यापी आंदोलनाचा एक भाग म्हणून जिल्हाध्यक्ष सतीश देशमुख यांच्या नेतृत्वात सकाळी १० वाजता निषेध नोंदविण्यात आला. यानंतर उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करून बाजारातील मनमानी दरवाढ, एमआरपीपेक्षा अधिक दर आकारणाऱ्या व्यावसायिकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

ग्राहक पंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी ग्राहक हा केवळ पैसे देणारा नाही, तर त्याला न्याय मिळालाच पाहिजे, असा इशारा देत प्रशासनाने तातडीने कारवाई न केल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त केला.आंदोलनात नंदू नरोटे, दिलीप जवदंड, अमृत सावरकर, टी. जी. पुष्पलकार, आकाश दाते, किशोर मुटे, भोजराज पाटील, विभा देशमुख, प्रणिता कश्यप व कल्याणी मुळे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

e paper www.janmadhyam.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# मदतीच्या नावाखाली शेतक-याच्या पदरी आजारी बैल

## प्रशासनाचा अजब कारभार, आधी केला गाजावाजा, आता दुसरा बैल दिला

**लातूर/मुंबई /प्रतिनिधी-** वीज कोसळून एका बैलाचा मृत्यू झाल्याने देवणी तालुक्यातील बोंबळी येथील शेतकरी काशिनाथ गायकवाड यांनी पैशांअभावी बैल खरेदी करता येत नसल्याने थेट आपल्या पत्नीलाचा औताला जुंपून शेतीची मशागत सुरू केली होती. शेतकरी काशिनाथ गायकवाड यांची व्यथा पाहून संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. त्यानंतर प्रशासनाने १० जून रोजी तातडीने त्यांना एक बैल दिला. त्याचा गाजावाजाही झाला. परंतु प्रशासनाचा कारभार किती संवेदनाहीन आहे, याची प्रचिती २ दिवसांत आली. कारण प्रशासनाने गोशाळेतील एक आजारी बैल शेतक-यांच्या पदरात टाकला. हा प्रकार समोर येताच सर्वत्र संताप व्यक्त होत असतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा या प्रकाराची दखल घेउन दुसरा बैल देण्याचे आदेश दिले. आता या शेतक-याला दुसरा बैल मिळाला आहे.देवणी तालुक्यातील शेतक-याचा बैल वीज पडून मृत्युमुखी पडल्याने बोंबळीचे शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्यावर चक्क पत्नीला औताला जुंपण्याची वेळ आली. यासंबंधीचे वृत्त समोर येताच मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांनी या शेतक-याला तातडीने बैल उपलब्ध करून देण्याचा आदेश दिला. त्यावेळी जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागाने लगेचच बैलही उपलब्ध करून दिला. या शेतक-याला तातडीने मदत मिळाल्याने याचे कौतुकही झाले. परंतु दोनच दिवसांत शेतात काम करताना हा बैल खाली बसला आणि त्याने मान टाकली. त्यानंतर पशुवैद्यकीय डॉक्टरांनी तपासणी केली असता हा बैल गंभीर आजारी असल्याचे समोर आले. त्यामुळे शेतक-याला मदत मिळण्याऐवजी बैलाच्या औषध-पाण्याला खर्च करण्याची वेळ या शेतक-यावर आली. यामुळे शेतक-यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. संकटात सापडलेल्या शेतक-याला शेतीच्या कामासाठी सक्षम आणि सुदृढ बैल देण्याऐवजी तात्काळ मदत केल्याचा गाजावाजा करून पाठ थोपटून घेण्यासाठी प्रशासनाने गोशाळेतील आजारी बैल शेतक-याच्या गळ्यात मारल्याची चर्चा देवणी तालुक्यात रंगली असून, शेतक-यांमधून संताप व्यक्त होत आहे.

**मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल, नवा बैल देण्याचा आदेश**

प्रशासनाच्या या अजब कारभाराची बातमी वा-यासारखी पसरताच सरकारवर चौफेर टीका होत आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूरच्या जिल्हाधिका-यांना तातडीने आदेश दिले असून, शेतकरी काशिनाथ गायकवाड यांना त्यांच्या पसंतीचा आणि संपूर्ण सुदृढ असलेला नवीन बैल खरेदी करून देण्यात यावा, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

**रेणापूरच्या बाजारातून, घेउन दिला बैल-** शेतक-याला बैल देताना जिल्हा प्रशासनाने केलेली चूक मुख्यमंत्र्यांच्या लक्षात येताच त्यांनी तातडीने दखल घेउन या शेतक-याला दुसरा बैल देण्याचे आदेश दिले. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने तातडीने हालचाल करीत रेणापूरच्या बाजारातून सुदृढ बैल खरेदी केला आणि काशिनाथ गायकवाड यांना दुसरा बैल दिला. त्यामुळे शेतकरी गायकवाड यांनी समाधान व्यक्त केले.

### पं.बंगालमध्ये सरकारी इमारतीला भीषण आग

# निवडणुकीत वापरलेले 4,000 EVM जळून खाक

**कोलकाता/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगालमधील एका सरकारी इमारतीला भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या आगीत सुमारे ४,००० इलेक्ट्रानिक मतदान यंत्रे (EVM) जळून खाक झाली. हे ईव्हीएम मशिन विधानसभा निवडणुकीदरम्यान वापरली होती. ही माहिती सुवेंदू सरकारमधील मंत्री कौशिक चौधरी यांनी दिली. 'या घटनेप्रकरणी एफआयआर दाखल झाल्यानंतर



पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. दक्षिण कोलकाताच्या अलीपूर भागातील नउ मजली इमारतीला बुधवारी भीषण आग लागली. या इमारतीत इतर विभागांव्यतिरिक्त दक्षिण २४ परगणा जिल्हा परिषदेचे कार्यालयही होते. मंत्री चौधरी म्हणाले, आगीत ४,००० ईव्हीएम नष्ट झाल्या आहेत. यावर्षी झालेल्या राज्य विधानसभा निवडणुकीदरम्यान १० मतदारसंघांमध्ये हे ईव्हीएम वापरण्यात आले होते, 'ही सामान्य आग वाटत नाही. यात काही घातपात झाला होता का, याचा आम्ही तपास करत आहोत. आग नवव्या आणि दहाव्या मजल्यांपर्यंत कशी पोहोचली हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.' त्यांनी सांगितले की, इमारतीच्या दुस-या आणि तिस-या मजल्यावर आधी आग लागलेली दिसली.'चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या मजल्यांना कोणताही धोका न पोहोचवता आग सातव्या आणि आठव्या मजल्यांपर्यंत कशी पोहोचली? संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू आहे,' असेही चौधरी म्हणाले. घटनेची अधिक चांगली माहिती मिळवण्यासाठी आपण फारेन्सिक अहवालाची वाट पाहत असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, आग लागल्यानंतर जवळपास २४ तासांनीही अग्निशमन दल आग विझवण्यासाठी प्रयत्न करत होते. सकाळी आगीच्या ज्वाला दिसत नसल्या तरी, वेगवेगळ्या ठिकाणी आग लागण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे अधिका-यांनी सांगितले. ही आग विजेच्या बिघाडामुळे लागली की इतर कोणत्या कारणामुळे, याचा तपास अधिकारी शोध घेत आहेत. 'आगीचे नेमके कारण अद्याप निश्चित झालेले नाही. आग अनेक मजल्यांवर कशी पसरली याचा तपास अधिकारी करत असल्याने, इमारत सील करण्यात आली असून आत-बाहेर जाण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. पोलिसांनी इमारतीच्या आजूबाजूला पाळतही वाढवली आहे.

### लॅपटॉपमुळे डिजिटल कृषी प्रशासनाला चालना -कृषी मंत्री

# पंधरा दिवसांत क्षेत्रीय अधिकारी व कर्मचा-यांना लॅपटॉपचे वितरण

**मुंबई/प्रतिनिधी :** 'महाराष्ट्र हे खास कृषीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) धोरण स्वीकारणारे देशातील पहिले राज्य आहे. शासनाच्या कृषी योजनांची अंमलबजावणी आणि लाभार्थी सेवा आता मोठ्या प्रमाणावर डिजिटल माध्यमातून होत आहेत. त्यामुळे कृषी विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेला आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज करणे ही काळाची गरज आहे. क्षेत्रीय अधिकारी व कर्मचा-यांना लॅपटॉपसारखी आवश्यक डिजिटल साधनसामग्री उपलब्ध झाल्यामुळे योजनांची माहिती तात्काळ ऑनलाइन नोंदविणे, कागदपत्रे अपलोड करणे आणि शेतक-यांच्या अर्जांवर तत्पर कार्यवाही करणे अधिक सुलभ होणार आहे. परिणामी, शेतक-यांना योजनांचा लाभ मिळण्यास होणारा विलंब कमी होउन सेवा वितरण अधिक वेगवान आणि प्रभावी होईल. अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. राज्यातील १३,२७५ क्षेत्रीय अधिकारी व कर्मचा-यांना लॅपटाप उपलब्ध करून देण्यासाठी १०९ कोटी रुपयांच्या निधीस शासनाने मान्यता दिली आहे. सदर लॅपटापचा पुरवठा जुलै २०२६ अखेर पूर्ण होण्याचे नियोजन असून ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सर्व संबंधित अधिकारी व कर्मचा-यांपर्यंत ते पोहोचविण्यात येतील. पुरवठादाराकडून प्राप्त होणा-या प्रत्येक लॅपटापची १०० टक्के गुणवत्ता तपासणी करण्यात येणार असून ही तपासणी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे या स्वतंत्र त्रयस्थ संस्थेमार्फत केली जाणार आहे. कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली १३,२७५ क्षेत्रीय कृषी अधिकारी व कर्मचा-यांना अत्याधुनिक लॅपटाप देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# गुटखा, पानमसाला विक्रेत्यांना थेट मकोका लागणार

## जामीन मिळणेही कठीण; मुंढे यांचे अंमलबजावणीचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील गुटखा, तंबाखू व निकोटीनयुक्त पानमसाला यांसारख्या प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या अवैध व्यापाराविरुद्ध कठोर कारवाई करताना संबंधित गंभीर प्रकरणांमध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मकोका) १९९९ लागू करण्याचे स्पष्ट निर्देश अन्न व औषध प्रशासन (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत.सार्वजनिक आरोग्याला धोका निर्माण करणा-या प्रतिबंधित अन्नपदार्थांच्या उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण आणि विक्रीवर आधीच बंदी असतानाही काही ठिकाणी संघटित स्वरूपात अवैध व्यापार सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर केवळ किरकोळ विक्रेत्यांवर नव्हे, तर संपूर्ण पुरवठा साखळीवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

FDA च्या माहितीनुसार, अनेक प्रकरणांमध्ये उत्पादक, वितरक, वाहतूकदार, गोदाम चालक, घाउक विक्रेते आणि किरकोळ विक्रेते यांचा परस्पर संबंध असलेले जाळे कार्यरत असते. बनावट कागदपत्रे, बेनामी व्यवहार, गुप्त गोदामे आणि आंतरराज्य पुरवठा साखळीच्या माध्यमातून हा व्यापार चालविला जात असल्याचे आढळले आहे.मकोका कायद्यातील तरतुदीनुसार



एखादा गुन्हा तीन वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षापात्र असेल, मागील दहा वर्षांत एकापेक्षा अधिक आरोपपत्रे दाखल झाली असतील आणि गुन्हे आर्थिक लाभासाठी संघटित पद्धतीने करण्यात आले असतील, तर अशा प्रकरणांमध्ये मकोका लागू करण्याची पात्रता तपासली जाणार आहे.

**जामिनासाठी जाचक अटी-**मकोका लागू असलेल्या प्रकरणांमध्ये जामीन मिळविण्यासाठी कठोर अटींची पूर्तता करावी लागणार असून सरकारी अभियोक्ता, पोलिस आणि FDA यांच्यातील समन्वयाद्वारे न्यायालयात प्रभावी बाजू मांडण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.FDA ने नागरिकांना आवाहन केले आहे की, गुटखा, तंबाखू किंवा निकोटीनयुक्तपानमसाला तसेच इतर प्रतिबंधित अन्नपदार्थांचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, वितरण किंवा विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ स्थानिक अन्न व औषध प्रशासन कार्यालय अथवा पोलिसांना कळवावे.

अधिका-यांनी स्पष्ट केले आहे की, कायद्याचे पालन करणा-या व्यापा-यांना कोणताही त्रास देण्याचा उद्देश नसून सार्वजनिक आरोग्याशी खेळ करणा-या संघटित गुन्हेगारांविरुद्ध कठोर आणि पुराव्यांवर आधारित कारवाई करण्यात येणार आहे. प्रतिबंधित अन्नपदार्थांचा अवैध व्यापार हा केवळ नियमभंग नसून सार्वजनिक आरोग्याविरुद्धचा गंभीर संघटित गुन्हा मानून हाताळला जाणार आहे.

# मीनाक्षी नटराजन यांची याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली :** राज्यसभा निवडणुकीसंदर्भात काँग्रेस नेत्या मीनाक्षी नटराजन यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. राज्यसभा निवडणुकीसाठी दाखल केलेला त्यांचा उमेदवारी अर्ज रिटर्निंग ऑफिसरने (आरओ) रद्द केल्यानंतर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने शुक्रवारी त्यांची याचिका फेटाळून लावत या प्रकरणात हस्तक्षेप करण्यास नकार दिला. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, निवडणूक प्रक्रिया सुरू



झाल्यानंतर न्यायालयाला अशा प्रकरणांमध्ये हस्तक्षेप करता येत नाही. त्यामुळे मीनाक्षी नटराजन यांची याचिका सुनावणीस पात्र नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. न्यायालयाने सांगितले की, निवडणूक लढवणा-या उमेदवारांसाठी फार्म २६ अंतर्गत प्रतिज्ञापत्राद्वारे सर्व आवश्यक माहिती देणे बंधनकारक आहे. यामध्ये उमेदवाराविरोधातील गुन्हेगारी प्रकरणांची माहिती देणेही आवश्यक आहे. फक्त आरोपपत्र दाखल झालेले किंवा न्यायालयाने दखल घेतलेली प्रकरणेच नव्हे, तर नियमांनुसार आवश्यक असलेली सर्व माहिती उमेदवाराने जाहीर करणे अपेक्षित असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीदरम्यान प्रसिद्ध पुन्नूस्वामी प्रकरणाचा दाखला दिला. या निकालानुसार, निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यानंतर उमेदवारी अर्ज स्वीकारणे किंवा फेटाळणे यासारख्या निर्णयांमध्ये न्यायालय थेट हस्तक्षेप करू शकत नाही. न्यायालयाने म्हटले की, अशा प्रकारच्या वादांवर उपाय शोधायचा असल्यास निवडणूक याचिकेचा मार्ग स्वीकारावा लागतो. रिट याचिकेद्वारे या टप्प्यावर दिलासा मिळू शकत नाही.

**रिटर्निंग ऑफिसरचा निर्णय योग्य-** सर्वोच्च न्यायालयाने रिटर्निंग ऑफिसरने उमेदवारी अर्ज रद्द करण्याचा घेतलेला निर्णयही योग्य असल्याचे मान्य केले. त्यामुळे मीनाक्षी नटराजन यांना मोठा धक्का बसला असून त्यांच्यासाठी आता निवडणूक याचिकेचा पर्यायच उपलब्ध आहे. या निर्णयामुळे राज्यसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसला राजकीय आणि कायदेशीर पातळीवर मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.

# इराण-अमेरिकेत 14 कलमी करार!

## होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणार


**तेहरान /वृत्तसंस्था-**मागील काही महिन्यांपासून अमेरिका आणि इराणमध्ये तणाव सुरू आहे. होर्मुझ सामुद्रधुनी बंद असल्यामुळे याचा परिणाम जागतिक व्यापारावर झाला आहे. त्यातच आता अमेरिका आणि इराणमध्ये करार झाल्याचे समोर आले असून, त्यानुसार होर्मुझची सामुद्रधुनी खुली होणार असल्याचे समजते. अमेरिका आणि इराण यांच्यात १४ कलमी करार झाला असून, या दोन्ही देशांतील प्रस्तावित शांतता कराराच्या अटी उघड झाल्या आहेत. इराणच्या निमसरकारी मेहेर वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार मसुदा करारात १४ महत्त्वाची मुद्दे आहेत. त्यातील पहिला मुद्दा लेबन?नमधील सुरू असलेल्या संघर्षासह सर्व आघाड्यांवरील शत्रुत्व तात्काळ कायमस्वरुपी संपुष्टात आणणे हा आहे. या करारानुसार होर्मुझची सामुद्रधुनी ३० दिवसांच्या आत पुन्हा उघडण्याचा प्रस्ताव आहे. मात्र, तिचे कामकाज इराणच्या देखरेखीखाली असमार आहे. मसुद्यानुसार अमेरिका इराणच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाही आमि त्यांच्या सार्वभौमत्वाचा आदर करेल. इतकेच नव्हे तर अमेरिकेला ३० दिवसांच्या आत नौदल नाकेबंदी उठवावी लागेल आणि इराणच्या आसपासाची आपली लष्करी उपस्थिती कमी करावी लागणार आहे. या अटींना इराण किंवा अमेरिकेकडून अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. अहवालानुसार कराराचा मसुदा अद्याप अंतिम झालेला नाही आणि तो इराणच्या सर्वोच्च नेतृत्वाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. करारावर स्वाक्षरी झाल्यावर लेबनानसह सर्व आघाड्यांवर ६० दिवसांची युद्धबंदी सुरू होईल. होर्मुझची सामुद्रधुनी खुली केली जाईल आणि त्यातून जाणा-या जहाजांकडून इराण कोणतेही शुल्क आकारणार नाही. करार झाल्यानंतर ३० दिवसांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतील वाहतूक युद्धपूर्व पातळीवर परत येईल.

# पावसाळी अधिवेशनात सादर होणार महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक-मुख्यमंत्री

### महिला शेतक-यांना मिळणार स्वतंत्र ओळख

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील महिला शेतक-यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक २०२६ पावसाळी अधिवेशनात सादर केले जाणार आहे. महिला शेतक-यांच्या हक्कांचे संरक्षण होउन त्यांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाला चालना मिळावी यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. वर्षा निवासस्थान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक सादरीकरण झाले. त्यावेळी मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी व्हिडीओ क?न्फरन्सच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, कृषी राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यातील कृषी क्षेत्रात ८१ टक्क्यांहून अधिक महिलांचा सहभाग आहे. बहुतांश कृषी धोरणे व शासकीय योजना पुरुषकेंद्री आहेत. कृषी योजनांचा लाभ महिलांना मिळावा यासाठी जमिनीची मालकी ही अट असल्याने मोठ्या संख्येने महिला शेतकरी योजनांपासून वंचित राहतात. कुटुंबाच्या किंवा सामुदायिक जमिनीवर शेती करणा-या महिला, तसेच मत्स्यव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन, वनउपज संकलन यांसारख्या पूरक व्यवसायांमध्ये कार्यरत महिलांनाही शेतकरी म्हणून मान्यता मिळत नाही. या पार्श्वभूमीवर हे विधेयक तयार करण्यात आले आहे.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्व सूचनांचा विचार करून विधेयकाचा अंतिम मसुदा तयार करा.कृषी क्षेत्रातील महिलांना शेतकरी म्हणून वैधानिक मान्यता देणे, त्यांच्यासाठी संस्थात्मक यंत्रणा उभारणे, कर्ज, तंत्रज्ञान, बाजारपेठ व विविध सेवा महिलांपर्यंत पोहोचविणे हा उद्देश असावा. पारंपरिक शेतीबरोबरच पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय, रेशीम उद्योग, बागायती, फुलशेती, मशरूम उत्पादन, कृषी वनीकरण, वनउपज संकलन अशा विविध उपक्रम तसेच भूमिहीन शेतकरी, भाडेकरू शेतकरी, शेतमजूर, चराई व्यवसाय करणारे आणि स्थलांतरित कृषी कामगार यांचाही यामध्ये समावेश करावा. महिलांना राज्य शासनाच्या कर्ज योजना, कृषी अनुदाने, बियाणे, खते, पीक विमा, विस्तार सेवा, बाजारपेठ सुविधा, वाहतूक, साठवणूक आणि सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळू शकेल अशी डिजिटल प्रभावी यंत्रणा कार्यान्वित होण्यासाठी सर्व अभ्यास करावा. महिला शेतक-यांचा स्वतंत्र डिजिटल डेटाबेस तयार करणे या बाबींचा समावेश करावा.

**महिला शेतक-यांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी-**महिला शेतक-यांच्या सक्षमीकरणासाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य महिला शेतकरी निधी स्थापन करणे, विधेयकाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यंत्रणा यांचा देखील अभ्यास केला जावा. जिल्हा आणि तालुका व गावस्तरापर्यंत मजबूत यंत्रणा असली पाहिजे. या कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय देखरेख समिती असावी जेणेकरून या कायद्याच्या अंमलबजावणीचे नियमित परीक्षण करेल. हे विधेयक राज्यातील लाखो महिला शेतक-यांना स्वतंत्र ओळख, हक्क आणि संधी उपलब्ध करून देणारे महत्त्वपूर्ण पाउल ठरणार असून कृषी क्षेत्रात लिंगसमतेच्या दिशेने एक नवा आदर्श निर्माण करेल असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.यावेळी महिला सक्षमीकरण विधेयकाचे सादरीकरण कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह यांनी केले.

या बैठकीला मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) विकास चंद्र रस्तोगी, नियोजन विभागाच्या सचिव ए शैला, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, विधि व न्याय विभागाचे प्रधान सचिव दिलीप घुमरे, विधि व न्याय विभागाच्या सचिव सुप्रिया धावरे, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, ग्राम विकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, पदुम विभागाचे सचिव ड? एन.रामास्वामी, महिला व बाल विकास विभागाचे सचिव अनुप कुमार यादव, व्ही.सी.व्दारे एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या अध्यक्ष सौम्या स्वामीनाथन, विधि सेंटर फार लीगल पालिसीच्या जिनाली दानी तसेच एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाउंडेशनच्या प्रतिनिधी तेजश्री उपाध्ये आणि दर्शिता तुमणे यावेळी उपस्थित होते.

# राज्यातील सर्व ग्रामीण पाणीपुरवठा योजना सौर उर्जेवर आणणार-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या राज्यामध्ये कार्यान्वित असलेल्या अनेक पाणी पुरवठा योजनांच्या देयकांची थकबाकी वाढत आहे. यापुढे मात्र राज्यातील सर्व ग्रामीण पाणीपुरवठा योजना सौर उर्जेवर आणण्यात याव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वर्षा निवासस्थानी आयोजित ग्रामीण पेयजल धोरण बैठकीत दिले. तसेच याकरिता विभागाने सर्वंकष धोरण आखण्याच्या सूचनाही दिल्या.बैठकीस पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील. राज्यमंत्री ?ड. आशिष जयस्वाल उपस्थित होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पाणीपुरवठा योजनेचा स्रोत, योजनेवर अवलंबून असलेल्या नागरिकांची संख्या, मोटार पंपाची क्षमता, संपूर्ण योजनेसाठी लागणा-या एकूण वीज युनिटची संख्या आदी लक्षात घेउन महाराष्ट्र उर्जा विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून संपूर्ण योजनांसाठी सौर उर्जेचे धोरण तयार करावे. राज्यामध्ये कुठेही वीज देयकांच्या थकबाकीमुळे पाणीपुरवठा योजना बंद पडू नये, याची काळजी घ्यावी. केंद्र सरकारच्या निकषानुसार दरडोई दरदिवशी ५५ लिटर पाणी पुरविले पाहिजे, यानुसार योजना पूर्णत्वास न्याव्यात.सर्व ग्रामीण प्रादेशिक व स्वतंत्र पाणीपुरवठा पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्ती व देखभालीसाठी तालुका



स्तरावर युनिटची स्थापना करण्यात यावी. या युनिटमध्ये तालुक्यातील ग्रामपंचायतींचा सहभाग घेण्यात यावा. पाणीपट्टीच्या वसुलीतून योजनेच्या देखभाल दुरुस्तीचा खर्च करण्यात यावा. ज्या ठिकाणी पाणी कराची कमी वसुली असेल, अशा ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निधीमधून रक्कम उपलब्ध करून देण्यात यावी. अशा युनिटच्या माध्यमातून देखभाल दुरुस्तीची किंमतही कमी येईल आणि योजनाही बंद पडणार नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. तालुका स्तरावर युनिटच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी एजन्सीची सूची तयार करावी. ग्रामसभेच्या ठरावाने या सूचीमधील एजन्सीकडून पाणीपुरवठा योजनेची देखभाल दुरुस्ती करावी. या व्यवस्थेमुळे कुठलीही पाणीपुरवठा योजना देखभाल दुरुस्तीअभावी बंद पडणार नाही. ग्रामीण भागामध्ये पाणीपुरवठा योजनेचा स्त्रोत हा शाश्वत असला पाहिजे. काही ठराविक कालावधीने पुन्हा नवीन स्त्रोत शोधून पाणीपुरवठा योजना करण्यात येउ नये. त्यामुळे आधीच्या योजनेवरील खर्चाचा उपयोग होत नाही. 'व्हीबी जी रामजी' या योजनेतून पाणीपुरवठ्याचे स्त्रोत सक्षमीकरण करण्यास निधीची उपलब्धता होत आहे, त्यामुळे योजनेच्या माध्यमातून अशा प्रकारे पाण्याच्या स्त्रोतांचे बळकटीकरण करण्यात यावे. ज्यामुळे भविष्यात पाणीपुरवठा योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित राहील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. पुनर्जोडणी योजनांबाबत सुचित करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ५० टक्क्यांचा वर काम पूर्ण झालेल्या पुनर्जोडणी योजनांना निधी देण्यात यावा आणि अशा योजना पूर्ण कराव्यात.

# जेलमध्ये जावे लागले तर सर्वात आधी मी जाईनः अभिजीत

## कुणीही मागे हटणार नाही, आंदोलन करणे ही सर्वात मोठी देशभक्ती; लखनौत CJPचे आंदोलन

**लखनौ/नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दीपके म्हणाले की, आपला देश एका आंदोलनातून घडला होता. आंदोलन झाले नसते तर आज स्वातंत्र्यही मिळाले नसते. जर देशात आणीबाणीविरोधात आंदोलन झाले नसते तर आज लोकशाही नसती. आंदोलन करणे ही सर्वात मोठी देशभक्ती आहे.

ते म्हणाले, सरकारला प्रश्न विचारण्यास कोणीही घाबरत नाही. आपल्याला हे आंदोलन सुरू ठेवायचे आहे. कोणीही मागे हटणार नाही. जर तुरुंगात जाण्याची गरज पडली तर, सर्वात आधी मी तुरुंगात जाईन. लेखपाल असो, UPSI असो, NEET असो किंवा CBSE, जे कोणी पेपर लीक करण्यास दोषी असतील, त्या सर्वांना राजीनामा द्यावा लागेल.अभिजीत दीपके यांनी आज, शुक्रवारी लखनौच्या इको गार्डनमध्ये हे सांगितले. इको गार्डनमध्ये विद्यार्थी आणि वन-डे परीक्षेची तयारी करणा-या सुमारे ६ हजार उमेदवारांनी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत निदर्शने केली. अभिजीत दीपकेही यात सहभागी झाले होते. ते सुमारे ४० मिनिटे थांबले. त्यांनी सर्व लोकांना २० जून



रोजी दिल्लीला येण्याचे आवाहन केले.

तरीही, काही विद्यार्थी-उमेदवारांनी कॉकरोच पार्टी आणि अभिजीत दीपके यांचा विरोधही केला. ते म्हणाले- आमच्या या आंदोलनाचा काकरोच पार्टीशी काहीही संबंध नाही. ते राजकारण करत आहेत. जर अभिजीत दीपके इथे आले, तर आमचं आंदोलन उद्ध्वस्त होईल.

**पोलिसांच्या सुरक्षा कवचात अभिजीत दीपके पोहोचले**

अभिजीत गुरुवारी रात्री उशिरा २.२० वाजता लखनउला पोहोचले होते. त्यांनी टीम इंडियाचा टी-शर्ट घातला होता.



अमौसी विमानतळावर बोलताना दीपके म्हणाले होते- आम्ही दिल्ली आणि पुणेप्रमाणेच शांततापूर्ण आंदोलन करू. आम्ही कुठूनही काहीही चुकीचे करत नाही आहोत. फक्त लोकशाहीत आमची बाजू मांडत आहोत, जो आमचा संवैधानिक अधिकार आहे.शुक्रवारी दुपारी दीड वाजता अभिजीत दीपके हातात संविधानाचे पुस्तक घेउन इको गार्डनमध्ये पोहोचले. त्यांना पोलिसांनी सुरक्षा घे-यात आतपर्यंत पोहोचवले. आंदोलनादरम्यान RAF (रॅपिड अक्शन फोर्स), पीएसी आणि स्थानिक पोलिसांचे १५०० हून अधिक जवान तैनात होते. अभिजीत दीपके यांच्या काकरोच पार्टीने यापूर्वी ११ जून रोजी पुणे येथे आणि ६ जून रोजी दिल्लीतील जंतर-मंतरवर आंदोलन केले होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## उष्णतेचा ताण

आद्योगिकीकरणानंतर वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण वाढत गेले आणि पृथ्वीचे सरासरी तापमान सातत्याने वाढू लागले. परिणामी, जगभरात उष्णतेच्या लाटा अधिक तीव्र, अधिक वारंवार आणि अधिक काळ टिकणाऱ्या बनल्या आहेत. भारत त्याला अपवाद नाही. भारतीय हवामान विभागाच्या आकडेवारीनुसार उत्तर भारतात उष्णतेच्या लाटांची तीव्रता आणि कालावधी दोन्ही वाढले आहेत. पूर्वी पश्चिम राजस्थान आणि गुजरातच्या काही भागांपुरती मर्यादित असलेली भीषण उष्णता आता पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि गंगेच्या मैदानी प्रदेशातही मोठ्या प्रमाणावर जाणवू लागली आहे. तथापि, केवळ जागतिक तापमानवाढीचा आधार घेतल्यास पंजाब आणि हरियाणा, राजस्थानपेक्षा अधिक गरम का होत आहेत, या प्रश्नाचे पूर्ण उत्तर मिळत नाही. यासाठी स्थानिक पर्यावरणीय बदलांचा अभ्यास करावा लागतो. हरितक्रांतीनंतर पंजाब आणि हरियाणामध्ये गहू आणि भात या दोन पिकांवर आधारित शेती व्यवस्था विकसित झाली. सुरुवातीला ही व्यवस्था अन्नसुरक्षेसाठी वरदान ठरली. देश धान्य उत्पादनात स्वयंपूर्ण झाला; परंतु दीर्घकाळ एकाच पद्धतीची शेती केल्यामुळे पर्यावरणीय संतुलन बिघडू लागले. भात हे भरपूर पाण्याची गरज असलेले पीक आहे. पंजाब आणि हरियाणामध्ये मोठ्या प्रमाणावर भूजल उपसून भाताची शेती केली जाते. दशकानुदशके सुरू असलेल्या या प्रक्रियेमुळे भूजल पातळी झपाट्याने खाली गेली. जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याची क्षमता कमी झाली. याचा स्थानिक हवामानावर परिणाम होऊ लागला. भूजलाचा अतिवापर हा केवळ पाणीटंचाईचा प्रश्न नाही, तर तापमानवाढीशीही संबंधित आहे. जमिनीतील ओलावा कमी झाला, की माती सूर्याची उष्णता अधिक प्रमाणात शोषून घेते आणि तापमान वाढण्यास मदत होते. आज मोठ्या प्रमाणावर एकाच प्रकारच्या पिकांचे विस्तीर्ण पट्टे दिसतात. जैवविविधता ही कोणत्याही परिसंस्थेची नैसर्गिक संरक्षण भिंत असते. विविध वनस्पती आणि झाडे वातावरणातील तापमान नियंत्रित करण्यास मदत करतात. त्यांचे प्रमाण कमी झाले, की परिसर अधिक तापू लागतो. त्यामुळे पंजाब आणि हरियाणामधील कृषी समृद्धीनेच अनवधानाने उष्णतेच्या संकटाला निमंत्रण दिले आहे. गव्हाची कापणी झाल्यानंतरची परिस्थितीही ही समस्या तीव्र करते. एप्रिल आणि मे महिन्यात मोठ्या प्रमाणावर गव्हाची कापणी झाल्यानंतर विस्तीर्ण क्षेत्र उघडे पडते. कोणतेही संरक्षणात्मक आच्छादन नसल्याने ही जमीन थेट सूर्यकिरण शोषून घेते. दिवसभर जमा झालेली उष्णता आसपासच्या वातावरणाचे तापमान वाढवते. परिणामी मे आणि जून महिन्यांमध्ये जमिनीचे आणि हवेचे तापमान अधिक वाढते. हा परिणाम विशेषतः मैदानी भागात स्पष्टपणे जाणवतो. पराली जाळण्याचा मुद्दाही या संदर्भात महत्त्वाचा आहे. पीक काढणीनंतर शेतात उरलेले अवशेष मोठ्या प्रमाणावर जाळले जातात. यामुळे वातावरणात कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड आणि सूक्ष्म कणांचे उत्सर्जन होते. या प्रदूषणाचा परिणाम केवळ हवेच्या गुणवत्तेवर होत नाही, तर स्थानिक हवामान प्रक्रियांवरही होतो. जमिनीतील सेंद्रिय पदार्थ नष्ट होतात, मातीची गुणवत्ता खालावते आणि नैसर्गिक तापमान नियंत्रण यंत्रणा कमकुवत होते. पंजाब आणि हरियाणामधील वाढती आर्द्रता ही आणखी एक महत्त्वाची बाब आहे. सामान्यतः लोकांना वाटते, की कोरड्या प्रदेशातच अधिक उष्णता असते. प्रत्यक्षात आर्द्रता आढळल्यास मानवी शरीराला उष्णता अधिक तीव्र जाणवते. पंजाब आणि हरियाणामधील वनक्षेत्राचे प्रमाण देशातील सर्वात कमी राज्यांमध्ये गणले जाते. विडंबना अशी, की वाळवंटी राजस्थानमध्येही या दोन्ही राज्यांपेक्षा अधिक वनक्षेत्र आहे. झाडे केवळ कार्बन शोषून घेत नाहीत, तर बाष्पोत्सर्जनाद्वारे वातावरण थंड ठेवण्याचे काम करतात. त्यांच्या सावलीमुळे जमिनीचे तापमान कमी राहते. गावांभोवती असलेली पारंपरिक झाडे. तलाव आणि हिरव्या पट्ट्यांचे प्रमाण घटल्याने स्थानिक उष्णता वाढण्यास मदत झाली आहे. याशिवाय शहरीकरणाने परिस्थिती आणखी गुंतागुंतीची केली आहे. पंजाब आणि हरियाणातील अनेक शहरे झपाट्याने विस्तारत आहेत. नवीन महामार्ग, औद्योगिक क्षेत्रे, निवासी संकुले आणि काँक्रीटच्या इमारती मोठ्या प्रमाणावर उभ्या राहत आहेत. या सर्व पृष्ठभागांमध्ये दिवसाची उष्णता साठवून ठेवण्याची क्षमता जास्त असते. सूर्यास्तानंतरही ही उष्णता हळूहळू बाहेर पडत राहते. त्यामुळे रात्री तापमान कमी होत नाही. या प्रक्रियेला 'अर्बन हीट आयलंड इफेक्ट' असे म्हटले जाते. जगभरातील महानगरांमध्ये हा परिणाम दिसून येतो. आता तो उत्तर भारतातील मध्यम आकाराच्या शहरांमध्येही जाणवत आहे. रात्रीचे वाढते तापमान ही विशेष चिंतेची बाब आहे. दिवसा उष्णता वाढणे अपेक्षित असले, तरी रात्री वातावरणाला थंड होण्यासाठी वेळ मिळणे आवश्यक असते; परंतु रात्रीचे तापमानही उच्च राहते, तेव्हा शरीराला विश्रांती मिळत नाही. उष्माघात, हृदयविकार, श्वसनविकार आणि इतर आरोग्य समस्यांचा धोका वाढतो. दुसऱ्या बाजूने पाहता राजस्थानमधील कोरडे वातावरण रात्री जलद थंड होते. हवेतील आर्द्रता कमी असल्याने जमिनीतील उष्णता अवकाशात वेगाने निघून जाते. त्यामुळे दिवसाचे तापमान जास्त असले, तरी रात्री तुलनेने दिलासा मिळतो. पंजाब आणि हरियाणामध्ये मात्र आर्द्रता, काँक्रीटचे जाळे आणि शहरी उष्णतेचा प्रभाव यामुळे रात्रीही उकाडा कायम राहतो. त्यामुळे एकूण उष्णतेचा ताण अधिक वाढतो. या संकटाकडे केवळ हवामानाचा प्रश्न म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. हा विकासाच्या मॉडेलशी संबंधित प्रश्न आहे. उत्पादनवाढ, सिंचन विस्तार आणि शहरी विकास यावर भर देताना पर्यावरणीय परिणामांचा पुरेसा विचार करण्यात आला नाही. आता तापमानवाढ, पाणीटंचाई आणि आरोग्यविषयक संकटांच्या रूपाने त्याचे परिणाम समोर येत आहेत. उपायांचा विचार केला, तर सर्वप्रथम शेतीमध्ये विविधता आणणे आवश्यक आहे. भात गहू या चक्रावर अवलंबून राहण्याऐवजी कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. भूजल संवर्धन, ठिबक सिंचन आणि जलसंधारणाच्या उपाययोजना व्यापक प्रमाणावर राबवाव्या लागतील. पराली व्यवस्थापनासाठी शाश्वत पर्याय उपलब्ध करून देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वनक्षेत्र वाढवणे, गावोगावी हरित पट्टे विकसित करणे आणि पारंपरिक जलस्त्रोतांचे पुनरुज्जीवन करणे ही दीर्घकालीन गरज आहे.



# शेतीला गरज सर्वंकष पुनर्रचनेची

**कर्जमाफी ही संकटग्रस्त शेतकऱ्याला तात्पुरता दिलासा देते. ती आवश्यक आहे, कारण लाखो शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले आहेत. पण कर्जमाफी हे रोगावरील कायमस्वरूपी औषध नाही.**

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही आर्थिक संकटात सापडलेल्या लाखो शेतकऱ्यांसाठी निश्चितच दिलासादायक आहे. दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ आणि वन टाइम सेटलमेंट (ओटीएस) सारख्या तरतुदींमुळे अनेक शेतकऱ्यांना तात्पुरता श्वास घेण्याची संधी मिळेल. परंतु एक मूलभूत प्रश्न आजही आपल्या समोर उभा आहे. राज्यात आणि देशात गेल्या दोन दशकांत राज्य व केंद्र सरकारांनी अनेक मोठ्या कर्जमाफी योजना राबवल्या. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना आणि आता अहिल्यादेवी होळकर योजना अशा तीन प्रमुख योजना आल्या. केंद्र सरकारनेही कृषी कर्जमाफी आणि विविध आर्थिक मदत योजनांद्वारे हस्तक्षेप केला. तरीही शेतकरी आत्महत्या का थांबत नाहीत, हा प्रश्न केवळ कर्जाचा नाही. हा प्रश्न भारतीय शेतीच्या आर्थिक संरचनेचा आहे.

**भलताच उपचार**

कर्जमाफी ही संकटग्रस्त शेतकऱ्याला तात्पुरता दिलासा देते. ती आवश्यक आहे, कारण लाखो शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले आहेत. पण कर्जमाफी हे रोगावरील कायमस्वरूपी औषध नाही. एका शेतकऱ्याचे कर्ज माफ केले तरी पुढील हंगामात त्याला पुन्हा बियाणे घ्यावे लागते, खते विकत घ्यावी लागतात, कीटकनाशके घ्यावी लागतात, मजुरी द्यावी लागते आणि सिंचनासाठी खर्च करावा लागतो. जर उत्पादन खर्च सतत वाढत असेल आणि उत्पादनाला योग्य भाव मिळत नसेल तर तो पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकणारच ! म्हणून कर्जमाफी ही केवळ आर्थिक वेदनाशामक गोळी आहे; शेतीच्या आजारावरची कायमस्वरूपी चिकित्सा नाही.

**वाढता उत्पादन खर्च-** बियाणे, खते, कीडनाशके, डिझेल, वीज, सिंचन साधने, यंत्रसामग्री यांचे दर सातत्याने वाढत आहेत. मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांनी बियाणे आणि कृषी रसायनांच्या बाजारावर वर्चस्व निर्माण केले आहे. शेतकरी उत्पादनासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक घटकासाठी बाजारावर अवलंबून झाला आहे. उत्पादन खर्च वाढतो; पण उत्पादनाचा भाव वाढत नाही.

**हमीभावाचा अभाव-** भारतामध्ये किमान आधारभूत किंमत (एमएसपी) घोषित केली जाते. पण प्रत्यक्षात बहुतेक शेतकऱ्यांना एमएसपी मिळत नाही. शेतकरी आपल्या मालाची विक्री व्यापारी, दलाल आणि मोठ्या खरेदीदारांच्या अटींवर करतो. शेतीमाल उत्पादन करणारा शेतकरी स्वतःच्या उत्पादनाचा भाव ठरवू शकत नाही. जगातील बहुतेक उद्योगांमध्ये उत्पादकाला किंमत ठरविण्याचा अधिकार असतो; पण शेतीमध्ये तो अधिकार शेतकऱ्याला नाही. हेच शोषणाचे मूळ आहे.

**पीकविमा योजनांचे अपयश-** पिकविमा योजना शेतकऱ्यांसाठी सुरक्षा कवच असायला हवे होते. पण अनेक वेळा शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी महिने लागतात. काही वेळा नुकसान होऊनही भरपाई मिळत नाही. याउलट विमा कंपन्यांनी हजारो कोटी रुपयांचा नफा कमावल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. नैसर्गिक आपत्तीचा धोका शेतकरी घेतो आणि आर्थिक लाभ विमा कंपन्या घेतात, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

**सिंचनाचा प्रश्न गंभीर-** राज्यात सिंचन प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणावर खर्च झाला तरीही मोठा भूभाग आजही पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर पडला तर पीक; अन्यथा नुकसान. हवामान बदलामुळे पावसाचे स्वरूप अधिक अनिश्चित झाले आहे. त्यामुळे सिंचनाशिवाय शेती टिकाऊ होऊ शकत नाही.

**व्यापार धोरणातील विसंगती-** शेतीमालाचे दर वाढू लागले की निर्यातबंदी लावली जाते. पण उत्पादन खर्च वाढविणाऱ्या आयातींवर तितक्या वेगाने नियंत्रण आणले जात नाही. यामुळे शेतकरी आणि ग्राहक यांच्यात कृत्रिम संघर्ष निर्माण केला जातो. ग्राहकांना स्वस्त अन्न आणि शेतकऱ्यांना योग्य भाव या दोन्ही गोष्टी एकत्र शक्य आहेत. त्यासाठी सरकारने बाजारातील हस्तक्षेप आणि सार्वजनिक खरेदी व्यवस्था मजबूत करणे आवश्यक आहे. शेतकरी आत्महत्या म्हणजे वैयक्तिक अपयश नव्हे. शेतकरी आत्महत्यांकडे अनेकदा वैयक्तिक दुर्दैव म्हणून पाहिले जाते. परंतु हजारो लोक एकाच कारणामुळे आत्महत्या करत असतील तर तो वैयक्तिक प्रश्न राहत नाही. तो सामाजिक, आर्थिक आणि राजकीय प्रश्न बनतो. त्यामागे कर्ज, उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता, हवामान संकट, अपुरी सरकारी मदत, सामाजिक दबाव यांचा एकत्रित परिणाम असतो. म्हणून शेतकरी आत्महत्या हा केवळ कृषी विषय नाही; तो राष्ट्रीय विकासाचा प्रश्न आहे. उत्पादन करणाऱ्या वर्गाला न्याय मिळाला पाहिजे. पण भारतीय अर्थव्यवस्थेत सर्वांत कमी संरक्षण आणि सर्वाधिक जोखीम शेतकऱ्यावर टाकली जाते.

**विशेष अधिवेशनाची गरज**

शेतीचे संकट इतके व्यापक आहे की त्यावर तुकड्यातुकड्यांनी उपाय होणार नाहीत. यासाठी केंद्र सरकारने शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर संसदेचे विशेष अधिवेशन बोलवले पाहिजे. या अधिवेशनात केवळ राजकीय पक्ष नव्हे तर शेतकरी संघटना, शेतमजूर संघटना, कृषी अर्थतज्ज्ञ, सहकारी क्षेत्र प्रतिनिधी, कृषी विद्यापीठे, जलतज्ज्ञ, ग्रामीण विकास क्षेत्रातील संस्था, बाजार समित्यांचे प्रतिनिधी या घटकांनाही सहभागी करून घ्यावे लागणार आहे. शेतीविषयक धोरणे बंद खोलीत नव्हे तर लोकसहभागातून तयार झाली पाहिजेत. विशेष अधिवेशनानंतर सरकारने राष्ट्रीय कृषी आयोग स्थापन करणे आवश्यक आहे. हा आयोग केवळ सल्लागार नसावा. त्याला शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचे वार्षिक मूल्यांकन करणे, उत्पादन खर्चाचा अभ्यास, एमएसपी धोरणाची अंमलबजावणी, सिंचन प्रकल्पांचे परीक्षण, पीकविमा योजनांचे लेखांपरीक्षण, कृषी व्यापार धोरणाचा आढावा, शेतकरी आत्महत्यांचा कारणमीमांसा अहवाल, संसदेस नियमित अहवाल सादर करणे असे अधिकार असावेत. देशात ज्या पद्धतीने वित्त आयोग, वेतन आयोग किंवा जीएसटी परिषद काम करते त्याच गांभीर्याने राष्ट्रीय कृषी आयोग कार्यरत असला पाहिजे भारतीय शेतकरी दान मागत नाही. तो न्याय्य मोबदल् मागतो. तो उत्पादन खचपिक्षा अधिक भाव मागतो. विश्वासार्ह विमा मागतो. तो सिंचन मागतो. तो स्थिर धोम मागतो. कर्जमाफी स्वागतार्ह आहे, ती दिलीच पाहिजे. कर्जमाफीला शेती धोरण समजणे ही गंभीर चूक ठरेल. खरोखरच शेतकरी आत्महत्या थांबवायच्या असतील, सरकारने कर्जमाफीपलीकडे जाऊन शेतीची सर्वंकष पुनर्र करण्याचा धाडसी निर्णय घ्यावा लागेल. कारण प्रश्न कर्जाचा नाही. प्रश्न आहे शेतकऱ्याच्या जगण्याचा !

**देविदास तुळजापूरकर**
९४२२२०९३८०

# संरक्षण सिद्धतेवर होणारा खर्च?

अमेरिका-इस्रायल वि इराण युद्धातून पुन्हा तेच सिद्ध होत आहे की लाखो/कोटी डॉलर्स खर्चून महाकाय लष्करी ताकद वापरून ही राष्ट्रे तुलनेने लष्करी दृष्टया कमकुवत असणाऱ्या राष्ट्रांना गुडघ्यावर आणू शकत नाहीत! जगातील महासंहारक लष्करी सामर्थ्य असणाऱ्या आणि निर्दयी इतिहास असणाऱ्या अमेरिका/इस्रायल यांनी इराणवर लादलेल्या युद्धातून नक्की निष्पन्न होणार हे काळच ठरवेल; पण गेल्या साडे तीन महिन्यानंतर वरील गोष्ट मात्र अधोरेखित झाली आहे.

२०२५ सालात अमेरिकेने संरक्षण सिद्धतेवर ९५४ बिलियन्स डॉलर्स खर्च केले, तर इस्रायलने ४८ बिलियन डॉलर्स; म्हणजे दोघांचे झाले जवळपास १०००बिलियन्स डॉलर्स/किंवा एक ट्रिलियन्स डॉलर्स त्या तुलनेत इराणचा संरक्षण सिद्धतेवरील खर्च होता (होल्ड युअर ब्रीद !) ७.५ (साडेसात) बिलियन डॉलर्स; म्हणजे अमेरिका प्लस इस्रायलच्या फक्त शून्य पूर्णांक सात (०.७) टक्के. (यात चीन रशिया कडून गेलेल्या लष्करी मदतीचा समावेश नाही हे खरे)

गेल्या १०० दिवसात अमेरिकेने ४० ते ५० बिलियन डॉलर्स खर्च केले आहेत; इस्रायलचा झालेला खर्च वेगळाच! आणि या दिवसातील युद्धाचा आउटकम आपल्या सर्वांच्या समोर आहे

Stockholm International Peace Research Institute (SIPRI) 'सिप्रि' ही स्वीडिश संस्था जगातील शस्त्रात्र निर्मिती क्षेत्रातील घडामोडी, आकडेवारी यांचा मागोवा ठेवते. त्यांचा २०२५ सालसाठीचा अहवाल अलीकडेच प्रसिद्ध झाला.

२०२५ या वर्षात जगातील सर्व देशांनी मिळून २७०० बिलियन डॉलस. त्यातील एक तृतीयांश एकटी अमेरिका खर्च करते; ट्रम्प प्रशासनाने पुढच्या वर्षासाठी तर १५०० बिलियन्स डॉलर्स संरक्षण खर्चाचा प्रस्ताव काँग्रेससमोर ठेवला आहे.



सिप्री असे नमूद करते की फक्त संरक्षण सिद्धतेवर अमाप पैसे खर्च करून एखादा बलदंड देश त्यांच्या तथाकथित शत्रूला हवातसा धडा शिकवून, डोकेदुखी कायमची संपवू शकत नाही.

उदा. चीन ३३६ बिलियन्स डॉलर्स खर्च करते तर तैवान फक्त १८ बिलियन्स डॉलर्स; भारत ९२ बिलियन्स डॉलर्स तर पाकिस्तान फक्त १२ बिलियन्स डॉलर्स खर्च करते; त्याशिवाय रशिया, युक्रेन आहेच.

सिप्री असे सुचवू इच्छिते की, संरक्षण सिद्धतेवरील खूप खर्च म्हणजे खूप लष्करी प्रभाव पाडण्याची क्षमता असे समीकरण बसवता येत नाही. देशाकडे इतर बऱ्याच गोष्टी असाव्या लागतात.

उदा. सौदी अरेबिया ८५ बिलियन डॉलर्स खर्च करून जगात आठव्या क्रमांकावर आहे. तो जगातील सर्वात मोठा युद्ध सामुग्रीचा आयातदार देश आहे. पण त्याची लष्करी प्रभाव पाडण्याची क्षमता कमकुवत आहे

दुसरा मुद्दा. संरक्षण सिद्धतेसाठी किती अर्थसंकल्पीय तरतूदी वाढवत नेणार याला मर्यादा आहेत. संरक्षण खर्चाच्या पोहऱ्यात पाणी ओढून घेण्यासाठी अर्थव्यस्वस्थेच्या विहिरीत पाणी तयार तर झाले पाहिजे! उदा. युक्रेन गेली काही वर्षे जीडीपीच्या ४० टक्के संरक्षण सिद्धतेवर खर्च करत आहे. त्यामुळे उत्पादक अर्थव्यवस्था विकलांग होते. भविष्यात संरक्षण खर्च करणार तरी कसा?

इतिहासातून आलेले सगळे शहाणपण एक ओपन बुक आहे. तरी देखील भविष्यात जगातील संरक्षण सिद्धतेवरील खर्च वाढतच जाणार आहेत.

अमेरिका आपला खर्च पन्नास टक्के वाढवणार आहे. नाटो गटातर्फे मिळणारे संरक्षण कमी होणार असल्यामुळे अनेक युरोपियन युनियन सभासद राष्ट्रे खर्च वाढवणार आहेत. जेवढे भू राजनैतिक ताणतणाव वाढतील त्या प्रमाणात खर्च वाढणार. ते क्रिया प्रतिक्रिया साखळीने वाढतात. शत्रू राष्ट्रात एकप्रकारची शस्त्रास्त्र स्पर्धा होतेच होते.

हे झाले संरक्षण खर्चाचे आकडे. जीवित हानी, कायमचे विकलांग झालेले सैनिक आणि नागरिक, आणि मरेपर्यंत राहणारे मानसिक रुग्ण, सर्व प्रकारच्या पायभूत सुविधा, घरे, घरातील सामान, कोण काढणार यांचे मूल्य.

अनेक राष्ट्रात अतिरेकी राष्ट्रवाद विचारसरणी मानणारे राज्यकर्ते सत्तेवर येत आहेत. भविष्यात अजून देश त्या रंगात न्हाऊन निघतील असे अंदाज आहेत. संरक्षण सिद्धत्तेवर आम्ही जास्तीत जास्त खर्च करतो हे देशप्रेम सिद्ध करण्याचे आणि राजकीय विरोधकांपेक्षा आम्ही अधिक देशप्रेमी आहोत हे दाखवण्याचे हत्यार बनत चालले आहे. आपल्याला वाटते तसे हे सरळमार्गी देखील नाही.

यातून जगातील मोजक्या देशातील संरक्षण सामुग्री उद्योगांना प्रचंड धंदा/नफा मिळतो. त्यांनी देणग्या दिलेले थिंक टँक्स, लॉबीज सतत कार्यरत असतात. सर्व प्रकारच्या मीडियामधून द्वेष, भय पेरत राहतात. आपल्याला कल्पना देखील नाही.

कल्पना करा. हायपोथेटिकली जगातील सर्व युद्धे थांबली. तर कोणत्या उद्योगाचे दुकान सर्वात आधी बंद होईल? तरुण पिढीसाठी आपण हा काही हॉलिवूडचा भयपट डिस्कस करत नाही आहोत. युद्ध ओके..ते अधिकारी आणि सैनिक काय ते बघून घेतील. असे ते नाही. तुमच्या, तुमच्या मुलाबाळांच्या पर्यंत येणारे आहे सगळे.

**संजीव चांदोरकर**

# तुमची रेषा स्व बळावर मोठी करा...

आदरणीय पंतप्रधान मोदींनी नेहरूंचे रेकॉर्ड मोडले याचा इव्हेंट व्हायला हरकत नाही. मोदींच्या काळात काही सकारात्मक कामे झाली हेही मान्य करायला काहीच हरकत नाही. कलम ३७० रद्द करणे, तीन तलाक, ऑपरेशन सिन्दुर, रस्त्या सारख्या पायाभूत संरचनाच्या उभारणीत लक्षणीय वेग.. देशाच्या संरक्षण सिद्धतेला वेग अशी अनेक चांगली कामे नक्कीच सांगता येतील. पण आजच्या संबोधनात तरी त्यांचा नेहरू/काँग्रेस राग किंवा फोबिया व्यक्त होणे काहीसे विचित्र वाटले. की ते सदैव निवडणूक प्रचार मोड वरच असतात, राम जाणे.

व्यक्तिशः मी काँग्रेस समर्थक नाही. नेहरूंनी शेतीचे स्वातंत्र्य अत्यंत क्रूरपणे हिरावून घेतले. समाजवादाच्या नावाखाली देशाची अर्थव्यवस्था जखडून टाकली, याबाबत माझी नाराजी कायम राहील. पण तरीही नेहरू आणि मोदी यांची सरळ तुलना करण्यात काहीही अर्थ नाही. नेहरूंना दोष दिल्याशिवाय मोदींचे कार्य अधोरेखित होत नसेल तर ते त्यांच्या १२ वर्षाच्या कारकिर्दीचे स्वतःच केलेले अवमुल्यन आहे.

नेहरूंची धर्मनिरपेक्ष नीती काळाच्या कसोटीवर उतरली आहे. देशाच्या विकासासाठी अनेक पायाभूत प्रकल्प, संस्था उभ्या केल्या, वैज्ञानिक दृष्टीकोन, आंतरराष्ट्रीय अलिप्तता धोरण याचे श्रेय दिल्याने मोदींची रेषा लहान होईल असे मला वाटत नाही. उलट तसे झाले तर, मोदींचा मोठेपणा सारे जग मान्य करील. २०१४ चे ठीक होते, मात्र २०२६ मध्ये मोदीजी उठसूठ नेहरूंना दोष देऊन मोठे व्हायचा प्रयत्न करतात त्याची खरोखर आवश्यकता आहे का?



वास्तविक पाहता पंतप्रधान मोदींचे मूल्यांकन स्वतः मोदींनी दिलेली आश्वासने प्रत्यक्षात किती उतरली या आधारे व्हायला हवे. तिथे ते काहीही दावा करोत, त्यांची कारकिर्द फारच उजळ आहे असे दिसत नाही. काळा पैसा, महागाई, पेट्रोल डिझेल गॅस चे दर, शेतीमालाचे कोसळते भाव बद्दल तर त्यांची चापलुसीच अधोरेखित होते. भ्रष्टाचार कळीचा मुद्दा होता.. तो कमी होणे सोडाच.. उलट त्यातील मोठ्या आरोपींचे सन्मानाने राजकीय पुनर्वसन केले.. हे नाकारताच येणार नाही. तुकाराम मुंढे सारख्या अधिकाऱ्यांना कुठेही नीट काम करू न देण्याची परंपरा भाजपने खंडित केली नाही. सुनील केंद्रेकर सारखे कार्यक्षम अधिकारी राजकीय व्यवस्थेपुढे हतबल होऊन निवृत्ती घेतात..पोलीस अगदी गंभीर प्रकरणात सुद्धा सामान्य नागरिकांना दिलासा देत नाहीत. असे शेकडो इंडिकेटर मोदींनी स्वतः दिलेल्या आश्वासनांची कशी वाट लागली हेच सांगतात.

आपल्या देशाने डोनाल्ड ट्रम्प यांना राजकीय सल्लागार कम प्रवक्ता नेमले आहे.. इतकेच नव्हे तर भारताबद्दल अश्लाघ्य भाषा वापरली असताना, रशिया इराण कडून तेल न घेण्याची तंबी दिल्यावर भारताची गुळमुळीत भूमिका, हे काही मोदींचे राजनैतिक यश मानता येणार नाही. मला सुरुवातीच्या काळात मोदींची उभारी देणारी भाषणे आवडायची. अलीकडे ते जास्तीत जास्त वेळ काँग्रेसची उनिदुनी काढत स्वतःचे अपयश झाकताना दिसतात. स्पर्धा परीक्षा घोटाळा गाजत असताना सगळे आलबेल असल्याचा पोकळ दावा मोदीजी ज्या आत्मविश्वासाने करतात त्याबद्दल अभिनंदन केले पाहिजे.

सामान्य माणूस म्हणून मला मोदींची कारकिर्द संमिश्र आणि काहीशी नकारात्मक वाटते आहे. नेहरू राग आता बोरिंग वाटू लागतो. तुम्हाला जनतेने इतक्या बहुमताने निवडून दिले आणि काँग्रेसला दूर केले.. यातच सगळे काही आले.. तुम्ही अजून तेच तुणतुणे किती दिवस वाजवत राहणार? आता तुम्ही काँग्रेसची कुबडी फेकून तुमची रेषा स्व बळावर मोठी करा ना.

**-नवनाथ पवार**

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्रय

# बीओटी शॉपिंग कॉम्प्लेक्सला बहुमताची मंजुरी..!

## सर्वसाधारण सभेत जोरदार खडाजंगी, २४ नगरसेवकांचा पाठिंबा, १२ जणांचा विरोध,आत्मदहनाच्या इशाऱ्याने सभागृहात खळबळ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १२ :** प्रदीर्घ कालावधीनंतर शुक्रवारी नगर भवन येथे पार पडलेल्या यवतमाळ नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत विविध विकास कामांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. २२ मे रोजी तहकूब झालेल्या सभेतील प्रलंबित विषयांवरही यावेळी चर्चा करण्यात आली. मात्र, टीबी रुग्णालयाच्या जागेवर बीओटी (बांधा-चालवा-हस्तांतरित करा) तत्त्वावर उभारण्यात येणाऱ्या भव्य शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या प्रस्तावाने सभागृहाचे लक्ष वेधून घेतले.

या विषयावर सत्ताधारी व विरोधी पक्षांमध्ये जोरदार वादविवाद झाला. विरोध, तटस्थता आणि मंजुरी अशा तिन्ही भूमिका सभागृहात स्पष्टपणे उमटल्या. अखेरीस मतदानाद्वारे हा प्रस्ताव बहुमताने मंजूर करण्यात आला. आरक्षण क्रमांक ८६, नझूल शीट क्रमांक ३८-सी, भूखंड क्रमांक ३१/१ वर ९५ कोटी रुपयांच्या अधिमूल्यावर ९० वर्षांच्या भाडेतत्त्वावर दुकान संकुलाच्या बांधकामास मंजुरी देण्याचा प्रस्ताव सभेसमोर ठेवण्यात आला. या प्रस्तावावरील चर्चा तापली. आत्मदहनाचे पत्र सुद्धा अध्यक्षांना देण्यात आले आणि अखेरीस मतदान झाले. टी.बी. रुग्णालयाच्या जागेवर प्रस्तावित असलेल्या या भव्य शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये ५६० दुकाने आणि पार्किंगची सोय असेल. या प्रस्तावावरील मतदानात चाळीस नगरसेवकांनी भाग घेतला. यांपैकी २४ जणांनी बाजूने, तर १२ जणांनी विरोधात मतदान केले. ०४ नगरसेवक तटस्थ राहिले. हा प्रस्ताव बहुमताने मंजूर झाला. मात्र प्रस्तावाच्या विरोधात आत्मदहन करण्याची धमकी सत्ताधारी पक्षाचे विभाग क्रमांक २९ चे नगरसेवक बिपिन चौधरी यांनी शॉप कॉम्प्लेक्सच्या प्रस्तावाला विरोध करत तो मंजूर न करण्याची मागणी केल्याने सभेला नवीन वळण लागले. त्यांनी मुख्य अधिकारी आणि नगर परिषद अध्यक्षांना आत्मदहन करण्याची धमकी देणारी नोटीसही सादर केली, ज्यामुळे सभेत काही काळासाठी खळबळ उडाली. बीओटी तत्त्वावर शॉप कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी कोणत्याही खाजगी विकासकाची नियुक्ती करू नये आणि या प्रस्तावावर पुनर्विचार करावा, असा युक्तिवाद बिपिन चौधरी यांनी केला. या सह इतर विकास प्रस्तावांवरही चर्चा करण्यात आली असून सर्वसाधारण सभेत शहर विकास, सुशोभीकरण, क्रीडा सुविधांचा विस्तार आणि पर्यावरण संरक्षण यासंबंधीच्या अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांवरही चर्चा झाली. विभाग क्रमांक ११ मधील नगर परिषदेच्या मोकळ्या जागेवर खुले व्यायामशाळा (ओपन जिम) स्थापन करण्याचा आणि विभाग क्रमांक २ मधील नालंदा गार्डन येथे खुले व्यायामशाळा स्थापन करण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठवण्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. विभाग क्रमांक १७ मधील जय भवानी चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवून परिसर सुशोभित करण्याचा प्रस्तावही विचारार्थ सादर करण्यात आला. पर्यावरण संरक्षण लक्षात घेऊन, नगर परिषद क्षेत्रात परवानगीशिवाय झाडे तोडणे, झाडांना बॅनर बांधणे, खिळे ठोकणे आणि रोषणाई लावणे यांसारख्या कृत्यांविरुद्ध गुन्हे नोंदवण्याच्या प्रस्तावावरही चर्चा झाली. या व्यतिरिक्त, संविधान चौक ते न्यायालय मार्ग या दुभाजकावर लँडस्केपिंग, लॉन आणि कारंजे विकसित करून तो सुशोभित करण्याच्या योजनेवरही विचार करण्यात आला. या बैठकीत एकूण २५ विषयांवर चर्चा झाली, ज्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत प्रकल्प सल्लागार समितीची नियुक्ती, प्रमुख रस्त्यांवर गतिरोधक, ब्लिंकर लाईट्स आणि कॅट्स-आय लाईट्सची स्थापना, विविध विभागांमधील सुशोभीकरणाची कामे, खुल्या व्यायामशाळांची स्थापना आणि सार्वजनिक जागांचा विकास यांचा समावेश होता. प्रमुख नाल्यांची मान्सूनपूर्व स्वच्छता, बाल निरीक्षण गृहाच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण, आठवले लेआउट आणि विश्वशांती नगरमध्ये पूल व डांबरी रस्त्यांचे बांधकाम, कायमस्वरूपी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी सरकारकडे प्रस्ताव सादर करणे आणि विशेष योजनेअंतर्गत विकास कामांना मंजुरी यांसारख्या मुद्द्यांवरही चर्चा झाली. विभाग २२ आणि २५ मध्ये सामुदायिक सुविधांचे बांधकाम, नाल्यांचा विकास आणि आपत्ती व्यवस्थापन निधीतून कामे करण्यासंबंधीचे प्रस्तावही बैठकीत सादर करण्यात आले. नगर परिषद क्षेत्रातील एलईडी पथदिव्यांची देखभाल, नवीन एलईडी दिवे आणि सीसीएमएस प्रणालीची स्थापना, तसेच पुढील नऊ वर्षांसाठी त्यांच्या देखभालीकरिता एका खाजगी कंपनीसोबत करार करण्यासंदर्भातील प्रस्तावांवरही चर्चा झाली. नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. यावेळी उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, मुख्य अधिकारी शुभम क्यतमवार आदी उपस्थित होते.

# नगराध्यक्षांच्या दालनात घुसून दादागिरीचा आरोप..!

## आदिवासी संघटनांची कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १२ :** यवतमाळ नगर परिषदेच्या नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्या दालनात बळजबरीने प्रवेश करून अपमानास्पद वर्तन केल्याचा आरोप करत संबंधित व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी आदिवासी समाजातील विविध संघटना व नागरिक बंडू मेश्राम,किशोर सलामे,अशोक गेडाम,अरुण पोयाम,सूरज नैताम, चंद्रभान मसराम,सह मोठ्या संख्येने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन देण्या करिता आले होते.

यावेळी निवेदनात म्हटले आहे की, यवतमाळ नगर परिषदेच्या इतिहासात प्रथमच आदिवासी समाजातील महिला नगराध्यक्षपदी विराजमान झाल्या आहेत. मात्र काही व्यक्तींना हे मान्य नसल्याने त्यांना सातत्याने सोशल मीडियासह विविध माध्यमांतून लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. दिनांक ११ जून रोजी नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके यांच्या कार्यालयात बबलू देशमुख, नगर परिषदेच्या गटनेत्या वैशाली सवाई, कृष्णा पुसनाके व इतर काही व्यक्तींनी प्रवेश करून एकेरी भाषेत बोलत अपमान केल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. यामुळे शासकीय कामकाजात अडथळा निर्माण झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे. सध्या शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेच्या पार्श्वभूमीवर ही घटना घडल्याचे सांगण्यात आले. शहर विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या मोहिमेला विरोध करून प्रशासनाच्या कामात हस्तक्षेप केला जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संबंधित व्यक्तींवर शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हे दाखल करावेत तसेच आवश्यक ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आदिवासी समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# विनोबा ॲपमध्ये पुन्हा चमकले पवन बोम्मावार..!

## जिल्हास्तरीय पुरस्काराने पांढरकवड्याचा गौरव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. १२ :** तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या विषय शिक्षक पवन अशोक बोम्मावार यांनी विनोबा ॲपच्या विविध उपक्रमांमध्ये सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी करत पुन्हा एकदा जिल्हास्तरीय पुरस्कार पटकावला आहे. मॉर्निंग असेंबली क्लबमध्ये उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. जिल्हा परिषद यवतमाळचे प्राथमिक शिक्षणाधिकारी प्रकाश मिश्रा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या यशाबद्दल जि.प. उच्च प्राथमिक शाळा वाढोणा (बु.) येथे आयोजित मॉर्निंग असेंबलीत शाळा व्यवस्थापन समिती, पालक व शिक्षकांच्या उपस्थितीत त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. दरम्यान, विनोबा ॲपच्या "नन्हे सितारे" स्पर्धेत महावाचन कविता गायन विभागात शाळेतील कु. श्रेया शंकर कुंभारे व कु. आदित्य श्रीकृष्ण लोणकर या इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्हास्तरावर पांढरकवडा तालुक्याचे प्रतिनिधित्व केले. तसेच एप्रिल व मे २०२६ महिन्यात विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांतील उल्लेखनीय कार्याबद्दल लिखार व कु. नरवाडे यांनाही विविध क्लबमध्ये पुरस्कार प्राप्त झाले आहेत. आपल्या यशाचे श्रेय पवन बोम्मावार यांनी पत्नी श्वेता बोम्मावार, गटशिक्षणाधिकारी श्रीधर कनाके, विस्तार अधिकारी राजू मेश्राम, गोकुळ गंधे, केंद्रप्रमुख राजू उपरीकर, विनोबा ॲपचे जिल्हा समन्वयक राम हटकर व त्यांच्या सहकाऱ्यांसह शाळेचे शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांना दिले.

## थोडक्यात



### पीएचडी पदवी मिळाल्याबद्दल प्रा. नासीर कासम शेख यांचा सत्कार.!

**पुसद :** सवना येथील श्री विठ्ठल रुक्मिणी महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. नासीर कासम शेख यांना नुकतीच पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल नागेश कॉम्प्युटर सेंटर पुसद तर्फे त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शेख यांनी "पश्चिम विदर्भातील राजकीय घराणी : एक विश्लेषणात्मक अध्ययन" या विषयावर संशोधन पूर्ण करून पीएचडी पदवी संपादन केली आहे. त्यांच्या संशोधनामध्ये पश्चिम विदर्भातील राजकीय प्रक्रियेचा, सामाजिक बदलांचा तसेच ऐतिहासिक पार्श्वभूमीचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. यावेळी नागेश कॉम्प्युटर सेंटरच्या वतीने संचालक श्री अनिल हट्टेकर व मिलिंद हट्टेकर यांनी शेख यांचे अभिनंदन केले. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयासह परिसराच्या शैक्षणिक क्षेत्रात गौरवाची भर पडल्याची भावना व्यक्त करण्यात आली. उपस्थितांनी त्यांना पुढील शैक्षणिक व संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. नासीर कासम शेख यांच्या या यशाबद्दल विविध शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

### वीज कोसळून शेतकऱ्याचा मृत्यू, ११ बकऱ्या व एक स्वानही दगावले

**वणी :** तालुक्यातील मौजा टाकळी येथे शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडलेल्या दुर्दैवी घटनेत वीज कोसळून एका शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. या नैसर्गिक आपत्तीत त्यांच्यासोबत असलेल्या ११ बकऱ्या आणि एक स्वान यांचाही मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

तहसीलदार वणी यांच्याकडून प्राप्त माहितीनुसार, विलास मनकू तुमराम (वय अंदाजे ५५ वर्षे) हे आपल्या शिवारात बकऱ्या चारत असताना अचानक वादळी वातावरण निर्माण झाले. यावेळी आकाशातून जोरदार वीज कोसळून त्यांचा जागीच मृत्यू झाला. वीजेचा तडाखा इतका तीव्र होता की, त्यांच्या जवळ असलेल्या ११ बकऱ्या आणि एक स्वान देखील मृत पावले.

घटनेची माहिती मिळताच महसूल प्रशासन व संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करण्याची प्रक्रिया सुरू केली. या दुर्घटनेमुळे तुमराम कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावात शोककळा पसरली आहे.अलीकडील काळात अवकाळी पाऊस, मेघगर्जना आणि वीज पडण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांनी हवामान विभागाच्या इशाऱ्यांचे पालन करावे, तसेच वादळी वातावरणात झाडाखाली किंवा मोकळ्या शेतात थांबणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# बँकॉकमध्ये डॉ. सुनील खाडे यांचा जागतिक सन्मान..!

## एक्सेलेन्स रिसर्च अवॉर्ड -२०२६' ने गौरव

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १२ :** फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद येथील प्राणिशास्त्र विभागाचे विभागप्रमुख तथा सहयोगी प्राध्यापक डॉ. सुनील एन. खाडे यांना थायलंडची राजधानी बँकॉक येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत प्रतिष्ठेचा 'Excellence Research Award-२०२६' प्रदान करण्यात आला. पर्यावरण, प्राणीशास्त्र आणि शाश्वत विकास क्षेत्रातील उल्लेखनीय संशोधन व योगदानाची जागतिक स्तरावर दखल घेत हा सन्मान बहाल करण्यात आला.

दि. ५ ते ८ जून २०२६ दरम्यान एशियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (AIT), बँकॉक येथे झालेल्या "Climate Smart Natural Resources Management for Sustainable Agriculture and Allied Sciences" परिषदेत विविध देशांतील संशोधक सहभागी झाले होते. यावेळी डॉ. खाडे यांनी तांत्रिक सत्राचे अध्यक्ष (Session Chair) म्हणूनही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मिळालेल्या या सन्मानामुळे फुलसिंग नाईक महाविद्यालयासह यवतमाळ जिल्ह्याच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्राची मान उंचावली आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जयभाऊ नाईक, प्राचार्य डॉ. प्रल्हाद वावरे, प्रा. डॉ. व्ही. एन. कांबळे, सहकारी प्राध्यापक, विद्यार्थी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# संचमान्यता रखडली, अतिरिक्त शिक्षक वेतनाविना..!

## मुख्याध्यापक संघाचा शिक्षण विभागाला आंदोलनाचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभुळगाव, दि. १२ :** कनिष्ठ महाविद्यालयांच्या संचमान्यता प्रक्रियेत झालेल्या बदलांमुळे निर्माण झालेला गोंधळ, अतिरिक्त शिक्षकांचे प्रलंबित वेतन आणि शिक्षक भरतीतील आरक्षण धोरणामुळे वाढलेल्या प्रशासकीय अडचणींवर तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यवतमाळ जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाने दिला आहे.

या संदर्भात संघटनेच्या शिष्टमंडळाने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) किशोर पागोरे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. सन २०२५-२६ च्या कनिष्ठ महाविद्यालयांच्या संचमान्यता प्रक्रियेत नव्याने करण्यात आलेल्या बदलांमुळे अनेक संस्थांची मान्यता प्रक्रिया रखडली असून शैक्षणिक नियोजनावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे सर्व महाविद्यालयांना संचमान्यता मिळेपर्यंत पवित्र पोर्टलवरील जाहिरातींसाठी मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली. जिल्ह्यातील अनेक शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांना नियमित वेतन मिळत नसल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढवले आहे. प्रलंबित वेतनाचा प्रश्न तातडीने निकाली काढण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली. शिक्षक भरती प्रक्रिया आणि आरक्षण धोरणातील बदलांमुळे शाळांसमोर निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी संघटनेने केली. यावेळी अध्यक्ष प्रकाश भुमकाळे, पांडुरंग साखरकर, प्रमोद देशमुख, विठ्ठल परांडे यांच्यासह अनेक मुख्याध्यापक उपस्थित होते. "वेळेत निर्णय न झाल्यास संघटना रस्त्यावर उतरून आंदोलन करेल," असा स्पष्ट इशारा भुमकाळे यांनी दिला.

# '९५ कोटींसाठी ३५० कोटींची मालमत्ता गहाण..!

## बीओटी दुकान संकुल आणि ४२ कोटींच्या वीज करारावर काँग्रेसचा घणाघात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १२ :** नगर परिषद यवतमाळच्या १२ जून २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेतील बीओटी (BOT) तत्वावरील दुकान संकुल बांधकाम आणि वीज देखभाल कराराच्या विषयांवर काँग्रेस नगरसेवकांनी तीव्र आक्षेप नोंदवत प्रशासनावर आर्थिक नुकसान केल्याचा आरोप केला आहे.

या संदर्भात विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत काँग्रेस गटनेत्या वैशाली सवाई, नगरसेवक अनिल देशमुख, संतोष बोरले, प्रमोद बागडे, जावेद अन्सारी, कृष्णा पुसनाके, अत्तरसिंग चव्हाण, तबस्सुम शहा, शाहीना परवीन, सुजाता चव्हाण, साधना शंभरकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, शहराच्या मध्यवर्ती भागातील अत्यंत मौल्यवान जागेवर बीओटी तत्वावर दुकान संकुल उभारण्याचा प्रस्ताव नगर परिषदेकडून मंजूर करण्यात आला आहे. संबंधित जागेचे बाजारमूल्य सुमारे ३५० कोटी रुपये असल्याचा दावा करत ती जागा ९० वर्षांच्या लीजवर केवळ ९५ कोटी रुपयांत देण्याचा निर्णय शहराच्या हिताविरोधात असल्याचा आरोप करण्यात आला. कंत्राटदाराकडून एकूण रकमेपैकी केवळ २० टक्के रक्कम नगर परिषदेला मिळणार असून उर्वरित कालावधीत नगर परिषदेच्या महसुलाला फटका बसणार असल्याचेही त्यांनी म्हटले. तसेच या प्रकल्पामुळे आर्थिकदृष्ट्या सक्षम घटकांनाच दुकाने घेणे शक्य होईल, तर बेरोजगार युवक-युवती, अनुसूचित जाती-जमाती, महिला व दिव्यांग घटकांना संधीपासून वंचित राहावे लागू शकते, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली. काँग्रेस सदस्यांनी शासनाच्या लीज धोरणाचा हवाला देत नगर परिषदेला ९० वर्षांची लीज देण्याचा अधिकार नसून याबाबतच्या नियमांची पडताळणी करण्याची मागणी केली. याशिवाय सभेतील विषय क्रमांक २५ अंतर्गत वीज देखभाल, दुरुस्ती आणि संबंधित कामांसाठी ४२ कोटी रुपयांचा प्रस्तावित करार देखील संशयास्पद असल्याचा आरोप करण्यात आला. हे काम प्रत्यक्षात सुमारे २० कोटी रुपयांत पूर्ण होऊ शकते, असे सांगत उर्वरित रक्कम नगर परिषदेच्या आर्थिक हिताला बाधा आणणारी असल्याचे काँग्रेस सदस्यांनी म्हटले. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा उल्लेख करत, कंपनीमार्फत काम देण्याऐवजी नगर परिषदेकडून स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबवून संभाव्य आर्थिक नुकसान टाळावे, अशी मागणीही करण्यात आली. सभागृहात मांडण्यात आलेले लेखी व तोंडी आक्षेप कामकाज नोंदवहीत नमूद करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

### 'आम्हाला बेघर करू नका; पर्यायी व्यवस्था द्या' — टीबी हॉस्पिटल क्वार्टरधारकांचा आक्रोश

**पत्रकार परिषद सुरू असतानाच टीबी हॉस्पिटल परिसरातील क्वार्टरमध्ये अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांनी उपस्थित राहून आपली व्यथा मांडली. रहिवाशांनी सांगितले की, नगर परिषदेकडून सुरू असलेल्या अतिक्रमण व जागा हस्तांतरण प्रक्रियेमुळे त्यांच्यावर विस्थापनाचे संकट ओढवले आहे. कोणतीही पर्यायी व्यवस्था न देता घरे रिकामी करण्यासाठी दबाव आणला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. "आम्हाला बेघर करू नका. प्रथम पर्यायी निवासाची व्यवस्था करा आणि त्यानंतरच कोणतीही कारवाई करा," अशी मागणी रहिवाशांनी केली. किमान आठ दिवसांची मुदत देऊन पुनर्वसनाचा ठोस आराखडा जाहीर करावा, अशीही त्यांनी मागणी केली.**

# चातारी गावावर घोघांवत आहे पुराचे संकट..!

## ८ दिवसांत तोडगा न निघाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा, गावकऱ्यांचे उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. १२ :** चातारी गावाला लागून असलेल्या देवसरी पांदण, खरूस पांदण आणि साखरा पांदण या तीन रस्ते पांदणीवरून येणारे पाणी थेट गावात शिरत असल्याने ग्रामस्थांचे जीणे असह्य झाले आहे. गतवर्षी गावातील मुख्य रस्त्यावरून पाणी वाहून प्रत्येक घरात तब्बल ५ फूट पाणी शिरले होते. प्रशासनाने तात्काळ पावले न उचलल्यास यंदा पहिल्याच पावसात मोठी जीवित व वित्तहानी होण्याची भीती वर्तवली जात आहे. या गंभीर समस्येबाबत चातारी येथील समस्त गावकऱ्यांनी उमरखेडचे उपविभागीय अधिकारी (एसडीओ) यांना निवेदन सादर केले आहे. गेल्या वर्षी प्रशासनाने या भागाची पाहणी करून पूरग्रस्तांना प्रत्येकी १० हजार रुपयांची जुजबी मदत दिली होती. मात्र, ग्रामपंचायत आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने यावर कोणतीही कायमस्वरूपी कारवाई केली नाही. त्यामुळे यंदा पहिल्याच पावसात किमान ९० घरांमध्ये पाणी शिरण्याचा आणि मोठे नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे. गावाबाहेरील बंद पडलेली नाली तात्काळ साफ करून पाणी गावाबाहेर काढावे, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. पुढील ८ दिवसांच्या आत यावर योग्य ती प्रशासकीय कारवाई न झाल्यास, तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा चातारी येथील नागरिकांनी दिला आहे. तसेच यामुळे कोणतीही दुर्घटना घडल्यास त्याला प्रशासनच जबाबदार राहील, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.या निवेदनावर डॉ. विठ्ठल गोविंदवार, साहेबराव धात्रक, शामसुंदर धात्रक, विवेक गोविंदवार, आशिष हामंद, सुनील गोविंदवार, ॲड. अनिल माने आणि विनोद कन्नावार, बालाजी माने,विवेक कन्नावार यांच्यासह गावातील प्रमुख नागरिकांच्या सह्या आहेत. या निवेदनाच्या प्रती तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि स्थानिक आमदारांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# महामार्गावरील पथदिवे तीन वर्षांनंतर पुन्हा झळकले

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

काम करण्याची आणि करून घेण्याची जिद्द व चिकाटी असेल तर अशक्य काहीच नाही, याचा प्रत्यय अंजनगाव सुर्जीचे नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी करून दाखवला आहे. शहरातून जाणाऱ्या परतवाडा-आकोट राष्ट्रीय महामार्गावरील मागील तीन-चार वर्षांपासून बंद अवस्थेत असलेले पथदिवे अखेर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून सुरू करण्यात आले आहेत. या कामात नगरपरिषदेच्या विद्युत अभियंता सुप्रीया रिठे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

परतवाडा-आकोट राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे गेल्या तीन वर्षांपासून बंद होते. त्यामुळे रात्रीच्या वेळी संपूर्ण मार्गावर काळोखाचे साम्राज्य पसरले होते.

अंधाराचा फायदा घेऊन चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. त्याचबरोबर 'रोड रोमिओ'च्या त्रासामुळे नागरिक, विशेषतः महिलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अपघातांचा धोकाही सातत्याने वाढला होता. याबाबत नागरिकांनी नगरपरिषदेकडे वारंवार तक्रारी केल्या होत्या.

नवनिर्वाचित नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांनी या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा केली. 'जोपर्यंत नॅशनल हायवे अथॉरिटी हे पथदिवे दुरुस्त करून चालू स्थितीत आणत नाही, तोपर्यंत नगरपरिषद या पथदिव्यांचे हस्तांतरण स्वीकारणार नाही,' अशी कडक भूमिका गायगोले यांनी घेतली. नगराध्यक्षांच्या आक्रमक भूमिकेसमोर व सातत्यपूर्ण पाठपुराव्यापुढे अखेर हायवे प्रशासनाला झुकावे लागले. हायवे प्राधिकरणाने तातडीने दुरुस्तीचे काम हाती



घेऊन परतवाडा ते आकोट मार्गावरील सर्व पथदिवे सुरू केले.

तीन वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर महामार्ग रोषणाईने उजळून निघाला आहे. रात्रीच्या वेळी हा रस्ता दिवाळीसारखा प्रकाशमान दिसत असून, प्रवाशांसह स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

पथदिवे सुरू झाल्याने शहराच्या सौंदर्यात भर पडली असून सुरक्षेचा प्रश्नही निकाली निघाला आहे. या यशस्वी कार्यात नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांच्यासोबत नगरसेवक सोनू जुनघरे आणि गजानन विजेयकर यांची मोलाची साथ लाभली. विद्युत अभियंता सुप्रीया रिठे यांनीही तांत्रिक बाजू सांभाळली.

# शेतकऱ्यांना अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेत समाविष्ट करा

## मुकूंद पूनसे यांची मागणी

**तिवसा/ वार्ताहर**

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' या योजनेत २०१२ पासून थकित असलेल्या हजारो पात्र शेतकऱ्यांना समाविष्ट करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मुकूंद पूनसे यांनी तहसीलदार मयूर कळसे यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदना तून शासनाकडे केली आहे. सन २०१६-१७ ची 'छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना' आणि २०१९ ची 'महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना' अशा दोन्ही योजनांमध्ये' जुन्या थकबाकीदारांना वगळ ण्याचा' फंडा कायम राहिला. त्यामुळे २०१२ किंवा त्यापूर्वी थकित असलेले हजारो अल्पभूधारक शेतकऱ्यांना पात्र असूनही



कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहावे लागले होते. धक्कादायक म्हणजे, अनेकांची नावे पात्र यादीत झळकूनही सरकारकडून बँकांना निधीच मिळाला नसल्याने, परिणामी, शेतकरी 'पात्र' होऊनही 'अपात्र' ठरला. आता पुन्हा सरकारने १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील व ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या नाच २ लाखांपर्यंत कर्जमाफीची घोषणा केली आहे. 'मग गेली १३ वर्षे व्यवस्थेच्या दुष्टचक्रात पिचलेल्या २०१२ च्या थकबाकीदार शेतकऱ्यांनी जायचं कुठे? त्यांचा गुन्हा काय?' असा संतप्त सवाल मुकूंद पूनसे यांनी उपस्थित केला आहे. २०१२ किंवा त्यापूर्वी थकित असलेल्या सर्व शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने समाविष्ट करून कर्जमुक्त करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मुकूंद पूनसे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून शासनाकडे केली आहे.

> नुकत्याच जाहीर केलेल्या कर्जमुक्ती योजनेत २०१२ पूर्वीच्या थकबाकीदार शेतक ऱ्यांचा साधा उल्लेखही नाही. हा शुद्ध फसवणुकीचा डाव आहे. कोणताही भेदभाव न करता सर्वसमावेशक, सरसकट कर्जमु क्ती जाहीर करावी अन्यथा शेतकरी रस्त्यावर उतरल्या शिवाय राहणार नाही.
>
> **मुकूंद बा. पूनसे**
> सामाजिक कार्यकर्ते, तिवसा

# दिव्यांग बांधवांसाठी 'मदतीचा हात' उपक्रम




## रोजगाराभिमुख साहित्याचे वितरण

**अमरावती/ का.प्र.**

स्मृती सेवाश्रम आणि प्रेम किशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट, वलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने सिकची रिसॉर्ट, वलगाव येथे दिव्यांग बांधवांना आधार देण्यासाठी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी अत्यंत गरजू दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने झेरॉक्स मशीन, पीठ गिरणी व मिरची कांडप केंद्र यांसारखे रोजगाराभिमुख साहित्य वितरित करण्यात आले.

प्रस्तावनेमध्ये डॉ. दिलीप काळे यांनी स्मृती सेवाश्रम नया अकोला व प्रेम किशोर चॅरिटेबल ट्रस्ट, वलगाव यांनी गेल्या सात वर्षापासून संयुक्तपणे केलेल्या कार्याचा उलगडा केला. माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांनी समाजातील दिव्यांग, पीडित, शोषित, अन्यायग्रस्त, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे तसेच दुर्धर आजारांनी ग्रस्त गरजू व्यक्तींसाठी समाजाने संवेदनशीलता दाखविण्याची गरज असल्याचे सांगितले. प्रमुख अतिथी म्हणून आ. रवी राणा, श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे कार्यकारणी सदस्य हेमंत काळमेघ, ज्येष्ठ व प्रसिद्ध चित्रकार विजय राऊत, जिजाऊ बँकेचे माजी अध्यक्ष अविनाश कोठाळे, श्री संत अच्युत महाराज रुग्णालय ट्रस्ट अमरावतीचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर, संत गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, धन्वंतरी सहकारी रुग्णालय अमरावतीचे उपाध्यक्ष श्री गजानन रडके, होमिओ डॉक्टर असोसिएशनचे माजी अध्यक्ष डॉ. गुणवंत डहाणे, युवा उद्योजक नितीन भटकर, युवक बिरादरीचे माजी संचालक गौरव इंगळे, अनिस भाई, प्रेम किशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्टचे व्यवस्थापक सचिन मालकर, यांच्यासह विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

'सेवा परमो धर्म' या उक्तीनुसार आरोग्य क्षेत्रात गरजू रुग्णांना सक्षम व पारदर्शक आरोग्य सेवा देण्यासाठी श्री संत अच्युत महाराज हॉस्पिटल आरोग्य सेवेच मंदिर असून त्याचा लाभ घेण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन डॉ. अनिल सावरकर यांनी केले. याप्रसंगी अविनाश कोठाळे व विजय राऊत यांनी आपल्या संबोधनातून वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी सर्वांनी पुढे येण्याचे आवाहन केले. यावेळी दिव्यांग बांधवांसाठी उल्लेखनीय कार्य करणारे १०० टक्के दृष्टिहीन प्रा. संजय काळे, उपसरपंच व अपंग संघटनेचे अध्यक्ष मयूर मेश्राम आणि गरजू दिव्यांग बांधवांना रोजगारासाठी दर्जेदार साहित्य पुरणारे उद्योजक अशोक गावंडे यांचा मान्यवरांच्या हस्ते भावपूर्ण सत्कार करण्यात आला. कार्यक्रमातील उपस्थित मान्यवराचे स्वागत अनुला खान, अमित कुचे, गणेश कडू, अक्षय सरोदे, सौरभ माहोरे, योगेश बोबडे, प्रवीण बोबडे, गजानन इसळ, सुधीर पडोळे, सचिन महल्ले, विजय वाकेकर, यश जवंजाळ यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी राहुल तायडे, विनोद जायलवाल, निलेश उभाड, प्रा. सुनील सावळे, अर्जुन दास सनके, सुनील भगत, उमेश वाकोडे सुनील पडोळे, किशोर महल्ले, गोपाल महल्ले आदी मान्यवरांनी विशेष परिश्रम घेतले.

> **'दिव्यांग बांधवांना सक्षम रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रकाश साबळे यांचा समाजपयोगी स्तुत्य व अभिनंदनिय उपक्रम.'**
>
> **हेमंत काळमेघ,**
> कार्यकारिणी सदस्य,
> श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

# संक्षिप्त

## महाडीबीटी वरून अर्ज करण्याचे आवाहन

**तिवसा**-राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रती थेंब अधिक पीक या योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांसाठी ठिंबक व तुषार संचाची खरेदी करण्यासाठी अनुदान दिले जाते. सदर योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प शेतकऱ्यांना ५५टक्के व इतर शेतकऱ्यांना २५ टक्के अनुदान दिल्या जाते. याच घटकाकरिता अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना अंतर्गत अल्प व अत्यल्प लाभार्थ्यांना २५टक्के व इतर लाभार्थ्यांना ३० टक्के पूरक अनुदान दिल्या जाते. याच घटकाकरिता जिल्हा परिषद मार्फत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन मिशन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना मधून अल्प व अत्यल्प लाभार्थ्यांना दहा टक्के पूरक अनुदान व इतर लाभार्थ्यांना १५ टक्के पूरक अनुदान असे एकूण ९०टक्के अनुदान दिले जाते. योजनेअंतर्गत ठिंबक व तुषार सिंचन संचाचा लाभ घेण्यास इच्छुक शेतकऱ्याकडे मालकी हक्काचा सातबारा व ८ अ असणे आवश्यक आहे तसेच ओलिताची सोय असणे आवश्यक आहे. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांनी महाडीबीटी गव्हर्मेंट डॉट इन वर अर्ज करणे आवश्यक आहे. तरी सदर योजनेचा जास्तीत-जास्त अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तिवसा तालुका कृषी अधिकारी हेमलता इंगळे यांनी केले आहे.

## पीडीएमसीत 'एमबीबीएस'चा ९३ टक्के निकाल

**अमरावती**-एमबीबीएस अंतिम वर्ष परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाने (पीडीएमसी) यंदाही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयाचा ९३ टक्के निकाल लागला असून विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यंदा महाविद्यालयातील एकूण १७० विद्यार्थ्यांनी अंतिम वर्षाची परीक्षा दिली होती. त्यापैकी १३७ विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाल्याचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी दिली. वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात पीडीएमसी हे विदर्भातील एक अग्रगण्य महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. अंतिम वर्षाच्या निकालात मिळालेल्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

## आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा २८वा वर्धापनदिन

**अमरावती**-महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (नाशिक) चा स्थापना दिन अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात बुधवारी अधिष्ठाता डॉ. एन. जी. राऊत यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजारोहणाने पार पडला. विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त अधिष्ठाता राऊत यांनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे वैद्यकीय शिक्षणातील महत्त्व व त्यामुळे वैद्यकीय शिक्षणात झालेली सुधारणा व सुसूत्रता याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमास संस्थेचे उपअधिष्ठाता डॉ. सचिन गाडगे, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी संजय मैदानकर, दिलीप दगडकर, संस्थेत वैद्यकीय शिक्षण घेत असलेले प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष एमबीबीएसचे विद्यार्थी, निवासी डॉक्टर्स, संस्थेतील अधिकारी, कर्मचारी, रुग्णालयाचे परिचर्या कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा मंडळाचे सुरक्षा रक्षक उपस्थित होते.

# ...अखेर बंद पथदिवे झाले सुरू

**अचलपूर/ वार्ताहर**

अचलपूर नगरपरिषद विद्युत विभागाच्या उदासीन कारभारामुळे अमरावती जिल्ह्यातील अ वर्ग दर्जा असलेल्या अचलपूर नगरपरिषद हद्दीतील जुळ्या शहरात मुख्य रस्त्यावरील पथदिवे बंद असल्याने नागरिकांना जीव मुठीत घेऊन रात्री प्रवास करावा लागत असल्याचे वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये १० जून रोजी प्रकाशित झाले होते. याची तत्काळ दखल घेत अचलपूर नगर परिषदेच्या नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी अचलपूर नगर परिषद विद्युत विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्याना जुळ्या शहरातील बंद पथदिवे तत्काळ सुरू करण्याचे निर्देश दिले.



अचलपूर नगर परिषदेच्या विद्युत विभाग कडे नवीन पथदिवे लावणे आणि बंद पथदिवे संदर्भात नागरिकांच्या असंख्य तक्रारी येत असतात. पण नगर परिषद विद्युत विभागाच्या उदासीन कारभारामुळे जुळ्या शहरातील अनेक भागात बंद पथदिव्यामुळे अंधार पसरल्याचे वृत्त दैनिक जनमाध्यम मध्ये १० जून रोजी प्रकाशित झाले. यासंदर्भात अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष रुपाली माथने यांनी तत्काळ दखल घेत संपूर्ण आढावा अचलपूर नगर परिषद विद्युत विभागाच्या अधिकाऱ्यांकडून घेतला. आणि तत्काळ बंद पथदिवे पूर्ववत सुरू करण्याचे निर्देश दिले.

यानंतर अचलपूर शहरातील माळवेशपुरा येथे गेल्या एक ते दीड महिन्यापासून बंद असलेले पथदिवे सुरू झाले.

आणि अचलपूर नगर परिषद शहर कार्यालयातील विद्युत विभागाकडे नागरिकांनी दिलेल्या तक्रारी मार्गी लावण्याचे सुद्धा निर्देश अचलपूर नगर परिषद नगराध्यक्ष माथने यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यामुळे नागरिकांनी नगराध्यक्ष रुपाली माथने, मुख्याधिकारी धीरज कुमार गोहाड आणि नगर परिषद विद्युत विभागाचे आभार मानले आहे.




**'जनमाध्यम'च्या बातमीची दखल**

# प्रा.डॉ.प्रदीप देशमुख यांना लाईफ टाईम अचिव्हमेंट अवार्ड

**अमरावती/ का.प्र.**

'परिसंस्था-आधारित अनुकूलन: बदलत्याहवामानाशी जुळवून घेण्यासाठी निसर्गा सोबत काम करणे.' या विषयावर आंतरराष्ट्रीय बहुशाखीय वेबिनारचे आयोजन कोलकता (पश्चिम बंगाल) येथे करण्यात आले होते. हे आयोजन भारत सरकारच्या ॲक्ट -छ, १८८२ अंतर्गत स्थापन झालेली संस्था आंतरराष्ट्रीय फाउंडेशन फॉर एन्व्हायरमेंट अँड इकॉलॉजी, कोलकत्ता (पश्चिम बंगाल) या संस्थेने केले होते. या संस्थेचे लाईफ टाईम मेंबर म्हणून प्रा.डॉ.प्रदीप देशमुख हे अनेक वर्षापासून काम करत आहेत. सदरील संस्था ही शैक्षणिक आणि संशोधन कार्याशी संबंधित अनेक कार्यशाळा, कॉन्फरन्स आणि वेबिनारचे आयोजन दरवर्षी करत असते.

उत्कृष्ट शैक्षणिक किंवा संशोधनात्मक कार्य करणाऱ्या ज्येष्ठ प्राध्यापकांना दरवर्षी त्यांच्या सेवेचा गौरव म्हणून लाईफ टाईम अचीवमेंट अवॉर्ड्स दिले



जाते. यावर्षी आयोजित केलेल्या या वेबिनारमध्ये शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती, येथील प्राणिशास्त्र विभागात कार्यरत सहयोगी प्राध्यापक डॉ.प्रदीप सुधाकरराव देशमुख यांना 'लाईफ टाईम अचीव्हमेंट अवॉर्ड २०२६' हे त्यांच्या तीस वर्षाच्या अखंड शैक्षणिक अध्यापन कार्याबद्दल सन्मान पूर्वक देण्यात आले.

संपूर्ण भारतातून सहभागी झालेल्या जवळपास १०० सहभागी प्राध्यापकां पैकी अध्यापन क्षेत्रातील हा पुरस्कार डॉ. प्रदीप देशमुख यांना देण्यात आला आणि संशोधन क्षेत्रामधील पुरस्कार हा राजस्थान मधील एका प्राध्यापकांना देण्यात आला आहे. याच वेबिनार मध्ये डॉ.प्रदीप देशमुख यांनी सादर केलेल्या संशोधन पेपरला 'उत्कृष्ट संशोधन पेपर' चा पुरस्कार मिळाला आहे. डॉ.प्रदीप देशमुख यांना मिळालेला हा पुरस्कार म्हणजे शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती या संस्थेचा गौरव आहे. या दुहेरी सन्माना बद्दल संस्थेचे संचालक प्रा.डॉ. सतीश माळोदे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.मंगेश शेळके, प्राणिशास्त्र विभागप्रमुख तथा संस्थेचे परीक्षा नियंत्रक डॉ.संतोष पवार, प्राणीशास्त्र विभागातील सहकारी प्राध्यापक डॉ.यशश्री गढीकर, डॉ.उज्वला देशमुख, डॉ.मिलिंद काळे, डॉ.वैभव ठाकरे आणि प्रसिद्ध समितीप्रमुख डॉ.सुनील इंगळे व डॉ.किशोरसिंह चुंगडे, संस्थेतील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्राणीशास्त्र विभागातील पदव्युत्तर वर्गातील सर्व विद्यार्थी यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.

# तणावमुक्त जीवनासाठी स्माईल मेडिटेशन साधना-डॉ.पंकज जैन

## ट्राय ओरिजिन स्माईल फाउंडेशनतर्फे नॅशनल सायंटिफिक सेमिनार व आरोग्य शिबीर

**अमरावती/ का.प्र.**

आधुनिक जीवनशैलीतील वाढता तणाव, भीती, मानसिक अस्वस्थता आणि विविध शारीरिक व्याधींवर मात करून आनंदी, संतुलित व निरोगी जीवन जगण्यासाठी स्माईल मेडिटेशन ही प्रभावी व नैसर्गिक उपचारपद्धती असल्याचे प्रतिपादन ट्राय ओरिजिन स्माईल फाउंडेशनचे संस्थापक तथा स्माईल मेडिटेशन अकादमीचे संचालक डॉ. पंकज जैन यांनी केले.

येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात ओरिजिन स्माईल फाउंडेशनच्या अमरावती व नागपूर शाखांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ट्राय ओरिजिन स्माईल मुद्रा मेडिटेशन नॅशनल सायंटिफिक सेमिनार व आरोग्य शिबीर' या कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने करण्यात आली. त्यानंतर दक्षिण कोरियाचे ख्यातनाम वैज्ञानिक प्रा. पार्क जे वू यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

मार्गदर्शन करताना डॉ. पंकज जैन यांनी सांगितले की, ट्राय ओरिजिन आणि स्माईल मेडिटेशनच्या तत्त्वांवर आधारित ही पद्धती हातावरील तसेच शरीरातील विविध ऊर्जा बिंदूंना सक्रिय करते. विविध मुद्रांच्या माध्यमातून या बिंदूंना उत्तेजना देऊन शरीर व मनातील असंतुलनाच्या मूळ कारणांवर कार्य केले जाते. मन, शरीर आणि



भावनांमध्ये सुसंवाद निर्माण करून व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी ही साधना उपयुक्त ठरते. यावेळी आयोजकांच्या वतीने डॉ. पंकज जैन यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच प्रमुख पाहुणे स्माईलर आशा सारडा, स्माईलर शारदा राठी आणि स्माईलर मोहन काजळे यांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमानिमित्त आयोजित भव्य आरोग्य शिबिरात देशभरातून आलेल्या प्रशिक्षित स्माईलर स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. यामध्ये मनप्रीत कौर (भोपाल), अन्नु नरेश (देहरादून), दलजीत कौर (भोपाल), दिपा विंचुरकर (दिल्ली), कुलदीप राजोरा (दिल्ली), मोहित चौधरी (भोपाल), निता टांक (मुंबई), राजेंद्र पवार (पुणे), सारिका जैन (भोपाल), मेघा देशपांडे-त्रिपाठी (दिल्ली), राखी मिश्रा (पुणे), सुनिता साळुंखे (पुणे), सरिता कुमार (ग्रेटर नोएडा), अंतरा चौधरी (रांची) आणि प्रणालीका पटेल (वडोदरा) यांच्यासह अनेक तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. शिबिराचा १००० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. शिबिरामध्ये एक्युप्रेशर (सुजोक), ॲक्युपंक्चर (मेरिडियन), इमोशन (चक्र व नाडी), योगाधारित श्वसन पद्धती, ताईची स्माईल मुद्रा मेडिटेशन तसेच स्माईल ब्रीद यांसारख्या नैसर्गिक उपचारपद्धतींचे प्रात्यक्षिक व मार्गदर्शन करण्यात आले. या उपचारपद्धतींमुळे मानसिक, भावनिक, वैयक्तिक आणि कौटुंबिक जीवन अधिक समृद्ध व संतुलित होण्यास मदत होत असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. नागरिकांसाठी सामूहिक स्माईल मेडिटेशन सत्राचेही आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक स्माईलर मनप्रीत कौर संचालन स्माईलर राखी मिश्रा आभार प्रदर्शन स्माईलर वैशाली बोरकर यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वैशाली बोरकर, निलीमा भटकर, विशाल सोमकुवर, वर्षा पेरके, शितल देशमुख, कविता पिंपळे, दिपा ढवळे, अमृता जाजू, माया आसावा, लीना डांगरे, दिपक करवा, आशिष राठी, शितल कडू, मिनल तायडे, प्रिती गावंडे, स्वागता, साक्षी देशमुख, शिल्पा देशमुख, मोनिका बडनखे, प्रांजली विघे, प्रणिता शेंदुरकर, जयश्री गुलवाडे, मालती वावरे, अनिशा कामदार, प्रतीक चिमणकर, मानसी भायानी, मालू ठाकरे, मीना बुर्डे, मिनाक्षी सिंह, कविता लातुरे, मनीषा कारमोरे, नेहा पाटील आणि वैशाली शिंगणे यांच्यासह अनेक स्वयंसेवकांचे विशेष योगदान लाभले.

# एकनिष्ठ नेतृत्व, शिक्षणसेवा आणि विकासदृष्टीचा अमृतमहोत्सव : हर्षवर्धन देशमुख

काही व्यक्तिमत्त्वे काळाच्या ओघात केवळ राजकीय नेते म्हणून ओळखली जात नाहीत, तर ती समाजजीवनाचा एक महत्त्वपूर्ण अध्याय बनतात. त्यांचे कार्य, विचार आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी पुढील पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरते. हर्षवर्धन प्रतापराव देशमुख हे असेच एक व्यक्तिमत्त्व आहे.त्यांच्या आयुष्याची ७५ वर्षे पूर्ण होत असताना हा केवळ अमृतमहोत्सव नसून विदर्भाच्या राजकीय,सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील एका समृद्ध प्रवासाचे स्मरण करण्याचा क्षण आहे.

१३ जून १९५१ रोजी एका प्रतिष्ठित राजघराण्यात जन्मलेल्या हर्षवर्धन प्रतापराव देशमुख यांना लोकसेवा, सामाजिक बांधिलकी आणि नेतृत्वाचा समृद्ध वारसा लाभला. बालपणापासूनच त्यांच्यावर कुटुंबातील सामाजिक मूल्यांचे आणि सार्वजनिक जीवनातील संस्कारांचे गहिरे प्रभाव पडले. त्यांचे प्राथमिक शिक्षण इयत्ता तिसरीपर्यंत जरूड येथे झाले. त्यानंतर काही काळ त्यांनी मध्य प्रदेशातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध अशा ग्वाल्हेर येथे शिक्षण घेतले. विविध प्रदेशांतील शैक्षणिक आणि सामाजिक वातावरणाचा अनुभव त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत महत्त्वाचा ठरला.

उच्च शिक्षणासाठी ते पुण्यात दाखल झाले. शिक्षण, विचार आणि सामाजिक चळवळींचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्याने त्यांच्या जीवनाला नवी दिशा दिली. कायद्याचे शिक्षण घेत असताना त्यांनी एल.एल.बी. पदवी संपादन केली. विद्यार्थी जीवनातच सामाजिक प्रश्न, लोकहिताचे विषय आणि सार्वजनिक कार्य याविषयी त्यांची विशेष आस्था निर्माण झाली. विविध विद्यार्थी चळवळी, संघटनात्मक उपक्रम आणि सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्याची अभ्यासू वृत्ती,प्रभावी नेतृत्वक्षमता, स्पष्ट विचारसरणी आणि संघटन कौशल्य यांमुळे विद्यार्थी आणि सामाजिक क्षेत्रात त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली. याच काळात त्यांच्या सार्वजनिक जीवनाच्या प्रवासाचा भक्कम पाया रचला गेला आणि पुढे राजकारण, शिक्षण व समाजसेवा या क्षेत्रांतील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दिशा निश्चित झाली.

पुण्यात उच्च शिक्षणासाठी असतांना विद्यार्थी चळवळीत काम करताना त्यांच्या कार्याची माहिती ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रभावी व्यक्तिमत्त्व असलेले शरद पवार यांच्यापर्यंत पोहोचली. विद्यार्थी चळवळींपासून सुरू झालेली ही ओळख पुढे विश्वास, मैत्री आणि राजकीय बांधिलकीच्या दृढ नात्यात रूपांतरित झाली. अनेक दशकांपासून हा स्नेहबंध टिकून आहे. राजकारणातील बदलत्या समीकरणांमध्ये अनेक नेते भूमिका बदलताना दिसले; परंतु हर्षवर्धन देशमुख यांनी आपल्या नेतृत्वाविषयीची निष्ठा आणि एकनिष्ठता अखंड जपली. हीच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वात मोठी ताकद मानली जाते.

१९९० मध्ये त्यांनी मोर्शी विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवून विजय मिळविला. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात अपक्ष उमेदवार म्हणून विजयी होणे, त्यानंतर मंत्रिपदापर्यंत मजल मारणे ही दुर्मीळ घटना मानली जाते. त्यांच्या कार्यक्षमतेची दखल घेत त्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले. त्यानंतर अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. प्रशासन,विकास आणि लोकहित यांचा समन्वय साधत त्यांनी आपल्या कार्यकाळात ठसा उमटविला.

१९९५ मध्ये त्यांनी पुन्हा जनतेचा विश्वास संपादन करून विधानसभा गाठली. त्यानंतर २००४ मध्येही ते आमदार म्हणून निवडून आले. अनेक वर्षे वरूड-मोर्शी परिसरात त्यांनी मजबूत कार्यकर्ता संघटना उभी केली. मतदारसंघातील जनतेशी सतत संपर्क ठेवणे, विकासकामांवर लक्ष केंद्रित करणे आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर तत्परतेने प्रतिसाद देणे ही त्यांची कार्यशैली राहिली. त्यामुळेच त्यांना केवळ राजकीय नेता म्हणून नव्हे, तर लोकनेता म्हणूनही ओळख मिळाली.

हर्षवर्धन देशमुख यांचे कार्य केवळ राजकारणापुरते मर्यादित नाही. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. विदर्भातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेल्या शिवाजी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी २०१७ मध्ये त्यांची



निवड झाली. विशेष म्हणजे संस्थापक डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यानंतर अध्यक्षपदी विराजमान होणारे ते पहिले देशमुख ठरले. ही निवड त्यांच्या नेतृत्वक्षमतेवर आणि शैक्षणिक दृष्टीकोनावर व्यक्त झालेला विश्वास होता.

२०२२ मध्ये दुसऱ्यांदा अध्यक्षपदी निवडून येणे हा त्यांच्या कार्याचा गौरव होता. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेच्या शाळा, महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण संस्था आणि वैद्यकीय शिक्षण क्षेत्राला नवी दिशा मिळाली.शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे,राष्ट्रीय स्तरावरील मानांकन सुधारणे,संशोधनाला चालना देणे,आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम करणे या उद्दिष्टांसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

विशेषतः संस्थेच्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. संस्थेचा दर्जा उंचावणे, गुणवत्तेच्या निकषांमध्ये सुधारणा करणे आणि विद्यार्थ्यांना अधिक सक्षम सुविधा उपलब्ध करून देणे यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे नेतृत्व हे केवळ प्रशासकीय नसून दूरदृष्टीपूर्ण आणि परिणामकारक आहे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांची निरपेक्ष वृत्ती ही आहे. संस्थेच्या कामासाठी त्यांनी वैयक्तिक स्वार्थाला कधीही प्राधान्य दिले नाही. संस्थेच्या कार्यासाठी स्वतःच्या खिशातून आर्थिक योगदान देण्याची त्यांची वृत्ती अनेकांना प्रेरणा देणारी आहे. पद, प्रतिष्ठा किंवा लाभ यापलीकडे जाऊन संस्था आणि समाजहितासाठी काम करणारे नेतृत्व आजच्या काळात दुर्मीळ मानले जाते.

विदर्भ वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी प्रदेशाच्या विकासासाठी भरीव योगदान दिले.सिंचन, उद्योग, शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि पायाभूत सुविधा या विषयांवर त्यांनी सातत्याने भूमिका मांडली. विदर्भाच्या विकासाचा प्रश्न हा केवळ प्रशासकीय नसून सामाजिक न्यायाचा विषय आहे, अशी त्यांची भूमिका राहिली. त्यांच्या प्रयत्नांमुळे विदर्भाच्या प्रश्नांना राज्यपातळीवर नवी दखल मिळाली.

हर्षवर्धन देशमुख साहेब यांचा स्वभाव स्पष्टवक्तेपणा, करारीपणा आणि तत्त्वनिष्ठतेसाठी ओळखला जातो. जे योग्य आहे ते निर्भीडपणे मांडण्याची त्यांची शैली अनेकदा चर्चेचा विषय ठरली आहे. तापट स्वभावाची ओळख असली तरी त्या स्वभावामागे अन्यायाविरोधातील असहिष्णुता आणि तत्त्वांवरील ठाम विश्वास दडलेला आहे. त्यामुळेच त्यांचे सहकारी, कार्यकर्ते आणि विरोधकही त्यांच्या प्रामाणिकपणाचा आदर करतात.

आज त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या जीवनप्रवासाकडे पाहताना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते. सत्ता,पद आणि प्रतिष्ठा यापेक्षा समाजहित, शिक्षणसेवा आणि विकास यांना त्यांनी नेहमीच अग्रक्रम दिला. त्यांनी जपलेली निष्ठा, उभारलेले संस्थात्मक कार्य आणि घडविलेली नेतृत्वपरंपरा ही पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरणारी आहे.

हर्षवर्धन प्रतापराव देशमुख यांचे ७५वे वर्ष म्हणजे एका व्यक्तीच्या आयुष्याचा टप्पा नाही; तर लोकसेवा, शिक्षण आणि विकासाच्या अविरत प्रवासाचा गौरव आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजहिताची ही परंपरा पुढे चालत राहावी, हीच त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त सर्वांच्या मनातील कृतज्ञ भावना आहे.

**डॉ. प्रशांत विघे**
सिनेट सदस्य
संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ,
अम-९३२६८७७७४९



# चला, पाल्यांना मराठी शाळेत घालू या! जि.प.च्या शाळांना प्रवेशासाठी निवडू या !

जून महिना उजाडला की नव्या शैक्षणिक वर्षाची चाहूल लागते. घराघरांत मुलांच्या शाळा प्रवेशाची लगबग सुरू होते. आपल्या पाल्याला कोणत्या शाळेत प्रवेश द्यावा, हा प्रत्येक पालकासमोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. अशा वेळी एक मराठी माणूस, एक जबाबदार पालक आणि आपल्या मातृभाषेचा अभिमान बाळगणारा नागरिक म्हणून आपण स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे-'आपल्या मुलाला जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत प्रवेश का देऊ नये?'

आज आपल्या राज्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, उत्तम शिक्षक, आधुनिक सुविधा आणि संस्कारक्षम वातावरण यामुळे नव्या उंचीवर पोहोचत आहेत. याला आणखी उंचीवर पोहोचविण्यासाठी आवश्यक आहे तो पालकांचा विश्वास ! आणि पालक म्हणून आपला सक्रिय सहभाग ! केवळ अफवा आणि यंत्रणेसंदर्भातील नकारात्मक दृष्टिकोन यामुळे ग्रामीण भागातील कमी खर्चाची, योग्य गुणवत्तेची आणि संस्कार करणारी एक यंत्रणा आम्ही कमकुवत तर करत नाही ना ? हा प्रश्न एकदा स्वतःला विचारणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रात आतापर्यंत इतिहास घडवला तो जिल्हा परिषदेच्या शाळांनी.या शाळांमधून आजचे उच्चपदस्थ अधिकारी, शास्त्रज्ञ,डॉक्टर, वकील,कवी, लेखक,कृषी तज्ञ,समाज सुधारक तयार झाले आहेत. विशेषतः मराठी माध्यमातू शिकूनही ते कुठेही गुणवत्तेत मागे पडलेले नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण आमच्या अनेक पिढ्यांनी अनुभवले आहे.अपार कष्ट ,अवहेलना सहन करून अशा शाळांमधून शिक्षण घेत त्यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. देशातील मोठमोठ्या संस्थांवरचे गुणवान जिल्हा परिषदेच्या शाळांमधूनच तयार झाले आहे. त्यामुळे आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या आणि विशेषतः जिल्हा परिषद शाळांच्या दारी नेण्याची हीच योग्य वेळ आहे.

**जिल्हा परिषद शाळा : गुणवत्तेची खात्री**

जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची निवड अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्तेच्या निकषांवर आधारित असते. शिक्षक पात्रता परीक्षा (TET), विविध स्पर्धात्मक प्रक्रिया, शैक्षणिक गुणवत्ता आणि शासनाने ठरवून दिलेल्या नियमांच्या आधारे शिक्षकांची नियुक्ती केली जाते. त्यामुळे समाजातील गुणवंत, प्रशिक्षित युवकच शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहतात. जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या गुणवत्तेची वेळोवेळी तपासणी होते. प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे या शाळांमध्ये अप्रशिक्षित शिक्षक हा प्रश्न निकाली निघाला आहे.

शिक्षक हे राष्ट्रनिर्माते असतात. आपल्या गुरु शिष्य प्राचीन परंपरेला याच शाळा पुढे घेऊन गेल्या आहेत. येथील शिक्षक केवळ अभ्यासक्रम शिकवत नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, संस्कारांसाठी, देशाच्या आधुनिक शैक्षणिक धोरणांशी जोडले गेले असतात. त्यामुळे शासकीय शैक्षणिक संस्था अर्थात आपल्या शाळा जबाबदार नागरिक घडविणारी यंत्रणा म्हणून पुढे आल्या आहेत.

**मातृभाषेतून शिक्षण : अधिक आत्मविश्वास देणारे**

शैक्षणिक संशोधन सातत्याने सांगते की, मुलांचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेत झाले तर त्यांची आकलनशक्ती, विचारशक्ती आणि सर्जनशीलता अधिक चांगल्या प्रकारे विकसित होते. मराठी माध्यमातून शिकणारी मुले केवळ भाषा शिकत नाहीत, तर आपल्या संस्कृतीशी, इतिहासाशी, परंपरांशी, वारशाशी आणि सामाजिक मूल्यांशी जोडली जातात.

मराठी भाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. ते आपले विचार स्पष्टपणे व्यक्त करू शकतात. इंग्रजी व अन्य भाषा शिकणे आवश्यक आहेच; परंतु शिक्षणाचा पाया मातृभाषेत असणे अधिक परिणामकारक असल्याचे अनेक जागतिक तज्ज्ञांनी नमूद केले आहे.

**सर्वात मोठे बलस्थान : समर्पित शिक्षक**

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना शासनाकडून नियमित व पूर्ण वेतन दिले जाते. त्यामुळे त्यांचे संपूर्ण लक्ष अध्यापन, विद्यार्थ्यांचा विकास आणि शाळेच्या प्रगतीकडे केंद्रित राहते. काही समर्पित शिक्षक स्वतःच्या खर्चातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देतात, विविध उपक्रम राबवितात आणि गावोगावी शिक्षणाची ज्योत तेवत ठेवतात. साने गुरुजींच्या महाराष्ट्रात आजही अनेक ठिकाणी शिक्षकांच्या नावाने ती शाळा ओळखल्या जाते.

आज अनेक जिल्हा परिषद शाळांनी डिजिटल वर्गखोल्या, संगणक शिक्षण, विज्ञान प्रयोगशाळा, ई-लर्निंग सुविधा, क्रीडा साहित्य आणि विविध नवोपक्रमांच्या माध्यमातून उल्लेखनीय प्रगती साधली आहे.सेमी इंग्लिश शिक्षण पद्धती शाळांनी अवलंब केली आहे.शालेय व्यवस्थापन समिती आणि माझी विद्यार्थी मंडळाकडून अनेक सुधारणा होत आहे.

**राज्याचे शैक्षणिक धोरण ;मातृभाषेचे महत्त्व**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तसेच महाराष्ट्र शासनाचे शैक्षणिक धोरण प्राथमिक स्तरावर मातृभाषेत शिक्षण देण्याला विशेष महत्त्व देते. मुलांचा बौद्धिक विकास, भाषिक कौशल्ये आणि संकल्पना समजून घेण्याची क्षमता वाढविण्यासाठी मातृभाषा हे सर्वात प्रभावी माध्यम असल्याचे या धोरणांमध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.याच विचारातून महाराष्ट्रातील मराठी शाळांना अधिक सक्षम, आधुनिक आणि गुणवत्तापूर्ण बनविण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. विशेष म्हणजे कला, क्रीडा, स्पर्धा परीक्षा या संदर्भातील मुलांच्या विकासाची यंत्रणा, श्रृंखला याच शाळांमध्ये पूर्ण होते. इथे निधी अभावी कधीही विद्यार्थ्यांच्या खिशातून पैसा काढून स्पर्धा घेतली जात नाही, रद्द होत नाही,पुढे ढकलली जात नाही. क्रीडा स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विज्ञान प्रदर्शनी, शिक्षकांचे प्रशिक्षण एकदा ठरले की पूर्ण केले जाते. राज्याच्या बाल कल्याण धोरणाला, बौद्धिक धोरणाला याच व्यासपीठावर राबविले जाते. त्यामुळे या यंत्रणेतून आपण बाद तर होत नाही ना ? याचा विचार व्हावा.

**आता प्रवेशासाठी लागतात रांगा**

एक काळ असा होता की काही पालकांना जिल्हा परिषद शाळा म्हणजे ग्रामीण भागातील भक्कम पर्याय वाटत असे. मात्र, अफवा, गैरसमज,आणि काही अपवादात्मक घटनांनी या शाळा मधल्या काळात ओस पडायला लागल्या होत्या. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. राज्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी आपल्या गुणवत्तेमुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे.सातारा, कोल्हापूर, पुणे, सिंधुदुर्ग, नाशिक, नागपूर, जळगाव आणि इतर अनेक जिल्ह्यांतील काही जिल्हा परिषद शाळांमध्ये प्रवेशासाठी पालकांची मोठी मागणी दिसून येते.अनेक शिक्षकांनी आपल्या दायित्वातून,गुणवत्तेतून,कल्पकतेने शाळांना नवी ओळख दिली आहे. डिजिटल शिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, संस्कारक्षम वातावरण आणि विद्यार्थ्यांचे उत्कृष्ट निकाल यामुळे या शाळांवर पालकांचा विश्वास वाढत आहे.

**नवे शैक्षणिक धोरण ;शाळांनी कात टाकली**

काही ठिकाणी अपवादात्मक शाळांच्या जीर्ण इमारती व आवश्यक सोयीसुविधांची कमतरता दिसते. त्यामुळे पालकांनी केवळ भौतिक सुविधा बघून शाळांबाबत भूमिका बनविणे अयोग्य आहे.गरिबातील गरीब विद्यार्थ्यापासून सर्वांना शिक्षण मिळावे, अशी समतोल भूमिका शासनाची आहे.त्यामुळे अतिशय माफक शुल्कामध्ये या शाळेतील शिक्षण मुलांना घेता येते.आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अनेक ॲप शाळांनी विकसित केले आहे.शिक्षकांना जबाबदारीने आपले कर्तव्य पार पाडावे लागत आहे.निपुण शाळा या मोहिमेतून शाळातील शिक्षणावर नियंत्रण ठेवले जात आहे. तिसऱ्या वर्गापासून प्रज्ञाशोध परीक्षा, चौथी व सातवीत होणारी स्कॉलरशिप परीक्षा, टॅलेंट सर्च परीक्षा,शालेय गणवेष, शालेय पोषण आहार, सगळ्यांना मोफत पुस्तके, केळी व अंडी वाटप, मुलींसाठी दैनिक भत्ता, मुलींना स्वतंत्र स्वच्छता गृह, सॅनेटरी नॅपकीनची उपलब्धता ,प्रवेश उत्सव, संस्कार शिबीर,अशा विविध उपक्रमांना शाळेत राबविण्यात येते. पहिलीपासून इंग्रजी अनिवार्य केले आहे. त्यामुळे इंग्रजी पासून कोणी वंचित राहत नाही. प्रत्येक जिल्ह्यातील काही शाळा सेमी इंग्लिश झाल्या आहेत. याशिवाय या सर्व यंत्रणेवर पालकांच्या पाच समित्यांचे नियंत्रण असते.त्यामुळे बाह्य चकाकी व इंग्रजी माध्यमांच्या आग्रहातून मुले दर्जेदार प्रशिक्षित शिक्षकांपासून, शिक्षणापासून वंचित राहू नये यावर विचार करण्याची ही गरज आहे.

**अनेक गावांनी शाळांसाठी घेतला पुढाकार**

मराठी शाळा वाचविणे म्हणजे आपली ओळख जपणे होय.घरापासून योग्य अंतरावर असणारी शाळा मुलांना त्यांच्या बाल्यावस्थेत खेळ व अन्य कला गुणांसाठी भरपूर वेळ वाचवू शकते. गावातील शाळा बाजूला ठेवून शहरातील, तालुक्याच्या ठिकाणच्या शाळांसाठी पालकांना मोठ्या प्रमाणात अतिरिक्त खर्चही करावा लागतो. वाहन व्यवस्था करावी लागते. यामध्ये मुलांच्या जडणघडणीचा वेळ जातो. अनेक गावांनी ग्रामपंचायतीमार्फत ज्या पालकांनी जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रवेश घेतला त्यांना घरपट्टीतही सवलत दिली आहे.अनेक गावांनी शिक्षकांना मुख्यालयी राहणे अनिवार्य केले आहे. गावाचे, गावातील प्रमुखांचे ,शाळांकडे लक्ष असणे आणि शिक्षकांचे गावातच राहणे यामुळे आदर्श जीवनपद्धतीची जपणूक ही होते. गावाप्रतीचा आदरही वृद्धिंगत होतो. शाळा म्हणजे केवळ शिक्षण देणारी संस्था नसते; ती संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि समाजाची ओळख जपणारे केंद्र असते. गरीबी, श्रीमंती सोबत मिळणारे एकत्रित शिक्षण सामाजिक जाणिवा वृद्धींगत करते. त्यामुळे मराठी शाळा टिकल्या तर मराठी भाषा टिकेल. मराठी भाषा टिकली तर महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक बळकट राहील.त्यामुळे आज आपल्या मुलाला मराठी शाळेत प्रवेश देणे म्हणजे केवळ एका शाळेची निवड नव्हे; तर आपल्या भाषेवर, संस्कृतीवर आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण व्यवस्थेवर व्यक्त केलेला विश्वास आहे.पालक,शिक्षक,अंगणवाडी सेविका,ग्रामसेवक, तलाठी, नगरसेवक, सरपंच, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षण तज्ज्ञ या सर्वांनीच ही बाब अधोरेखित करावी. अनियंत्रित खासगी यंत्रणेचे फटके समाज व्यवस्थेला बसत असताना, शिक्षणाची ही मूळ साखळी पुढे नेण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन शाळांना, शाळेच्या यंत्रणेला बळकट करणे आवश्यक आहे.

**चला, एक सकारात्मक निर्णय घेऊ या!**

यंदाच्या शैक्षणिक वर्षात आपल्या गावातील, परिसरातील जिल्हा परिषद शाळेला भेट द्या. तेथील शिक्षकांशी संवाद साधा. शाळेच्या सुविधा पाहा. विद्यार्थ्यांचे यश जाणून घ्या. आणि मग आपल्या पाल्याच्या भविष्यासाठी विचारपूर्वक निर्णय घ्या.आमचे आई-वडील, आम्ही आणि आमची मुले जिल्हा परिषदेच्या शाळेतच शिकलेलो आहे. त्यामुळे यावर्षी निर्धारपूर्वक ठरवूया, आपल्या पुढच्या पिढीतील पाल्यांना मराठी शाळेत घालू या...

मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यांचा अभिमानाने वारसा पुढील पिढीकडे सुपूर्द करू या!

**प्रवीण टाके**
उपसंचालक, (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर
मो.९७०२८५८७७७

# समाजाची यशाची व्याख्या आणि तणावग्रस्त तरुणाई

'महागडा फोन,मोठा पगार,आलिशान घर, चारचाकी गाडी आणि प्रतिष्ठित नोकरी' हीच आजच्या समाजाने यशाची व्याख्या ठरवून दिली आहे. लहानपणापासूनच मुलांच्या मनावर या यशाचे चित्र कोरले जाते. परिणामी स्वतःची आवड, क्षमता आणि स्वप्ने यांना दुय्यम स्थान मिळते. स्पर्धा परीक्षांचे वाढते महत्त्व, पालकांच्या अपेक्षा, समाजाची तुलना आणि आर्थिक सुरक्षिततेची चिंता यामुळे आजची तरुणाई प्रचंड तणावाखाली जगत आहे.

आजचे युग स्पर्धेचे युग म्हणून ओळखले जाते.शिक्षण,नोकरी करियर आणि आर्थिक प्रगतीसाठी प्रत्येक क्षेत्रात तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे.अनेक विद्यार्थ्यांचे जीवन कोचिंग क्लास, टेस्ट सिरीज आणि अभ्यास यांच्याभोवती फिरत आहे. JEE, NEET, UPSC यांसारख्या परीक्षांसाठी वर्षानुवर्षे मेहनत घेतली जाते.या परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी लाखो युवक-युवती दिवस-रात्र मेहनत घेत असतात.मात्र प्रत्येकाला यश मिळतेच असे नाही. काही विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणी, कौटुंबिक जबाबदाऱ्या, वेळेचा अभाव, सामाजिक दबाव किंवा इतर अनेक कारणांमुळे आपल्या स्वप्नांचा त्याग करावा लागतो.अशा परिस्थितीत समाजाने ठरवून दिलेल्या यशाच्या व्याख्येमुळे तरुणाईवर मानसिक तणावाचे मोठे ओझे निर्माण होत आहे.या प्रक्रियेत त्यांचे छंद, खेळ, कला आणि आनंदाचे क्षण हरवून जातात.पालकांच्या आणि समाजाच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी सतत धडपडत असतात. प्रत्येक परीक्षेत यश मिळविण्याची सक्ती, गुणांची तुलना आणि अपयशाची भीती यामुळे अनेक तरुण मानसिक तणाव, नैराश्य आणि आत्मविश्वासाच्या कमतरतेला सामोरे जातात.

आज एखाद्या व्यक्तीचे मूल्य तिच्या उत्पन्नावर किंवा पदावर ठरवले जाते.मात्र पैसा मिळाला म्हणजे आनंद मिळेलच असे नाही.आर्थिक यश असूनही अनेक जण मानसिक समाधान, कौटुंबिक आनंद आणि अंतर्मनाची शांतता गमावून बसतात.ज्या व्यक्तीला चित्रकला, साहित्य, संगीत, क्रीडा किंवा समाजसेवा यांसारख्या क्षेत्रांत करिअर करण्याची इच्छा असते अशा अनेक तरुणांना 'यात भविष्य नाही' असे सांगितले जाते.परिणामी ते स्वतःच्या आवडीचा त्याग करून दुसऱ्यांच्या स्वप्नांचे ओझे वाहू लागतात.

त्यामुळे अपयश आले की अनेक तरुण स्वतःला कमी लेखू लागतात. प्रत्यक्षात अपयश ही शिकण्याची आणि अधिक सक्षम होण्याची संधी असते.यशाची खरी व्याख्या प्रत्येक व्यक्तीसाठी वेगळी असते. केवळ पैसा, पद आणि प्रतिष्ठा यालाच यश मानणे योग्य नाही. ज्या क्षेत्रात व्यक्तीला आनंद, समाधान आणि आत्मिक शांतता मिळते, तेच त्यांच्यासाठी खरे यश असते. त्यामुळे पालक, शिक्षक आणि समाजाने तरुणांच्या आवडीनिवडी समजून घेऊन त्यांना



योग्य दिशा देणे आवश्यक आहे.

समाजाने यशाची व्याख्या बदलण्याची वेळ आता आली आहे. प्रत्येक व्यक्तीचे यश हे त्याच्या समाधानात, आनंदात आणि स्वप्नपूर्तीत दडलेले असते. पैसा आणि प्रतिष्ठा महत्त्वाची असली तरी मानसिक शांतता, आत्मसंतोष आणि जीवनातील आनंद याहून मोठे यश दुसरे नाही. तरुणांना त्यांच्या क्षमतेनुसार आणि आवडीनुसार वाटचाल करण्याचे स्वातंत्र्य मिळाले, तरच खऱ्या अर्थाने सक्षम,आनंदी आणि सुदृढ समाजाची निर्मिती होईल.

**उर्वशी संघवी**
मुर्तिजापूर,जि.अकोला

# दानापूर वान नदी उत्खनन प्रकरण : पंचनामा आणि अंतिम अहवालातील तफावत

## रजनीश पोटे यांनी केली उच्चस्तरीय चौकशीची मागणी

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

*अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तालुक्यातील मौजे दानापूर येथील वान नदीपात्रातील उत्खनन प्रकरण दिवसेंदिवस अधिक गंभीर स्वरूप धारण करीत असून, अधिकृत पंचनामा आणि त्यानंतर सादर करण्यात आलेल्या अंतिम अहवालातील कथित तफावतीमुळे या संपूर्ण प्रकरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते रजनीश पोटे यांनी जिल्हाधिकारी, महसूल मंत्री तसेच जलसंपदा मंत्र्यांकडे निवेदन सादर करून स्वतंत्र, निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.*

मिळालेल्या माहितीनुसार, २९ मे २०२६ रोजी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या मोका पाहणी पंचनाम्यात अनेक महत्त्वपूर्ण निरीक्षणांची नोंद करण्यात आली होती. मात्र त्यानंतर तयार करण्यात आलेल्या अंतिम अहवालात या निरीक्षणांचा अपेक्षित संदर्भ अथवा सखोल तांत्रिक विश्लेषण आढळून येत नसल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे चौकशी प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत आणि विश्वासार्हतेबाबत विविध स्तरांवर चर्चा सुरू झाली आहे.

निवेदनानुसार, पंचनाम्यातील सेक्शन 'सी-२' मध्ये १५ ते २० फूट खोलीपर्यंत सैल अथवा पोकळ माती असल्याची नोंद करण्यात आली होती. याशिवाय नदीपात्रातील सामग्री वाहून नेणारी वाहनेही आढळल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र अंतिम अहवालात या निरीक्षणांबाबत कोणतेही ठोस निष्कर्ष अथवा त्यांची स्वतंत्र पडताळणी नमूद करण्यात आलेली नसल्याचे रजनीश पोटे यांनी म्हटले आहे.

याचबरोबर उत्खननासाठी मंजूर असलेल्या तीन मीटर खोलीच्या मर्यादेचे पालन झाले की नाही, याबाबत सर्व क्षेत्रांचे वैज्ञानिक मोजमाप अहवालात उपलब्ध नसल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला आहे. मंजूर क्षेत्राबाहेर उत्खनन झाले का, नदीपात्रातील वाळू, गोटे अथवा इतर नैसर्गिक सामग्री बाहेर नेण्यात आली का, वाहतुकीची नोंद व पडताळणी करण्यात आली का, अशा अनेक मूलभूत प्रश्नांची स्पष्ट उत्तरे अंतिम अहवालात



नसल्याचा दावा करण्यात आला आहे. निवेदनात ब्लॅक कॉटन सॉईल (बीसीएस) नदी परिसरात टाकण्यात आल्याच्या आरोपांचाही उल्लेख करण्यात आला आहे. अशा प्रकारची माती टाकण्यात आली असल्यास त्यासाठी आवश्यक शासकीय परवानग्या घेण्यात आल्या होत्या का, याची तपासणी होणे आवश्यक असल्याचे पोटे यांनी नमूद केले आहे.

या प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग. ग्रामपंचायत दानापूर आणि स्थानिक ग्रामस्थांना या प्रक्रियेत विश्वासात घेण्यात आले होते का, ग्रामपंचायतीचे मत विचारात घेण्यात आले होते का, तसेच संबंधित प्रस्ताव ग्रामसभेसमोर ठेवण्यात आला होता का, याची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

रजनीश पोटे यांनी आपल्या निवेदनात मंजुरी प्रक्रियेबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. स्थानिक ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांच्या माहितीनुसार, मंजुरी आदेशात नमूद करण्यात आलेल्या प्रमाणात 'ऑर्डिनरी अर्थ' अथवा गाळ प्रत्यक्षात उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात येत आहे. जर ही बाब सत्य ठरली, तर ६ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाने दिलेली मंजुरी कोणत्या सर्वेक्षण, भूवैज्ञानिक अहवाल किंवा तांत्रिक पडताळणीच्या आधारे देण्यात आली, याचा शोध घेणे आवश्यक ठरेल, असे त्यांनी म्हटले आहे. प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी डीजीपीएस, ड्रोन सर्व्हे आणि टोटल स्टेशन सर्व्हे यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्खननाची खोली, क्षेत्रफळ आणि प्रत्यक्ष प्रमाण निश्चित करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित वाहनांचे जीपीएस रेकॉर्ड, ट्रान्झिट पास, रॉयल्टी अभिलेख आणि वाहतूक नोंदींची सखोल तपासणी करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

चौकशी पूर्ण होईपर्यंत उत्खनन आणि सामग्री वाहतुकीची कामे तात्पुरती स्थगित करण्यात यावीत, तसेच अधिकृत पंचनाम्यातील बाबी जाणीवपूर्वक अंतिम अहवालातून वगळल्याचे अथवा चुकीची माहिती सादर केल्याचे आढळल्यास संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांवर कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. 'वान नदी ही केवळ जलस्रोत नसून स्थानिक शेतकरी, नागरिक, भूजल पुनर्भरण व्यवस्था आणि पर्यावरणाचा महत्त्वपूर्ण आधार आहे. विकासकामे आवश्यक असली तरी ती नियम, विज्ञान आणि पारदर्शकतेच्या चौकटीतच झाली पाहिजेत.

या प्रकरणात प्रश्न केवळ उत्खननाचा नसून अधिकृत नोंदी आणि अंतिम निष्कर्षांतील तफावतीचा आहे. सत्य जनतेसमोर येण्यासाठी स्वतंत्र आणि निष्पक्ष चौकशी अपरिहार्य आहे,' असे रजनीश पोटे यांनी निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, दानापूर वान नदी उत्खनन प्रकरणात उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांमुळे प्रशासन, महसूल विभाग आणि संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीकडे लक्ष वेधले गेले असून, याप्रकरणी शासन स्तरावर कोणती भूमिका घेतली जाते, याकडे आता जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

---

## बाभुळगाव येथील डेक्कन आयटीआय मध्ये प्रवेश सुरू

**अकोला :** श्री अकोला गुजराती समाज द्वारे संचालित येथून जवळच असलेल्या बाभुळगाव येथील डेक्कन आयटीआय मध्ये सन २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश देणे सुरू आहे. इलेक्ट्रिशियन, सोलर टेक्निशियन, इलेक्ट्रिकल वेल्डर तथा कोपा या कोर्ससाठी विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज भरणे सुरू झाले आहे.

---


### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८३४/२०२६ — प्रोसेस नं.७४१६/२०२६

चौ.ता. २७/०७/२०२६ — दिनांक : १०/०६/२०२६

**अर्जदार :** १. तुषार श्रीधर खत्री रा. फ्लॅट नं. २०३, दुसरा मजला, बन्सी विहार, बिरला कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला. २. शितल रघुनंदन अरोरा रा. घर नं २५, वार्ड नं. ०१, पंचम विहार कॉलनी, अलोट, रतलम एम. पी.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : संध्या श्रीधर खत्री

**पत्ता :-** रा. फ्लॅट नं. २०३, दुसरा मजला, बन्सी विहार, एस मार्ट शॉपीच्या मागे, न्यु बिरला कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संध्या श्रीधर खत्री यांचे दि. २५/०१/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०६/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७९०/२०२६ — प्रोसेस नं.७४१३/२०२६

चौ.ता. १५/०७/२०२६ — दिनांक : १०/०६/२०२६

**अर्जदार :** १. विजय भिमराव कलमखेडे २. यश विजय कलमखेडे मो. नं. ८१६९२०१५२७ दोघेही रा. प्लॉट नं. ४, उमानंद सरस्वती मंदिरा जवळ, भेंडे लेआउट, नागपूर, ता. जि. नागपुर.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : अल्का विजय कलमखेडे

**पत्ता :-** रा. व्दारा लक्ष्मी कमलाकर घावट रा. एमआयडीसी क्र. २ रोड, गवळी मंगल कार्यालय समोर, व्हीएचबी कॉलनी जवळ, मलकापूर, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसाळ प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अल्का विजय कलमखेडे यांचे दि. १५/११/२०२५ रोजी नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०६/ २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### CHANGE OF NAME

I, NILOFAR FIRDOUS EJAZ KHAN (Old Name) R/o. Bhagatwadi, Galli No. 4, Raja Chowk, Old City, Akola, Tq. Dist. Akola, hereby declare that, my said name is mistakenly and by typographical technical mistake mentioned as **NILOFAR FIRDOUS EJAZ KHAN** (Old Name) on the passport of my husband **EJAZ KHAN FIROZ KHAN** Passport No. Y6495708. That, my name on all my documents are mentioned as **"NILOFAR KHAN EJAZ KHAN"** therefore, I have changed my name as **"NILOFAR KHAN EJAZ KHAN"** (New Name) as per my Passport No. Y6494673 and Adhar Card No. 8225 3534 1489. I am the one and the same person of the above said two names and there is no any person of the said names other than me.


---

## चान्नी पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी गंगाधर दराडे

### अवैध धंद्यांवर लगाम लावण्याचे मोठे आव्हान



**▶▶ अवैध धंद्यांवर कारवाईकडे लागल्या नजरा**

चान्नी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वरली मटका, देशी दारू, जुगार आदी अवैध धंद्यांविषयी सातत्याने चर्चा होत असते. त्यामुळे या धंद्यांवर प्रभावी कारवाई करून त्यांना आळा घालण्याचे मोठे आव्हान गंगाधर दराडे यांच्यासमोर उभे आहे. नवीन अधिकारी रुजू झाल्यानंतर सुरुवातीला धडक कारवाया होत असल्या, तरी पुढे त्या कारवायांचा वेग कायम राहणे महत्त्वाचे असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

■ प्रतिनिधी | खेट्री ■

चान्नी पोलीस ठाण्याच्या ठाणेदारपदी सहाय्यक पोलीस निरीक्षक गंगाधर दराडे यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या रुजू होण्याने परिसरातील नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी १० जून रोजी आदेश काढून ही नियुक्ती जाहीर केली. यापूर्वी येथे कार्यरत असलेले ठाणेदार रवींद्र लांडे यांची नागपूर येथे बदली करण्यात आली आहे.

गंगाधर दराडे यांनी यापूर्वी जवळपास तीन वर्षे पिंजर पोलीस ठाण्याचा कार्यभार सांभाळला आहे. त्यांनी ११ जून रोजी चान्नी पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारला. यावेळी पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती. दराडे यांच्या अनुभवाचा फायदा चान्नी परिसरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी होईल, असा विश्वास नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

चान्नी पोलीस ठाण्याच्या हद्दीत तब्बल ४४ गावांचा समावेश असून, या विस्तृत परिसरात कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्याबरोबरच नागरिकांच्या तक्रारींचे तत्परतेने निराकरण करण्याची जबाबदारी नव्या ठाणेदारांवर असणार आहे. नागरिकाभिमुख कारभार आणि गुन्हेगारीवर नियंत्रण याकडे त्यांचे विशेष लक्ष राहील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

परिसरातील अवैध व्यवसायांवर कठोर कारवाई, गुन्हेगारीवर नियंत्रण आणि सर्वसामान्य नागरिकांना न्याय देणारा पारदर्शक पोलीस कारभार याबाबत नागरिकांच्या अपेक्षा नव्या ठाणेदारांकडून वाढल्या आहेत. आता त्यांच्या कार्यकाळात चान्नी पोलीस ठाण्याचा कारभार कोणत्या दिशेने पुढे जातो, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

---

## महाराणा प्रताप जयंतीसाठी राजपूत समाजाची बैठक संपन्न



■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराणा प्रताप सेवा समिती तथा सकल राजपूत समाजाच्या वतीने महाराणा प्रताप जयंतीसाठी राजपूत समाजाची द्वितीय बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सिटी कोतवाली जवळील महाराणा प्रताप चौक येथील महाराणा प्रताप बाग मध्ये आयोजित या बैठकीत आगामी १७ जून रोजी होणाऱ्या महाराणा प्रताप जयंती महोत्सवाच्या रूपरेषेवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्वानुमते जयंती दिनाचा संपूर्ण कार्यक्रम आणि त्याचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. यावर्षीचा उत्सव अत्यंत उत्साहात आणि भव्य दिव्य स्वरूपात साजरा करण्याचा निर्धार सर्व समाजबांधवांनी या वेळी व्यक्त केला. समाजाच्या अनेक मान्यवरांनी यावेळी जयंती च्या सूचना मांडल्यात. यावेळी बहुसंख्य समाज बांधव उपस्थित होते.

---

## अदानी फाउंडेशनच्या पुढाकारातून ३० महिलांना शिलाई मशीनचे वाटप



■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने अदानी फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात आलेल्या शिलाई प्रशिक्षण व शिलाई मशीन वितरण उपक्रमाला येळवण गावात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एक महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केलेल्या ३० गरजू महिलांना शिलाई मशीन व शिलाई किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे महिलांच्या हाताला रोजगार मिळण्यास मदत होणार असून त्यांच्या आर्थिक उन्नतीचा नवा मार्ग खुला झाला आहे. ग्रामपंचायत येळवण येथे आयोजित लोकार्पण सोहळ्याला अदानी फाउंडेशनचे अधिकारी श्री. राम बाबू मेरूगुमाला, निखिल आवारे, सोमेश भोसले, जनार्दन कापगाटे, मनीष खेडकर व गणेश पागोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच सरपंच सौ. काजल दिनेश मडावी, उपसरपंच आम्रपाली अनिल वाहूर वाघ, ग्रामपंचायत सदस्य नंदा कुंबरे, नंदा सोनवणे, वेणूताई चोरपगार, शेषराव शेंद्रे व निरंजन गडलिंग यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी राजेश बापू देशमुख, डी. एम. गडलिंग, नाजुकराव चोरपगार सामाजिक कार्यकर्त्यांसह बचत गटांच्या महिला, ग्रामस्थ व लाभार्थी उपस्थित होते.

---

## दोन महिन्यांतच रस्त्याची चाळणी; मनसेचा रास्ता रोकोचा इशारा

■ प्रतिनिधी | खेट्री ■





पातूर तालुक्यातील दिग्रस बुद्रुक ते तुलंगा या रस्त्याची सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेली डागडुजी अवघ्या दोन महिन्यांतच उखडून गेल्याने रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. परिणामी वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असून, अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या प्रकारामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने संताप व्यक्त करत तातडीने रस्त्याचे डांबरीकरण न झाल्यास रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

दिग्रस बुद्रुक ते तुलंगा हा परिसरातील महत्त्वाचा संपर्क मार्ग असून या मार्गावरून दररोज शेकडो वाहनांची वर्दळ असते. काही महिन्यांपूर्वी रस्त्यावरील खड्डे बुजविण्याचे काम करण्यात आले होते. मात्र संबंधित काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. डागडुजी झाल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांतच रस्त्यावर पुन्हा खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. त्यामुळे दुचाकीस्वारांसह इतर वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दररोज लहान-मोठे अपघात घडत असून अनेक नागरिक जखमी झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. तरीही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

**सा.बां. विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह**

दिग्रस बुद्रुक ते तुलंगा रस्त्यावरील डागडुजीचे काम दोन महिन्यांतच निकामी ठरल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाचा लाखो रुपयांचा निधी खर्च करूनही रस्त्याची दुरवस्था कायम असल्याने संबंधित कामाच्या गुणवत्तेची चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. शासनाचा निधी वाया घालविणाऱ्या संबंधितांवर कारवाई करावी, अशीही मागणी पुढे येत आहे.

हिंदू जननायक राज ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा संपर्क अध्यक्ष हेमंत गडकरी यांच्या आदेशानुसार जिल्हाध्यक्ष राजेश काळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रसिद्धीप्रमुख प्रेम पाटील, विकास शेवलेकर, सागर ठाकरे, सुनील ढोले, गोविंदा शेवलेकर आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी ११ जून रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन सादर केले. संबंधित रस्त्याचे तातडीने दर्जेदार डांबरीकरण करण्यात यावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

---

## मळसूरच्या गॅस एजन्सीवर नियमभंगाचे आरोप

### जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील मळसूर येथील सोपीनाथ इंडियन ग्रामीण वितरक गॅस एजन्सीकडून सुरक्षा व कायदेशीर नियमांचे उल्लंघन होत असल्याचा गंभीर आरोप करत सामाजिक कार्यकर्ते शुभम थिटे यांनी १२ जून रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे. एजन्सीच्या कारभारामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.



तक्रारीनुसार, एजन्सीकडे अधिकृत व सुरक्षित गोदामाची व्यवस्था नसून व्यावसायिक दुकानातच मोठ्या प्रमाणात गॅस सिलेंडरची साठवणूक केली जात आहे. त्यामुळे आग अथवा इतर दुर्घटना घडल्यास मोठी जीवितहानी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच एजन्सीमध्ये आवश्यक अग्निशमन यंत्रणा, फायर पंप आणि इतर सुरक्षा उपाययोजनांचा अभाव असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ग्राहकांना घरपोच गॅस सेवा उपलब्ध करून देण्याऐवजी सिलेंडर दुकानातूनच नेण्यास भाग पाडले जात असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सिलेंडर वितरणावेळी वजन तपासणी केली जात नसल्याचा, गॅस गळती तपासणीसाठी आवश्यक उपकरणांचा वापर होत नसल्याचा तसेच ग्राहकांसाठी तक्रार निवारण पुस्तिका व दरफलकही लावण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची पुरवठा विभाग, वजन-माप विभाग आणि विस्फोटक नियंत्रण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून संयुक्त पाहणी करण्यात यावी, संबंधित ठिकाणाचा पंचनामा करून नियमबाह्य साठवलेले सिलेंडर जप्त करण्यात यावेत आणि दोषी आढळल्यास एजन्सीचा परवाना रद्द करण्यात यावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

**नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

मळसूरसारख्या ग्रामीण भागात गॅस सिलेंडरची धोकादायक पद्धतीने साठवणूक होत असल्याचे आरोप समोर आल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासन या तक्रारीची दखल घेऊन चौकशी करते का, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

'मळसूर येथील सोपीनाथ इंडियन ग्रामीण वितरक गॅस एजन्सीकडून वारंवार नियमांचे उल्लंघन होत असून कोणतीही सुरक्षितता पाळली जात नाही. प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने सखोल चौकशी करून कठोर कारवाई करावी आणि नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे.'

**शुभम थिटे,**
सामाजिक कार्यकर्ते, मळसूर

---


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १८७**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# नीट घोटाळ्याने विद्यार्थ्यांचे भविष्य पेटले

## धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या घोषणांनी वर्धा दणाणले; विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी युवक काँग्रेस आक्रमक

**वर्धा/जनमाध्यम**

देशभरात संतापाची लाट उसळविणाऱ्या नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ वर्धा जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने गुरुवारी सायंकाळी शहरात मशाल मोर्चा काढण्यात आला. हजारो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांशी खेळ करणाऱ्या या घोटाळ्याविरोधात युवक काँग्रेस रस्त्यावर उतरली असून, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या तात्काळ राजीनाम्याची जोरदार मागणी करण्यात आली.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा नागपूर विभागीय प्रभारी कपिल ढोके यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या मोर्चाने शहरातील राजकीय वातावरण तापवून टाकले. ठाकरे मार्केट परिसरातून मशाली, निषेधाचे फलक आणि घोषणाबाजी करत निघालेला मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौकात




पोहोचला. विद्यार्थ्यांना न्याय द्या, पेपरफुटी करणाऱ्यांना अटक करा, धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या अशा घोषणांनी संपूर्ण परिसर हादरून गेला.मोर्चादरम्यान वक्त्यांनी केंद्र सरकारवर सडकून टीका केली. 'देशातील लाखो विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करून नीट परीक्षेची तयारी करतात. पालक कर्ज काढून मुलांना शिक्षण देतात. मात्र पेपरफुटीमुळे त्यांच्या कष्टांवर पाणी फेरले जात आहे. ही फक्त परीक्षा नाही, तर विद्यार्थ्यांच्या भविष्याशी झालेली क्रूर थट्टा आहे, असा संतप्त सूर यावेळी उमटला.प्रदेश उपाध्यक्ष कपिल ढोके यांनी माध्यमांशी बोलताना केंद्र सरकारवर थेट निशाणा साधला. नीट पेपरफुटी हा देशाच्या शिक्षण व्यवस्थेवरील काळा डाग आहे. विद्यार्थ्यांचा विश्वास उध्वस्त करणाऱ्या या प्रकरणाची नैतिक जबाबदारी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी स्वीकारली पाहिजे. विद्यार्थ्यांना न्याय मिळेपर्यंत युवक काँग्रेसचा संघर्ष थांबणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

मोर्चात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनीही संतप्त भावना व्यक्त केल्या. आम्ही वर्षानुवर्षे मेहनत करतो, पण काही भ्रष्ट लोक पैशांच्या जोरावर विद्यार्थ्यांचे भविष्य विकत आहेत. सरकारने आता तरी कठोर कारवाई करावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली.या आंदोलनात युवक काँग्रेसचे जिल्हा प्रभारी सागर चव्हाण, सहप्रभारी आयुषी देशमुख, जिल्हाध्यक्ष सुनील कोल्हे, माजी जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर, शेखर शेंडे, महिला जिल्हाध्यक्ष अरुणा धोटे, प्रदेश सचिव अफझल बेरा, अंकुश मुंजेवार, एनएसयूआय अध्यक्ष विश्वभूषण पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी सहभागी झाले होते.तसेच राहुल सुरकार, अंकित हिवरे, अमित ददगल, प्रतीक सूर्यवंशी, अमोल उघडे, प्रीतम हिंवज, शिवराज शिंदे, अंशुल भोसले, हिमांशू ठाकरे, आयुष ढोमणे यांच्यासह युवक कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी शहरात कडेकोट पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.एकूणच, नीट पेपरफुटी प्रकरणावरून वर्ध्यात युवक काँग्रेसने आक्रमक भूमिका घेत विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर थेट रस्त्यावर उतरून संघर्ष छेडला असून, या आंदोलनाची धग आगामी काळात आणखी वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

राष्ट्रवादीच्या २७ व्या वर्धापनदिनावर अमर काळेंचा रणगर्जना

# परतीचे दोर कापा; आता लढाई थेट मैदानात

**मुंबई/वर्धा/जनमाध्यम**

आता माघार नाही... परतीचे दोर कापून संघर्षाच्या मैदानात उतरावे लागेल. विलीनीकरण आणि एनडीएसोबत जाण्याच्या चर्चांना पूर्णविराम देण्याची वेळ आली आहे, अशा आक्रमक शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते खा. अमर काळे यांनी कार्यकर्त्यांना आगामी निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राज्यभरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आपल्या भाषणात खा. काळे यांनी पक्षातील संभ्रम, विरोधी राजकारणातील संघर्ष आणि आगामी निवडणुकांची दिशा यावर स्पष्ट भूमिका मांडली.खा. अमर काळे म्हणाले की, कर्नाटकचे मुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी सत्तेच्या विरोधात राहून सातत्याने संघर्ष केला. लोकांमध्ये राहून



त्यांनी पक्ष मजबूत केला आणि त्याच संघर्षातून सत्ता स्थापन करून दाखवली. आपल्यालाही तोच मार्ग स्वीकारावा लागेल. रस्त्यावर उतरून जनतेच्या प्रश्नांसाठी लढावे लागेल.

छत्रपती शिवाजी महाराज आणि तानाजी मालुसरे यांच्या इतिहासाचा दाखला देत त्यांनी कार्यकर्त्यांना भावनिक साद घातली. कोंढाणा किल्ल्याच्या लढाईत तानाजी मालुसरेंनी सैनिकांचे परतीचे दोर कापले होते. कारण मागे हटण्याचा पर्यायच त्यांनी ठेवला नव्हता. आज आपल्यालाही तीच भूमिका घ्यावी लागेल. विलीनीकरण किंवा एनडीएसोबत जाण्याबाबत सुरू असलेल्या चर्चांवरही त्यांनी स्पष्ट भाष्य केले. 'आम्ही गावागावात गेलो की कार्यकर्ते आणि जनता सतत एकच प्रश्न विचारते. त्यामुळे हा संभ्रम आता संपवण्याची गरज आहे. आपण आपल्या विचारांवर ठाम राहून निवडणुका लढणार आहोत, असे त्यांनी सांगितले.शरद पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करताना काळे म्हणाले, साहेबांचा आशीर्वाद आणि तळागाळातील कार्यकर्त्यांची ताकद आपल्या पाठीशी आहे. संघर्ष कठीण आहे, पण अशक्य नाही. जिद्द, मेहनत आणि जनतेशी असलेले नाते यांच्या जोरावर आपण आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत यश मिळवू.त्यांच्या भाषणादरम्यान सभागृहात वारंवार टाळ्यांचा कडकडाट झाला. आक्रमक भाषणामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याची चर्चा कार्यक्रमस्थळी रंगली होती. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक पवित्रा घेणार असल्याचे संकेत खासदार अमर काळे यांच्या भाषणातून स्पष्टपणे दिसून आले.

## संक्षिप्त

### दगडाच्या हल्ल्यात युवक जखमी

**हिंगणघाट-** संत तुकडोजी वॉर्ड परिसरात क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून युवकावर दगडाने हल्ला करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिगांबर वानखेडे (वय ३५) रा. संत तुकडोजी वॉर्ड हिंगणघाट यांचा मजुरीच्या कारणावरून साहिल मेश्राम याच्याशी वाद झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर साहिल मेश्राम याने शिवीगाळ करत दिगांबर यांच्या दिशेने दगड फेकला. या हल्ल्यात दिगांबर जखमी झाले. तसेच आरोपीने जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.घटनेनंतर जखमीला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

### निरीक्षण गृहातील बालक बेपत्ता

**वर्धा-** गोपुरी येथील शासकीय मुलांच्या निरीक्षण गृहातील एका अल्पवयीन बालकाला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळविल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी शहर पोलिसांनी गुन्हा दाखल करून शोधमोहीम सुरू केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित बालकाचे वय १७ वर्षे ११ महिने असून तो नागपूर जिल्ह्यातील हिंगणा परिसरातील रहिवासी आहे. निरीक्षण गृह प्रशासनाच्या लक्षात बालक बेपत्ता असल्याचे आल्यानंतर शोध घेण्यात आला. मात्र तो न सापडल्याने अखेर पोलिसांत तक्रार नोंदविण्यात आली.अज्ञात व्यक्तीने बालकाला फूस लावून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

### गवऱ्यांच्या वादातून मारहाण

**सेलू-** शेतातून गवऱ्या का नेल्या, या कारणावरून झालेल्या वादातून युवकाला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची घटना घोराड येथे घडली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कपिल थूल यांना दिनेश गोमासे याने गवऱ्या नेण्याच्या कारणावरून जाब विचारला. त्यानंतर दोघांमध्ये जोरदार वाद झाला. वाद वाढताच आरोपीने कपिल थूल यांना मारहाण केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली.

# पोलीस व्यवस्थेवर रिपाइंचे गंभीर आरोप

## संतोष टालेंच्या बदलीची मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) चे विदर्भ प्रदेशाध्यक्ष महेंद्र मुनेश्वर यांनी वर्धा जिल्ह्यातील पोलीस व्यवस्थेवर गंभीर आरोप करत वर्धा शहर पोलीस निरीक्षक संतोष टाले यांच्या तात्काळ बदलीची मागणी केली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात त्यांनी जिल्ह्यात अवैध दारू विक्री आणि हप्ता वसुली वाढत असल्याचा आरोप केला. काही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याविरोधातील तक्रारी दडपल्या जात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. वर्धा शहर, सेवाग्राम, सावंगी (मेघे) आणि रामनगर परिसरात अवैध दारू व्यवसाय सुरू असून त्यावर कठोर कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. महेंद्र मुनेश्वर यांनी नागरिकांना भ्रष्टाचारासंदर्भातील ऑडिओ व व्हिडिओ पुरावे गोळा करून अधिकृत तक्रारी करण्याचे आवाहन केले. तसेच पालकमंत्री, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांनी या प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

**फक्त टालेंवरच आरोप का**

वर्धा शहर पोलीस निरीक्षक संतोष टाले यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांनंतर शहरात विविध चर्चांना उधाण आले आहे. यावेळी एका सुज्ञ नागरिकाने प्रतिक्रिया देताना, रामनगर, सेवाग्राम, सावंगी (मेघे) आणि शहर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरू आहेत.

मग केवळ शहर पोलीस निरीक्षक संतोष टाले यांच्यावरच बदली करण्याचा आरोप का केले जात आहेत असा प्रश्न उपस्थित केला.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी अवैध दारू, जुगार आणि इतर व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येतात. त्यामुळे संपूर्ण यंत्रणेची निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे आहे, असेही त्यांनी म्हटले.

या प्रतिक्रियेमुळे शहरात नव्या चर्चांना सुरुवात झाली असून, पोलिस प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दारूसाठी पैसे न दिल्याने युवकाला मारहाण

**हिंगणघाट/वार्ताहर**

दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणावरून एका युवकाला मारहाण करण्यात आल्याची घटना काली सडक परिसरात घडली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रफुल धोटे यांनी हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली. तक्रारीनुसार,नामदेव मडावी रा. मुजूमदार वॉर्ड हिंगणघाट याने दारू पिण्यासाठी पैशांची मागणी केली होती. मात्र पैसे देण्यास नकार दिल्यानंतर आरोपीने वाद घालत शिवीगाळ केली आणि मारहाण केली.घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमी युवकाने पोलिसांत धाव घेतल्यानंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# शिवीगाळ रोखल्याचा राग; युवकावर चाकू हल्ला

**हिंगणघाट -** कवडघाट नदीपात्र परिसरात शिवीगाळ करण्यास हटकलेल्या युवकावर चाकू हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. या प्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.माहितीनुसार, संदीप सुरकार यांनी रोहित मोरे व अमीत मोरे या दोघांना मजुरासोबत वाद घालत शिवीगाळ करू नका, असे सांगितले. याचाच राग आल्याने रोहित मोरे याने धारदार चाकूने संदीप यांच्यावर हल्ला करून जखमी केले. तर अमीत मोरे



याने जीवे मारण्याची धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद आहे.घटनेनंतर जखमी युवकाला उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले. तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# राज्यातील एकल महिलांसाठी स्वतंत्र धोरण

## सूचना व अभिप्राय सादर करण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

राज्य शासन राज्यातील विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता, अविवाहीत तसेच इतर एकल महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी स्वतंत्र एकल महिला धोरण तयार करीत आहे. हे धोरण अधिक व्यापक, लोकाभिमुख आणि परिणामकारक व्हावे यासाठी एकल महिला, नागरिक, स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक,संशोधक आणि विषयतज्ञ यांच्याकडून सूचना व हरकती मागविण्यात येत आहे.

एकल महिलांच्या समस्या केवळ मांडण्याऐवजी त्या समस्यांवर शासनाने कोणत्या ठोस उपाययोजना करावे, कोणत्या नवीन योजना सुरु कराव्यात, विद्यमान योजनांमध्ये कोणते बदल करावेत, तसेच आवश्यक असल्यास कोणत्या कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये सुधारणा करण्यात याव्यात याबाबत सविस्तर सूचना मागविण्यात आल्या आहेत.सूचना पाठवितांना केवळ त्रोटक स्वरुपातील मते न पाठविता, संबंधित विषयाची पार्श्वभूमी, अपेक्षित उपाययोजना, संभाव्य लाभार्थी आणि अपेक्षित परिणाम यांचा समावेश असलेले सविस्तर प्रस्ताव पाठवावेत.

समाजातील एकल महिला तसेच सर्व संबंधित घटकांचा सक्रीय सहभाग या धोरण निर्मिती प्रक्रियेत असणे आवश्यक आहे. त्यामुळे सुचना शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी ८२०८५८९१९५ या व्हॉट्सअॅप क्रमांकाचा वापर करुन सुचना सादर करावे, प्राप्त होणाऱ्या सूचना व अभिप्रायांचा एकल महिला धोरणाचा मसुदा तयार करतांना योग्य तो विचार करण्यात येईल. राज्यातील सर्व नागरिक, स्वयंसेवी संस्था, महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अभ्यासक व विषयतज्ञ यांनी या महत्वपूर्ण अपक्रमात सहभागी होऊन शासनास सहकार्य करावे, असे आवाहन विभागाच्यावतीने करण्यात आले असल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

# तंबाखूच्या विळख्यात अडकलेल्या तरुणाला 'नवे तोंड'

**वर्धा/जनमाध्यम**

तंबाखू, गुटखा, खर्रा आणि सुपारीच्या सततच्या सेवनामुळे होणाऱ्या 'ओरल सबम्यूकस फायब्रोसिस' (ओएसएमएफ) या गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या एका ग्रेड-४ रुग्णावर वर्ध्यातील सिद्धार्थ गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक स्कारलेस शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आली. या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला पुन्हा सामान्यपणे तोंड उघडता येऊ लागल्याने वैद्यकीय क्षेत्रात या उपचाराची चर्चा सुरू झाली आहे. ओएसएमएफमुळे संबंधित रुग्णाचे तोंड अत्यंत कमी उघडत होते. त्यामुळे खाणे, बोलणे आणि दैनंदिन हालचाली करणेही कठीण झाले होते. योग्य प्रकारे अन्न ग्रहण करता न आल्याने त्याचे वजन झपाट्याने घटले होते. वाढत्या त्रासामुळे रुग्ण मानसिक तणावातही गेला होता.रुग्णाची तपासणी केल्यानंतर डॉ. नितीन भोला यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञांच्या पथकाने प्रगत पुनर्रचनात्मक शस्त्रक्रियेचे नियोजन केले. शस्त्रक्रियेदरम्यान तोंडातील कडक झालेल्या फायब्रस पट्ट्या काढण्यात आल्या. त्यानंतर नासोलॅबियल फ्लॅप' या आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे तोंडाच्या आतील



ओरल सबम्यूकस फायब्रोसिसवर स्कारलेस सर्जरी

भागाची पुनर्बांधणी करण्यात आली. या तंत्राचे वैशिष्ट्य म्हणजे चेहऱ्यावर कोणताही ठळक डाग राहत नाही.यावेळी डॉ. नितीन भोला म्हणाले, ओएसएमएफ झाल्यानंतर उपचार शक्य नसतात, असा अनेकांचा गैरसमज आहे. मात्र वेळेवर निदान आणि आधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञानामुळे रुग्णाला पुन्हा सामान्य जीवन देता येते.दरम्यान, डॉ. चेतन गुप्ता आणि त्यांच्या टीमने तोंडात जळजळ होणे, तोंड कमी उघडणे, चावण्यास त्रास होणे किंवा बोलण्यात बदल जाणवणे यांसारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करण्याचे आवाहन केले. हा आजार पुढे जाऊन तोंडाच्या कर्करोगात रूपांतरित होऊ शकतो. त्यामुळे तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहून वेळीच वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### बोरगावात व्यक्तीची आत्महत्या

**वर्धा-** बोरगाव (मेघे) येथे एका व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.मृत व्यक्तीचे नाव कृष्णाजी श्रावणजी गव्हाणे (वय ५५) रा. बोरगाव (मेघे) असे आहे. मंगळवारी सकाळच्या सुमारास त्यांनी राहत्या घरात गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.
कुटुंबीयांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेतली; मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता.घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला असून या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समोर आले नसून पोलिस पुढील तपास करीत आहेत.

### अनुसूचित जाती जमातीच्या शेतकऱ्यांना महाडीबीटीवर अर्ज करण्याचे आवाहन

**वर्धा-** प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषि विकास योजना प्रति थेंब अधिक पीक या योजनेंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना ठिबक व तुषार सिंचन संच बसविण्यासाठी ९० टक्केच्या मर्यादेत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. इच्छुक पात्र शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सुक्ष्म सिंचनासाठी लाभ घेणाऱ्या अल्प व अत्यल्प भुधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ४५ टक्केच्या मर्यादेत लाभ देण्यात येतो. उर्वरीत १० टक्के व १५ टक्के अनुदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेतील विशेष घटक या बाबी अंतर्गत अदा करण्यात येते. असे एकुण अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना ९० टक्केच्या मर्यादेत अनुदान देण्यात येणार आहे.या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरील https://mahadbt.maharashtra.gov.in/Farmer/AgriLogin या लिंकवर तात्काळ अर्ज सादर करावे.

# खाकीचे रक्षण करताना भविष्यही सुरक्षित हवे

## आर्थिक साक्षरतेचा पोलीस दलाला मंत्र

**वर्धा/जनमाध्यम**

अहोरात्र जनतेच्या सुरक्षेसाठी धावणाऱ्या खाकी वर्दीमागील कुटुंबाचे आर्थिक भविष्यही सुरक्षित असावे, या भावनेतून वर्धा पोलीस मुख्यालयात 'आर्थिक साक्षरता आणि गुंतवणूक नियोजन' या विषयावर विशेष कार्यशाळा पार पडली. पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या संकल्पनेतून आणि अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमाला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



लाभला. प्रसिद्ध सनदी लेखापाल जगदीश चांडक यांनी उपस्थितांना बचतीसोबत योग्य गुंतवणुकीचे महत्त्व पटवून दिले. शेअर बाजार, म्युच्युअल फंड, पीपीएफ, एनपीएस तसेच शासकीय योजनांमधील गुंतवणुकीचे फायदे आणि जोखमींचे व्यवस्थापन त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितले.सायबर फसवणुकीच्या वाढत्या घटनांचा उल्लेख करत जादा परताव्याच्या आमिषाला बळी पडू नका, असा सावधगिरीचा इशाराही त्यांनी दिला. निवृत्तीनंतर आर्थिकदृष्ट्या स्वाभिमानी आणि चिंतामुक्त जीवन जगण्यासाठी योग्य नियोजन किती आवश्यक आहे, याचोही त्यांनी प्रभावी उदाहरणांसह मार्गदर्शन केले. कार्यशाळेनंतर अनेक पोलिस कर्मचाऱ्यांनी आपल्या आर्थिक शंकांचे निरसन करून घेतले.

# मोदींच्या दीर्घायुष्यासाठी रविवारी महाआरती

**वर्धा/जनमाध्यम**

देशाचे पंतप्रधान यांनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेत नवा इतिहास रचल्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने १४ जून रोजी वर्धा येथे विशेष महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. साई मंदिर, वर्धा येथे सकाळी १०.३० वाजता हा कार्यक्रम होणार असून पंतप्रधान मोदी यांच्या उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि देशाच्या प्रगतीसाठी प्रार्थना करण्यात येणार आहे.



यावेळी राज्याचे शालेय शिक्षण, गृह (राज्य), गृहनिर्माण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री तथा पालकमंत्री प्रमुख उपस्थिती लावणार आहेत.

कार्यक्रमादरम्यान जिल्ह्यातील अंगणवाडी केंद्रांना शैक्षणिक साहित्याचे वितरणही करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे बालकांच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.कार्यक्रमाला भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी खासदार, जिल्हाध्यक्ष संजय गाते, माजी खासदार सुरेश वाघमारे, माजी जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, नगर परिषदेचे उपाध्यक्ष प्रदीपसिंह ठाकूर यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष- १४ अंक १९६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# सावर्डीच्या खोब्रागडे कुटुंबातील बहीण भावाची यशोगाथा

## बहिण पीएसआय तर भावाची पोलिस दलात निवड

**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** अमरावती तालुक्यातील सावर्डी येथील सर्वसामान्य कुटुंबातील भावंडांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यशाची नवी गाथा लिहिली आहे. जिल्हा परिषद मराठी शाळेत शिक्षण घेतलेल्या प्रतिक्षा रुपचंद खोब्रागडे यांनी महाराष्ट्र पोलिस अकादमीचे कठोर प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून पोलिस उपनिरीक्षक (PSI) पदाला गवसणी घातली आहे. तर त्यांचे बंधू सुमित रुपचंद खोब्रागडे यांचीही वरणगाव पोलिस दलात निवड झाली आहे.

ग्रामीण भागातील मर्यादित सुविधा असतानाही प्रतिक्षा यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली. जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि अथक परिश्रमाच्या बळावर त्यांनी पोलिस उपनिरीक्षक पद मिळवून आपल्या कुटुंबासह सावर्डी गावाचे नाव अभिमानाने उंचावले आहे.प्रतिक्षा यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जिल्हा परिषद मराठी शाळेत झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी त्या प्रेरणास्थान ठरल्या आहेत. त्यांच्या यशातून मोठी स्वप्ने पाहून मेहनत केल्यास कोणतेही ध्येय साध्य करता येते, हा संदेश त्यांच्या यशाने दिला आहे.



दुसरीकडे, त्यांचे बंधू सुमित खोब्रागडे यांनीही पोलिस सेवेत जाण्याचे स्वप्न उराशी बाळगून सातत्याने प्रयत्न केले. अखेर त्यांच्या मेहनतीला यश मिळाले असून त्यांची वरणगाव पोलिस दलात निवड झाली आहे. एकाच कुटुंबातील दोन्ही भावंडांनी पोलिस सेवेत स्थान मिळवल्याने खोब्रागडे कुटुंबावर आणि संपूर्ण सावर्डी गावावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्र पोलिस अकादमीतील प्रशिक्षण पूर्ण करून गावात परतलेल्या प्रतिक्षा खोब्रागडे यांचे ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, युवक, महिला आणि विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

# अनुदानाचे आमिष दाखवून एकाची फसवणूक

## खाते उघडून घेत एटीएम व सिम कार्ड ताब्यात

### बँक खाते बंद झाल्यानंतर प्रकार उघड

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिरखेड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कातपूर परिसरात सरकारी अनुदान मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका व्यक्तीच्या नावावर बँक खाते उघडून त्याचा वापर सायबर फसवणुकीसाठी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. बँकेने संबंधित खाते बंद केल्यानंतर हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी गुणवंत विनायकराव सासणे (वय ३०, रा. वाघोली, ता. मोर्शी) यांच्या तक्रारीवरून अमरावती येथील राकेश नावाच्या व्यक्तीविरुद्ध फसवणूक तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी राकेश याने गुणवंत सासणे यांना सरकारी अनुदान मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्याच्या सांगण्यावरून सासणे यांनी बँक ऑफ महाराष्ट्रमध्ये बचत खाते उघडले. खाते उघडल्यानंतर आरोपीने संबंधित खाते क्रमांक, खात्याशी संलग्न जिओ कंपनीचे सिम कार्ड तसेच एटीएम कार्ड स्वतःच्या ताब्यात घेतले. यासाठी त्याने सासणे यांना प्रलोभन म्हणून ७ हजार देण्याचे आश्वासन दिले होते. दरम्यान, १० जून रोजी गुणवंत सासणे काही कामानिमित्त बँकेत गेले असता, बँक कर्मचाऱ्यांनी त्यांना त्यांच्या खात्यात सायबर फसवणुकीतून प्राप्त झालेली रक्कम जमा झाल्याची माहिती दिली. तसेच तपास यंत्रणांच्या निर्देशानुसार संबंधित खाते पूर्णपणे बंद करण्यात आल्याचेही सांगितले. ही माहिती मिळताच सासणे यांना धक्का बसला आणि अनुदानाच्या नावाखाली आपली फसवणूक झाल्याची जाणीव झाली. यानंतर त्यांनी तातडीने शिरखेड पोलिस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी राकेशविरुद्ध फसवणूक आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# आ.सुलभा खोडके यांच्या जनसंपर्क कार्यालयात राष्ट्रवादीचा वर्धापन दिन साजरा

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला गत वैभव प्राप्त करून देण्याचा निर्धार

**अमरावती/प्रतिनिधी: -** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २७ वर्षाचा प्रवास हा केवळ एका राजकीय पक्षाचा इतिहास नाही, तर महाराष्ट्राच्या विकासाचा, समृद्ध परंपरेचा, लोकविकासाचा, शेतकऱ्यांच्या संघर्षाचा आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याचा इतिहास आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जडणघडणीत आणि देशभरात पक्षाचा विस्तार करण्यासाठी दिवंगत लोकनेता अजितदादा पवार यांनी दिलेल्या अतुलनीय योगदानामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने अधिकाधिक सक्षम आणि बळकट होऊन भरारी घेतली आहे. अजितदादांचे कार्य हे आपल्या सर्वांसाठी फार मोठी प्रेरणा आहे. राष्ट्रवादीचे हेच वलय. लौकिक आणि वैभव आता राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वात पुढे आणण्यासाठी व प्रत्येक सर्वसामान्य सहकाऱ्यांना पाठबळ देऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला नव्या उंचीवर नेण्याचा निर्धार राष्ट्रवादी परिवाराने व्यक्त केला.

आज बुधवार दिनांक १० जुन २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा २७ वा वर्धापन दिन आमदार सुलभा संजय खोडके यांच्या रेल्वे स्टेशन चौक स्थित जनसंपर्क कार्यालय येथे मोठ्या समर्पण , संघर्ष व संकल्प भावतेतून साजरा करण्यात आला. सर्वप्रथम पक्षाचे प्रेरणास्थान दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. त्यांनतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ध्वजाचे ध्वजारोहण व मानवंदना देऊन पक्षाचा गौरव सोहळा साजरा करण्यात आता.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वात तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनात व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश महासचिव ( संघटन ) आ.संजय खोडके यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत राष्ट्रवादी काँग्रेस परिवाराच्या वतीने हा २७ वा वर्धापन दिन अत्यंत भावनिक आणि समर्पित वातावरणात संपन्न झाला.

महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी, शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी, युवकांच्या भविष्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी लोकनेता अजितदादा पवार अहोरात्र झटत राहिले. अजितदादांची स्वप्नपूर्ती व त्यांचे विकासाचे व्हिजन आता पुढे न्यायचे असल्याने आता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना. सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून पक्षाला नवे बळ व नवी ऊर्जा देण्याचा संकल्प यावेळी तमाम उपस्थित राष्ट्रवादी परिवाराच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ वर्षाच्या प्रवासात पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते यांचा मोलाचा वाटा आहे, अजितदादांच्या स्वप्नपूर्ती व विकासाच्या समृद्धीच्या दिशेने जाण्यासाठी आपल्या सर्वांना जोमानं कामाला लागायचं आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षावर जनतेने दाखवलेला विश्वास, दिलेले प्रेम, आशीर्वाद याबद्दल यश खोडके यांनी आभार व्यक्त करीत सर्वांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या २७ व्या वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमरावती शहर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, राष्ट्रवादी युवती सेल, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस , राष्ट्रवादी काँग्रेस सेवा दल, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मागासवर्गीय सेल, अल्पसंख्यांक सेल, राष्ट्रवादी किसान सेल, शिक्षक आघाडी, राष्ट्रवादी क्रीडा विभाग, सांस्कृतिक विभाग, मजदूर संघ, शिक्षक संघ , आरोग्य सेल, व्यापारी संघ, कंत्राटदार सेल, आदींचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची विचारधारा मानणारा जनसमुदाय व नागरिक प्रामुख्याने उपस्थित होते.

# काजल इंगळे हत्या प्रकरणातील आरोपी अखेर ताब्यात

## -प्रहारच्या आंदोलनाला यश, पोलिसांचे मानले आभार

**अमरावती/प्रतिनिधीः-** काजल इंगळे हत्या प्रकरण समोर आल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती. काजलच्या आरोपींना तत्काळ अटक करावी. यासाठी कुटुंबियांनी प्रहार जनशक्ती संघटनेच्या नेतृत्वात पोलिस आयुक्त कार्यालय परिसरात आंदोलन केले होते. यावेळी पोलिस आयुक्त राजेश ओला यांनी स्वतः निवेदन स्वीकारले होते. त्याअनुषंगाने तात्काळ तपासाचे चक्र आणखी तीव्र करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार गुरुवारी आरोपीला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस करत आहे. दरम्यान प्रहाराच्या आंदोलनाने मृतक तरुणीला आणि कुटुंबीयांना न्याय मिळाला असल्याचे बोलले जात आहे.

२ जून रोजी तपोवन टेकडी परिसरात एका अर्धवट जळालेल्या अवस्थेत २२ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली होती. नातेवाईच्या मदतीने मृतकची ओळख काजल इंगळे अशी पटली होती. मात्र, पाच ते सहा दिवस उलटूनही या प्रकरणातील आरोपी शोधण्यात उशीर होत असल्याने कुटुंबीयांनी प्रहार जनशक्ती संघटनेच्या नेतृत्वात पोलीस आयुक्त यांना निवेदन दिले होते तसेच त्यानंतर आंदोलनही करण्यात आले. आरोपीला अटक करण्याची मागणी करण्यात आली होती. या आंदोलनाची दखल घेऊन पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी संबंधित पोलीस यंत्रणेला आदेश देऊन तत्काळ हत्येतील आरोपी अटक करावी.



तसेच लवकरात लवकर या घटनेचा तपास करण्याच्या सूचना दिल्या होत्या. गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपीला अटक केली असून हा आरोपी मृतक तरुणीचा परिचित आहे. पोलिसांनी हत्येचा छडा लावल्याने प्रहार संघटनेचे जिल्हा अध्यक्ष छोटू महाराज वसु, महानगर प्रमुख बंटी रामटेके आदींनी पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्यासह पोलिस यंत्रणेचे आभार मानले आहेत.

# चोरट्याने लांबवलेले मंगळसूत्र जप्त

## -२४ तासांत आरोपी अटकेत



**अमरावती/प्रतिनिधीः-** पॅनकार्ड नसल्यामुळे मंगळसूत्र गहाण ठेवण्याचा व्यवहार रद्द झाल्यानंतर एका महिलेच्या हँडबॅगमधून मंगळसूत्र चोरी करणाऱ्या आरोपीला सिटी कोतवाली पोलिसांनी अवघ्या २४ तासांत जेरबंद केले. आरोपीकडून सुमारे ७२ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र जप्त करण्यात आले आहे.

अंजनगाव बारी येथील रहिवासी परवीन शेख मजहर उल्लाह (वय ३८) या ९ जून रोजी आपल्या पतीसह जयस्तंभ चौकातील एका वित्तीय संस्थेत मंगळसूत्र गहाण ठेवण्यासाठी गेल्या होत्या. मात्र पॅनकार्ड नसल्याने त्यांना मंगळसूत्र गहाण ठेवता आले नाही. त्यानंतर त्यांनी मंगळसूत्र आपल्या हँडबॅगमध्ये ठेवून जुनी तहसील परिसरात पॅनकार्ड बनविण्यासाठी गेल्या.

दरम्यान, हँडबॅगची चैन उघडी असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. तपासणी केली असता बॅगेतील सोन्याचे मंगळसूत्र चोरीला गेल्याचे आढळले. याप्रकरणी त्यांनी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती.तक्रारीनंतर पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. गुप्त माहितीच्या आधारे आरोपी नानिया गयनीया पवार (वय ३१, रा. राजुरा पारधी बेडा) याचा शोध घेऊन त्याला त्याच्या राहत्या गावातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपीने चोरीची कबुली दिली. त्यानंतर त्याच्याकडून अंदाजे ७ ते ८ ग्रॅम वजनाचे, सुमारे ७२ हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र हस्तगत करण्यात आले.

या प्रकरणाचा छडा लावत सिटी कोतवाली पोलिसांनी वेगवान तपास करत अवघ्या एका दिवसात आरोपीपर्यंत पोहोचण्यात यश मिळविले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार आरोपीला समजपत्रावर मुक्त करण्यात आले. पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट, पोलीस निरीक्षक (गुन्हे) रामदास पालवे, उपनिरीक्षक तुषार गावंडे, रंगराव जाधव तसेच तपास पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

**2 BHK FLAT FOR SALE**

**भाग्य नगर**
**गणेडीवाल लेआउट**
**कॅम्प-अमरावती**

-संपर्क-
9422190814
9518527395

**श्रीमती रोहिणी वि.मनोरे दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तिवसा, जि.अमरावती यांचे न्यायालय**

**जाहीरनामा**

आर.एम.जे.सी.क्र.२४/२०२६ — ने.ता.१६.०६.२०२६

**अर्जदार -**
१.पुष्पा आनंदराव कळंबे, वय ७२ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.व्दारा -आनंदराव कळंबे, मु.पो.वरखेड, ता.तिवसा, जि.अमरावती- ४४४९०३
२.कुंदन आनंदराव कळंबे, वय ५३ वर्षे, व्यवसाय - मजुरी
रा.घर नं.५८,वडाळी रोड, न्यू कॉंग्रेस नगर,
रुक्मीणी नगर, अमरावती, ता.जि.अमरावती- ४४४६०६
३.ज्योत्स्ना संजय कार्लेकर, वय ४९ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.वार्ड नं.५, सिध्दी विनायक मंदिर जवळ, स्वागत कॉलनी,
पिप्री मेघे, ता.जि.वर्धा- ४४२००१
४.मिताली मंगेश दांडगे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.३०१-ए, अर्जुन एंपायर, कृष्णार्पन कॉलनी मागे, शिलांगण रोड,
साई नगर अमरावती, ता.जि.अमरावती- ४४४६०७
५.सुनिता गजानन अळसपुरे, वय ४५ वर्षे, व्यवसाय - गृहिणी
रा.व्दारा -अंबादास अळसपुरे, मु.पो.भरसवाडी,
वार्ड नं.२, ता.तिवसा, जि.अमरावती- ४४४९०३

-- विरुध्द --

**गैरअर्जदार-** निरंक

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **पुष्पा आनंदराव कळंबे व इतर** यांनी दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, तिवसा यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ शेडयुल ८ अन्वये** अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **आनंदराव माधवराव कळंबे** यांचा मृत्यू दिनांक १२.०८.२०२५ रोजी वरखेड, ता.तिवसा, जि.अमरावती येथे झालेला आहे. नर्मदा माधवराव कळंबे यांचा मृत्यू सन २०१५ साली वरखेड, ता.तिवसा, जि.अमरावती येथे झालेला आहे. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे ईतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू **आनंदराव माधवराव कळंबे** मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दि.१४ माहे फेब्रुवारी २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर, तिवसा

**जाहीर सुचना**

आम जनतेला सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **अनुप येवतीकर** यांनी खालील मिळकत **गजानन आनंदराव डाहके** यांच्याकडून विकत घेण्याचा करार केला असून सदर मिळकती संदर्भात या अगोदर सदरच्या मालमत्तेवर कोणाचाही प्रत्यक्ष,अप्रत्यक्ष हितसंबंध, अधिकार, इसार किंवा करार, गाहण बोजा असल्यास किंवा कोणतेही खाजगी अथवा वित्तीय संस्था, बैंक यांचा गहाण बोझा असल्यास सदर सुचना पासुन ७ दिवसात सर्व कागदपत्र घेऊन आपल्या अधिकार संदर्भात खालील पत्यावर संपर्क करावा.

सदर सुचनेच्या मुदतीत कोणतेही आक्षेप न आल्यास माझे पक्षकार सदर खरेदी विक्रीचा सौदा करतील व त्यानंतर कोणाचाही उजर चालणार नाही व होणा-या नुकसानास जबाबदार राहील करिता सदरची जाहीर सूचना.

**मिळकतीचे वर्णन**

अमरावती महानगरपालिकेच्या हददीतील व नोंदणी पोट तुकडी, अमरावती शहरचे कक्षेतील मौजे- बडनेरा,भाग-३, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील भूमापन क्रमांक व उपविभाग ३१९/३/३१९/३/ब मधील वि.जिल्हाधिकारी साहेब, अमरावती यांचे फाईलावरील ज्याचा रे.के.नं.एन.ए.पी.-३४/बडनेरा-५९/१९९७-९८, नि.ता.२४/१२/१९९८ (ऑनलाईन प्रमाणे एन.ए.पी-३४/५७/१९९७-९८) नुसार लेआउट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या **''साईकृपा विहार''** या नावाने ओळखल्या जाणा-या जागेतील खुला प्लॉट क्र. १०-ए (दहा-ए) याची साईज ८.५० X १९.४२ मी.असून याचे एकूण क्षेत्रफळ १६५ चौ.मि.(१७७६ चौ.फुट) आहे. या प्लॉटची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस - लेआऊट मधील रोड
पश्चिमेस - लेआऊट प्लॉट क्र.५-बी
उत्तरेस - लेआऊट प्लॉट क्र.१०-बी
दक्षिणेस - लेआऊट प्लॉट क्र.९-बी

**दिनांक १२/०६/२०२६**

**शिक्का व सही**
**पत्ता- अॅड.वैभव न.काकिर्डे**
१९, हरिओम कॉलनी,
संताजी नगर, अमरावती
मो.- ९६७३८२१००१

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती**

**चौकशीची जाहीर नोटीस**

**फेरफार अहवाल/अर्ज क्र.:** **64/19/2026**
**सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक** **बिस्मील्लाह वेलफेअर ट्रस्ट बडनेरा, ता.जि.अमरावती**
**बाबत अर्जदार -** **मोहम्मद हबिब अब्दुल जलील**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,

सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक २०.०५.२०२६ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.८६६/२०२६**
**श्री रविंद्र + ५-वि- निरंक**
**पुढील ता.१६.०६.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

1. Ravindra s/o. Dattatray Deo,
   Age 65 Yrs. Occu.: Unemployed
   R/o. Old Town, Badnera, Tq. & Dist. Amravati-444701
2. Sau. Nila w/o. Sunil Deshpande
   Age 72 Yrs. Occu.: Household,
   R/o. Rajashri Colony, Dastur Nagar, Rukhmini Nagar Amravati- 444606
3. Sau Jyosna w/o. Jayant Gokhale,
   Age 70 Yrs. Occu.: Household,
   R/o. Balaji Plot, H.V. Nagar, Amravati- 444605
4. Smt. Surekha wd/o Suresh rao Dorle
   Age 67 years, Occu.-Household,
   R/o. Near Ram Mandir Chhagani Nagar, Amravati
5. Deceased Nanda Wasudeo Panchghare by her legal heirs
   1. Wasudeo Babulal Pachghare,
      Age-66 yrs, Occu.- Retired doctor
   2. Ku. Dhanashree d/o.Vasudev Pachghare
      Age-37 yrs, Occu.- Household,
      Both applicants No.5 (I) & 5 (II) are R/o.Chandra Nagar, Old Town, Badnera, Tq. & Dist. Amravati - 444701

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,मयत दत्तात्रय गोपाळराव देव हे दिनांक ११.०५.११९३ रोजी अमरावती,ता.जि.अमरावती येथे व विजय दत्तात्रय देव हे दि.२४.१२.२०२५ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार रविंद्र अधिक पाच विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री रविंद्र अधिक पाच विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०४.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--

पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

**पाहिजेत**

**मॉयनॉरिटीज वेल्फेअर सोसायटी, तारखेडा, अमरावती -एफ १३१७**
**व्दारा संचालित अल्पसंख्याक दर्जा प्राप्त**
**मॉयनॉरिटीज उर्दू मिडल स्कूल, तारखेडा, अमरावती**
**येथे खालील प्रमाणे रिक्त जागा भरणे आहे**

| पदाचे नांव | संवर्ग | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता नाव | वेतन मानधन | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| शिक्षण सेवक | खुला | २ | HSC/D.Ed/ (उर्दू माध्यम) TET/CTET Paper-I (उत्तीर्ण आवश्यक) | शासनाच्या नियमानुसार | अनुदानित |

दिनांक १६.०६.२०२६ बुधवार रोजी मुळ प्रमाणपत्रासह छायाचित्र प्रतीसह स्वःखर्चाने मॉयनॉरिटीज उर्दू प्राथमिक व पुर्व माध्यमिक शाळा, तारखेडा अमरावती, ता.जि.अमरावती चे कार्यालयात सकाळी ११ ते २ वाजता मुलाखती करीता उपस्थित राहावे.

**मुख्याध्यापिका**
**मॉयनॉरिटीज उर्दू प्राथमिक व पुर्व माध्यमिक शाळा, तारखेडा अमरावती,**

**अध्यक्ष**
**मॉयनॉरिटीज वेल्फेअर सोसायटी, तारखेडा अमरावती,**

**जाहीर नोटीस**

**नमुना क्र.-१**
**अमरावती येथील मा.ह.भ.शेळके, न्यायाधिश, कौटूंबिक न्यायालय, यांच्या न्यायालयातील**

**पिटीशन क्र.अ ५१/२०२४** — **पेशी दि.२४ जुलै २०२६**

**सौ.नितु गणेश आसगावकर ..... वादी**
**- विरुध्द -**
**गणेश सुरेश आसगावकर ..... प्रतिवादी**

**प्रति,**
**गणेश सुरेश आसगावकर**
**रा.रुम नं. ०६ ते ३१ भांडुप कोठीवाडा ता.कुरला, जि.मुंबई सुबरबन**

ज्याअर्थी उपरनामित अर्जदारांनी आपल्या विरुध्द वाद पत्रात नमुद केल्याप्रमाणे दावा दाखल केला आहे.

आपणास हे समन्स बजावल्यापासून ३ आठवडयाच्या आत न्यायालयाच्या परवानगीसह व्यक्तीश आपली उपस्थिती याव्दारे आवश्यक आहे, आणि त्याअर्थी सदरहू दावा निर्देशाकरिता दिनांक **२४ जुलै २०२६** दिवशी न्यायाधिशांच्या बोर्डावर ठेवण्यात येईल.

आपणास याद्वारे फर्माविण्यात येते की, आपण वादीच्या दाव्याला उत्तर देण्याकरिता न्यायाधिशांच्या समोर दिनांक **२४ जुलै २०२६** या दिवशी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे.

वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित पक्षकाराचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायाधिश, कौटूंबिक न्यायालयाचे समूपदेशक यांचे समोर सुनावणीच्या तारखे संबंधी आणि पिटीशन संबंधातील अन्य प्रकरणाबाबत निर्देश देतील याची नोंद घ्यावी.

आपणास अशीही सूचना देण्यात येते की, आपणावर निर्देश दिल्याप्रमाणे व्यक्तीगत आपली उपस्थिती दाखल करण्या कामी कसुर केल्यास किंवा वर नमुद केलेल्या दिवशी न्यायाधिशा समोर उपस्थित राहण्यास कसुर केल्यास पिटीशन त्याच दिवशी किंवा कोणत्याही पुढील दिवशी बचाव दिलेला नाही या मथळयाखाली बोर्डावर ठेवण्यात येईल आणि आपण विरुध्द हुकूमनामा किंवा आदेश संमतपात्र राहाल.

मुख्य न्यायाधिश कौटूंबिक न्यायालय, अमरावती यांचे साक्षेने
आज दिनांक १२ जून २०२६ रोजी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सही/-**
**प्र.प्रबंधक**
**कौटूंबिक न्यायालय, अमरावती**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २७५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### सकाळीच पुन्हा लाल परी बंद

आसेगाव पूर्णा बस स्थानकावर सकाळी ७ वाजता अमरावतीकडे जाणारी एमएचएक्यू ६१६५ क्रमांकाची एसटी बस इंजिन गरम झाल्याने बंद पडली. सकाळीच बस बंद पडल्याने प्रवाशांची गैरसोय झाली असून परिवहन महामंडळाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली.

**( छायाचित्र: किशोर मोकलकर, आसेगाव पूर्णा )**

### अधिकमास पर्वावर श्रीमद् भागवत कथा



**कुऱ्हा-**विदर्भातील लाखो भाविक भक्तांचे एकमेव श्रध्दास्थान असलेले श्री महारुद्र मारूती संस्थान श्री क्षेत्र जहांगीरपूर येथे दि. ५ जून २०२६ ते १२ जून २०२६ पर्यंत अधिकमास व पुरुषोतम मास पर्वावर श्रीमद संगीयमय भागवत सप्ताह मोठ्या उत्साहात सुरु असून कृष्णजन्म पर्वावर या श्रीमद् भागवत कथेचे मुख्य यजमान मनोज गोपालदास चांडक व आशा मनोज चांडक यांचे वडील स्व. गोपालदास चांडक आई स्वः पुष्पा चांडक भाऊ स्व.मनमोहन चांडक यांच्या स्मृतीप्रित्यर्थ असून कथा व्यास युवा किर्तनकार भूमिका रविंद्र तिरमारे (मिर्चापूर तरोडा) यांचे अमृतवाणीतून आज चौथ्या दिवशी भगवान श्रीकृष्णाचे प्रगटीकरण (जन्म) त्या ठिकाणी करण्यात आला.भगवान श्री कृष्णाच्या दिव्य स्वरुपाच्या रुपात त्रिवांश चांडक आणि नंदलाला च्या वेशामध्ये मनोज चांडक व यशोदेच्या रुपामध्ये त्यांच्या पली आशा मनोज चांडक यांनी झाकी रूपाने सादरीकरण केले श्री. महारुद्ध मारुती संस्थानमध्ये भगवान श्रीकृष्ण जन्माच्या निमित्ताने हजारो येणाऱ्या भाविकानी श्रीकृष्ण जन्माचा आनंद घेतला.याप्रसंगी संस्थानचे कार्यकारी विश्वस्त मंडळ प्रामुख्याने उपस्थित असतात.



### खेत बचाव अभियान प्रभावीपणे सुरू

**अमरावती-**कृषी विज्ञान केंद्र, दुर्गापूर, आत्मा, अमरावती व कृषी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते ३० जून २०२६ दरम्यान जिल्ह्यात 'खेत बचाव अभियान' राबविण्यात येत आहे. माती परीक्षणावर आधारित संतुलित खत व्यवस्थापन, जैवखते व सेंद्रिय निविष्ठांच्या वापराबाबत शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी १८ हून अधिक गावांमध्ये शेतकरी मेळावे, प्रशिक्षण व प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली आहेत.अभियानांतर्गत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रमात शेतजमिनीचे आरोग्य जपण्यासाठी माती परीक्षण, संतुलित खतांचा वापर, सूक्ष्म अन्नद्रव्यांचे महत्त्व तसेच जैवखते व सेंद्रिय खतांचा वापर वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांकडून या मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून शाश्वत व पर्यावरणपूरक शेतीला चालना देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अंगणवाडी सेविकेचा प्रेरणादायी उपक्रम

## ११ वेळा रक्तदान करून घडवला आदर्श

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

तालुक्यातील दहिगाव रेचा येथील अंगणवाडी सेविका सारिका ज्ञानदेव धामोळे यांनी समाजापुढे एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. चिमुकल्यांना पोषण आहार आणि पूर्व प्राथमिक शिक्षण देण्याची जबाबदारी सांभाळत असतानाच त्यांनी आतापर्यंत ११ वेळा रक्तदान करून माणुसकीचा वसा जपला आहे.देशात रक्ताचा तुटवडा जाणवत असतानाच अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागातील धारणी आणि चिखलदरा हे आदिवासी व दुर्गम तालुके थॅलेसेमिया आणि सिकलसेल या गंभीर आजारांनी ग्रस्त आहेत. या आजारांच्या रुग्णांना वारंवार रक्ताची गरज भासते. ही परिस्थिती लक्षात घेऊन सारिका धामोळे यांनी रक्तदान शिबिरांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवण्यास सुरुवात केली.

रक्तदानासारख्या कार्यात कुटुंबाचा पाठिंबा मोलाचा ठरला. घरातील सर्व सदस्यांनी त्यांना प्रोत्साहन दिले. अंगणवाडी सेविकेचे दैनंदिन कर्तव्य सांभाळून वेळात वेळ काढून त्या रक्तदान शिबिरात जातात. आजच्या



काळात पुरुषांच्या तुलनेत महिला रक्तदात्यांचे प्रमाण कमी आहे. अशा परिस्थितीत सारिका धामोळे यांनी ११ वेळा रक्तदान करून महिलांसाठी एक नवा आदर्श निर्माण केला आहे.सारिका धामोळे यांच्या या कार्याचे तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे. अंगणवाडी सेविका केवळ बालकांचे पोषण आणि शिक्षण सांभाळत नाही, तर सामाजिक बांधिलकी जपत समाजासाठी योगदानही देऊ शकते, हे त्यांनी दाखवून दिले आहे. त्यांच्या या कार्यामुळे इतर महिलांनाही रक्तदानासाठी प्रेरणा मिळत आहे.

मोझरीत जिल्हाधिकाऱ्यांच्या ग्रामसंवादात गाजले

# पांधन रस्ते,वीज समस्या व अवैध दारूविक्रीचे मुद्दे

## नागरिकांनी मांडल्या समस्या व अडचणी

**तिवसा/ वार्ताहर**

नागरिकांना गावपातळीवर येणाऱ्या अडचणी व समस्या सोडवण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सुरू केलेल्या गाव संवाद बैठकीत मोझरी येथील ग्रामस्थांनी पांधन रस्ते,वीज समस्या व अवैध दारू विक्रीसह अनेक मुद्द्यावर आवाज उठविला.यावेळी जिल्हाधिकारी यांनी नागरिकांनी मांडलेल्या समस्या जाणून घेतल्या. यात ० ते ३ वयोगटातील व गरोदर मातांना पुरविण्यात येणारा पोषण आहार हा नित्कृष्ठ दर्जाचा असल्याने त्याची तातडीने चौकशी करून कारवाई करण्याची मागणी सुद्धा जनतेनी केली.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी ११ जून रोजी गावमुक्काम करिता तिवसा तालुक्यातील मोझरी हे गाव निवडले होते.दुपारी ३ वाजता



जिल्हाधिकारी यांनी शिवनगाव फत्तेपुर येथील बचतगटाच्या आईस्क्रीम पार्लर ला भेट देऊन पाहणी केली.त्यानंतर तिवसा येथील शासकीय धान्य गोदाम,नाफेड खरेदी केंद्राला भेटी देऊन तिवसा तहसील कार्यालयात संपूर्ण विभागाचा आढावा बैठकीतून घेतला. येथील चौकात ग्रामस्थांनी संवादाचा कार्यक्रमात महावितरणच्या अडचणी मांडल्या.वारंवार वीज खंडित होण्याची व स्मार्ट मीटरची समस्या मांडली.गुरुकुंज उपसा सिंचन योजनेमध्ये शेतकऱ्यांना हक्काचं पाणी वाया जाते,तीन वर्षांपासून अडचणीचा सामना करत आहे.शेतकऱ्यांनी याच पाण्यावर शेत शिवार हिरवेगार होण्याचं स्वप्न पाहल होत मात्र



जावे लागते असल्याची व्यथा मांडली.रोजगार हमी योजनेत २ वर्षांपासून विहीर तयार आहे पण सोलर च्या अटीमुळे व विजेअभावी सिंचन करू शकत नसल्याची अडचण एका युवा शेतकऱ्याने मांडली.यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर,उपविभागीय अधिकारी दादासाहेब दराडे,तहसीलदार मयुर कळसे,गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे,तालुका कृषी अधिकारी हेमलता इंगळे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.कलंत्री,सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता बोरसे,महावितरणचे उपविभागीय अभियंता निलेश उईके,अप्परवर्धा पाटबंधारे विभागाचे अभियंता सोळंके,नायब तहसिलदार आशिष नागरे,नरेंद्र कुरळकर, अमोल देशमुख,सुरेन्द्र भिवगडे आदी उपस्थित होते.

### संतांच्या भूमीतील अवैध दारूविक्री बंद करावी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची कर्मभूमी असलेल्या गुरुकुंज मोझरी सह जिल्ह्यातील संतांच्या भूमीत मोठ्या प्रमाणात अवैध दारू विक्री सुरू आहे,ज्यामुळे अनेकांचे संसार उध्दस्त होत आहे, तरुणवर्ग व्यसनाधीन होत आहे,याकरिता अवैध दारूविक्रीविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने सरपंच सुरेन्द्र भिवगडे यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे केली.

### आज होणार अप्रत्यक्ष कर कायद्यातील विषेशे चर्चा

**अमरावती-**कर आकारणी क्षेत्रातील एक ज्येष्ठ आणि आदरणीय व्यक्तिमत्व, दिवंगत सीए शरदचंद्र खांडेकर यांच्या स्मरणार्थ १३ जून रोजी अमरावती येथे अप्रत्यक्ष करांवर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले जाईल. कर कायद्याच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान, व्यावसायिक मूल्ये आणि ज्ञानाला आदरांजली म्हणून आयोजित केलेला हा कार्यक्रम, कर व्यावसायिकांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे.

टॅक्स बार असोसिएशन (टॅक्स ॲडव्होकेट्स असोसिएशन), अमरावती द्वारे आयोजित या चर्चासत्राला जीएसटी प्रॅक्टिशनर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई आणि विदर्भ टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशन, नागपूर यांचे सहकार्य लाभले आहे. हा कार्यक्रम राजापेठ येथील आर्ट्स हॉटेलमध्ये सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत होईल. प्रात्यक्षिक न्यायाधिकरण सत्र हे या कार्यक्रमाचे एक प्रमुख आकर्षण असेल.

यामध्ये खऱ्या न्यायालयीन प्रक्रियेच्या धर्तीवर कर विवाद प्रकरणांची सुनावणी, चर्चा आणि कायदेशीर बाबी सादर केल्या जातील. यामुळे सहभागींना कर न्यायालयांचे कामकाज प्रत्यक्षपणे समजून घेण्याची संधी मिळेल.

प्रख्यात कर तज्ञ डॉ. ॲड. शशांक धोंड हे या सेमिनारचे प्रमुख पाहुणे असतील. ॲडव्होकेट पार्थ बढेका, सीए आशित शाह, सीए अशोक चांडक,सीएमए दीपक जोशी, सीए आदित्य खांडेकर, ॲडव्होकेट धनंजय अखारा, ॲडव्होकेट राहुल ठाकर आणि सीए राज खोना विविध तांत्रिक सत्रांना संबोधित करतील.

अ.भा.ग्राहक कल्याण परिषदेच्या राष्ट्रीय बैठकीसाठी

## अमरावती विभागातून २५ पदाधिकारी तुळजापूरकडे रवाना

**अमरावती/ का.प्र.**

अखिल भारतीय ग्राहक कल्याण परिषद, महाराष्ट्र यांच्या वतीने तुळजापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय राज्यस्तरीय आढावा बैठकीसाठी अमरावती विभागातील २५ पदाधिकारी आज बसने तुळजापूरकडे रवाना झाले. ही बैठक १३ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता शासकीय रेस्ट हाऊस, तुळजापूर येथे आयोजित करण्यात आली आहे.

संघटनेचे राष्ट्रीय चेअरमन विख्यात सेनई यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत संघटनात्मक कामकाजाचा आढावा,आगामी उपक्रमांचे नियोजन तसेच ग्राहक हिताच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात येणार आहे.बैठकीस



राष्ट्रीय प्रधान महासचिव देवेंद्र तिवारी, व्हाइस चेअरमन सुरज प्रकाश, वर्किंग चेअरमन तरसेम भारती, डॉ. एम. पी. वर्षा, राष्ट्रीय अध्यक्ष निलेश मिश्रा, राष्ट्रीय सचिव अशोक कल्याणकर, ॲड. अनुजा बाजपेयी, महिला विंगच्या शांता उखळकर, महाराष्ट्र राज्य चेअरमन गजानन मुदगल,राज्य कार्याध्यक्ष निलेश टवलारे तसेच राज्य उपाध्यक्ष बाळासाहेब शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.यावेळी अमरावती येथून राष्ट्रीय, राज्य, अमरावती जिल्हा तसेच महानगर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून या बैठकीसाठी अमरावती विभागातील २५ पदाधिकारी आज बसने तुळजापूरकडे रवाना झाले आहेत. यात देवेंद्र तिवारी, गजानन मुदगल, निलेश टवलारे, महेश पंडित, नंदा राऊत सरिता आरोकार,संजय जाधव, ज्योती होले,रामराव गाडेकर, रेखा वाघमारे, संगीता राहूरकर, नीता डाखोडे, राहुल डाखोडे, दीपक प्रधान, आदित्य तायडे, मयूर बासुंदे, दिव्या नागपूरकर,किरण टवलारे, पंकज टवलारे, प्रभाकरराव वानखडे, राऊत, आरोकार, स्वप्ना उके उपस्थित होते.

विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटरला

## विभागीय आयुक्त नयना गुंडे यांची सदिच्छा भेट

**अमरावती/ का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटरला अमरावती महसूल विभागाच्या विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी नुकतीच सदिच्छा भेट देऊन सेंटरमधील विविध स्टार्टअप उपक्रमांची पाहणी केली. यावेळी कौशल्य, रोजगार व उद्योजकता विभागाचे उपायुक्त द.ल.ठाकरे, उपविभागीय आयुक्त संजय जाधव उपस्थित होते.

या भेटीदरम्यान विभागीय आयुक्तांनी इन्क्युबेशन सेंटरमध्ये कार्यरत विविध स्टार्टअप्सची सविस्तर माहिती घेतली. स्टार्टअप्सची निवड प्रक्रिया, नवउद्योजकांना दिल्या जाणा-या सुविधा, मार्गदर्शन, आर्थिक व तांत्रिक सहाय्य तसेच त्यांच्या विकासासाठी राबविण्यात येणा-या विविध उपक्रमांविषयी त्यांनी




जाणून घेतले. इन्क्युबेशन सेंटरची कार्यपध्दती,स्टार्टअप्स व नवउद्योजकांसाठी राबविण्यात येणा-या योजना तसेच उपलब्ध सुविधांची पाहणी केली.याप्रसंगी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत निवड करण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थींना विभागीय आयुक्तांच्या हस्ते रुजू आदेशांचे वितरण करण्यात आले. विशेष म्हणजे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ हे महाराष्ट्रातील ही योजना प्रभावीपणे राबविणारे पहिले विद्यापीठ ठरले असून, या उपक्रमाद्वारे युवकांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव, कौशल्य विकास आणि रोजगारक्षमतेत वाढ करण्याची संधी उपलब्ध होत आहे. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख तथा संचालक प्रा.स्वाती शेरेकर उपस्थित होत्या. सेंटरचे सीईओ आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरुळकर यांनी मान्यवरांचे स्वागत करून सेंटरच्या कार्याची माहिती दिली. इन्क्युबेशन सेंटरच्या कार्यामुळे उद्योजकता, कौशल्य विकास आणि स्टार्टअप परिसंस्थेला अधिक बळ मिळण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी व्यक्त केला. विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून नवउद्योजकांना सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य प्रभावीपणे सुरू असून अशा भेटींमुळे उद्योग, शिक्षण आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ होण्यास मदत होईल.


विद्यापीठाची उन्हाळी - २०२६ बी.कॉम.सेमि-६

## फायनान्सियल मॅनेजमेंट-३ विषयाची पूनर्परीक्षा १८ जून रोजी

**अमरावती/ का.प्र.**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची उन्हाळी-२०२६ बी.कॉम (अकाऊंटिंग ॲन्ड फायनान्स) सेमिस्टर-६ फायनान्सियल मॅनेजमेंट-३ विषयाची पूनर्परीक्षा दि. १८ जून, २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत घेण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कळविण्यात आले आहे.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाने कळविल्यानुसार, उन्हाळी-२०२६ परीक्षांबाबत प्राप्त तक्रारींवर विद्यापीठ प्राधिकारिणींनी घेतलेल्या निर्णायाच्या अनुषंगाने संबंधित अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांची पूनर्परीक्षा विद्याभारती महाविद्यालय, अमरावती केंद्रावर विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवेशपत्रावर नमूद परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे.यासंदर्भात परीक्षा व



मूल्यमापन मंडळाकडून सर्वसंबंधित महाविद्यालये, प्राचार्य, केंद्राधिकारी, परीक्षा केंद्र यांना पत्राव्दारे कळविण्यात आले असून, फेरपरीक्षेबाबतची तारीख व वेळ विद्यार्थ्यांना कळविण्याची जबाबदारी ही संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची राहील. त्यामुळे सर्वसंबंधितांनी त्यांच्या विभागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर जाणीव करुन द्यावी. काही अडचण असल्यास परीक्षा अधिका-यांशी विद्यापीठ संकेतस्थळावर दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे.

## सीए विद्यार्थी संघ समितीद्वारे नेत्रदान जनजागृती कार्यक्रम

**अमरावती/ का.प्र.**

भारतीय चार्टर्ड अकाउंटंट्स संस्थेच्या अमरावती शाखेच्या विद्यार्थी संघ समितीद्वारे हरिना नेत्रदान समिती (हरिना फाउंडेशन), अमरावती यांच्या सहकार्याने सीए भवन, अमरावती येथे नेत्रदान जनजागृती कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. समाजात नेत्रदानाविषयी जागरूकता वाढवणे आणि युवकांना या पुण्यकार्यात सहभागी करून घेणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

हा कार्यक्रम सीए संदीप सुराणा, अध्यक्ष, विद्यार्थी संघ समिती, अमरावती शाखा यांच्या



नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनात पार पडला.यावेळी ते म्हणाले की, समाजाप्रती जबाबदारी पार पाडणे हे प्रत्येक व्यावसायिकाचे कर्तव्य आहे आणि नेत्रदानासारख्या जनकल्याणकारी विषयांवर जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. उपस्थित विद्यार्थी आणि सदस्यांना हा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्याचे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा.मुकेश लोहिया,सेवानिवृत्त प्राध्यापक, बृजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती होते. त्यांनी नेत्रदानाचे महत्त्व, त्याची प्रक्रिया आणि त्याच्याशी संबंधित विविध पैलूंवर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले काएखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतरही त्याचे डोळे दुसऱ्या व्यक्तीच्या आयुष्यात प्रकाश आणू शकतात.नेत्रदानासंबंधीच्या गैरसमजुती दूर करत त्यांनी उपस्थितांना या महान कार्यासाठी प्रेरित केले.त्यांचा संदेश 'माझ्या जीवनाची शेवटची भेट- राष्ट्राच्या नावे' सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.या कार्यक्रमात चार्टर्ड अकाउंटन्सीच्या विद्यार्थी आणि सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात विद्यार्थी संघ समितीच्या व्यवस्थापकीय समिती सदस्य सीए दिव्या त्रिकोटी, खुशी राजवानी (उपाध्यक्ष), यश खत्री (सचिव), माहेक थरवानी (संयुक्त सचिव) आणि सेजल कपडी (कोषाध्यक्ष) यांचा विशेष सहभाग राहिला.कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी उपस्थित सर्व सहभागींना नेत्रदानाविषयी जागरूकता पसरवण्याचा आणि या मानवीय मोहिमेत सहभागी होण्याचा संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले. हा कार्यक्रम विद्यार्थी संघ समिती अमरावतीची सामाजिक जबाबदारी, जनजागरण आणि मानवसेवेबद्दलची बांधिलकी याचे उत्तम उदाहरण ठरला.

# मोर्शी तालुक्याला गारपिटीचा तडाखा -संत्रा उत्पादक शेतकरी संकटात!

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यात दि.१२ जून रोजी ४:३० वाजताच्या दरम्यान अचानक आलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस व जोरदार गारपिटमुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. आधीच नैसर्गिक संकटे, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारातील अनिश्चिततेचा सामना करणारा





शेतकरी पुन्हा एकदा अडचणीत सापडला आहे.

मोर्शी शहरातील एसटी डेपो लगतच अप्पर वर्धा कॉलनी जाणाऱ्या मार्गावर एकूण सहा विद्युत लाईनचे पोल खालीपर्यंत वाकले. झाडे उन्मळून खाली पडली. काही ☞(पान २ वर)



# कर्तव्य बजावा, अन्यथा मेळघाटात जा...

## -तिवसा उपजिल्हा रुग्णालयाला जिल्हाधिकाऱ्यांची अचानक भेट / -ट्रॉमा केअर युनिटच्या दुरवस्थेवरून झाडाझडती

### -सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्या तक्रारीची दखल

**तिवसा/प्रतिनिधीः-** एकतर प्रामाणिकपणे कर्तव्य बजावा, अन्यथा मेळघाटात जाण्यासाठी तयार रहा , अशा अत्यंत कडक शब्दांत अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी तिवसा उपजिल्हा रुग्णालयातील कामचुकार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कान टोचले. तिवसा उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य सुविधांचा बोजवारा उडाला असल्याच्या तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी रुग्णालयाला अचानक



भेट दिली. यावेळी रुग्णालयातील अव्यवस्था पाहून जिल्हाधिकारी चांगलेच संतापले आणि त्यांनी संपूर्ण प्रशासनाची कसून झाडाझडती घेतली.


अमरावती ते नागपूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले असून, शेकडो नागरिकांना नाहक जीव गमवावा लागला आहे. मात्र, तिवसा उपजिल्हा रुग्णालयात किरकोळ ☞(पान २ वर)

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणारा जेरबंद

### फ्रेजरपूरा पोलिसांची तत्पर कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरात एकटी असलेल्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला फ्रेजरपूरा पोलिसांनी अवघ्या १२ तासांत अटक केली. गंभीर आणि संवेदनशील स्वरूपाच्या या प्रकरणात पोलिसांनी वेगवान तपास करत आरोपीचा शोध घेत त्याला राहटगाव परिसरातून ताब्यात घेतले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व तिचे




पती मजुरीचे काम करतात. १० जून रोजी सकाळी ते दोघेही कामासाठी बाहेर गेले असताना त्यांची अल्पवयीन मुलगी घरी एकटी होती. ☞(पान २ वर)

## तुकाराम मुंढेंच्या आदेशाचा परिणाम...

# शहानूर नदीपात्रात फेकली चिप्सची पाकिटे

### कारवाईची दहशत

**खल्लार/प्रतिनिधीः-** राज्याच्या अन्न व औषधी प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्यानंतर खाद्य पदार्थात भेसळ करणारे व एक्सपायरी तारीख गेल्यावरही माल विकणाऱ्यात भितीचे वातावरण निर्माण झाले. याचे पडसाद शहरी भागाबरोबर आता ग्रामिण भागातही उमटू लागले आहेत. दर्यापूर तालुक्यातील



अमरावती जिल्ह्यात अन्न व औषधी प्रशासना द्वारा हॉटेल संचालकासोबतच खाद्य पदार्थाची गुणवत्ता तपासण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. ही मोहीम पुढेही चालू राहील. खाद्य पदार्थाची गुणवत्ता सोबत वर्तमान पत्राच्या रद्दीत नाश्ता देणाऱ्यावरही लक्ष ठेवल्या जात आहे.

**-विनायक चव्हाण,** सहाय्यक आयुक्त -अन्न व औषधी प्रशासन, अमरावती

येवदा येथिल शहानूर नदी किनारी मोठया प्रमाणात चिप्सचे पाकीट फेकल्याचे आढळून आले. शहानूर नदी पात्रात मोठया संख्येने चिप्सचे पाकीट दिसुन आल्याने या पाकीटांना कुणी आणि कोणत्या कारणाने फेकले ☞(पान २ वर)

# १३ लाखांचा सोयाबीन ट्रक घेऊन चालक गायब

### -आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** कृषी उत्पन्न बाजार समिती येथून खरेदी केलेला १३ लाख रुपये किमतीचे सोयाबीन घेऊन ट्रकचालक फरार झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात व्यापारी मनीष सतीश भट्ट (वय ३७, धामणगाव रेल्वे) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी एमएच २७ यु ०३७५ क्रमांकाच्या ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार व्यापारी मनीष भट्ट यांनी ६ जून रोजी बाजार समिती मधून पाच व्यापाऱ्यांकडून ६५०० रुपये प्रतिक्विंटल च्या दराने २०० क्विंटल सोयाबीन खरेदी केले होते. खरेदी केलेल्या मालाचे पैसे दिल्यानंतर सोयाबीन सोलापूर येथील एका कंपनीला पाठवण्याची व्यवस्था करण्यात आली. यासाठी वलगाव रोड वरील परिवहन कंपनी च्या माध्यमातून ट्रक क्रमांक एमएच २७ यु ०३७५☞(पान २ वर)

# नोएडा येथून आंतरराज्यीय टोळीतील तिघे जेरबंद

## ज्येष्ठ नागरिकाची १३.८७ लाखांची ऑनलाइन फसवणूक

### ३० लाखांच्या कर्जाचे आमिष

**अमरावती/प्रतिनिधीः-** ३० लाख रुपयांचे कर्ज मंजूर झाल्याचे आमिष दाखवून एका ६७ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाची तब्बल १३ लाख ८७ हजार ७०० रुपयांची ऑनलाइन फसवणूक करणाऱ्या आंतरराज्यीय सायबर टोळीचा पर्दाफाश करण्यात अमरावती शहर सायबर पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणी उत्तर प्रदेशातील नोएडा येथून तिघा आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून मोबाईल, बँकिंग साहित्य☞(पान २ वर)

**मोबाईल, बँक कार्डसह साहित्य जप्त**

अटक आरोपींकडून विविध कंपन्यांचे सहा मोबाईल हँडसेट, तीन चेकबुक, ११ डेबिट कार्ड, आधार कार्ड, पॅनकार्ड, पासबुक आदी साहित्य जप्त करण्यात आले. तसेच २६ हजार रुपयांची रक्कम होल्ड करण्यात आली आहे. आरोपी हे सायबर गुन्हे करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचे सदस्य असल्याचे तपासात समोर आले असून त्यांचा पोलीस कोठडी रिमांड घेऊन पुढील तपास सुरू आहे.

# ब्राम्हणवाडा थडी पोलिसांची गुटका वाहतुकीवर कारवाई



### -एक अटकेत, दुसरा आरोपी फरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण पोलीस दलाने अवैध धंद्यांविरोधात सुरू केलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी प्रतिबंधित गुटखा, पान मसाला व सुगंधित तंबाखूची वाहतूक करणाऱ्यांवर धडक कारवाई केली. या कारवाईत ३ लाख ५२ हजार☞(पान २

# राजुरा तलावात बुडालेल्या तरुणाचा मृतदेह आढळला



**अमरावती/प्रतिनिधीः-** काम झाल्यावर घरी जात असताना राजुरा तलावात आंघोळ करण्यासाठी गेलेल्या एका मजूर तरुणाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी रात्री समोर आली होती. अब्दुल वहीद अब्दुल वहाब (वय ३८, ताज☞(पान २ वर)

# विहिरीत पडलेल्या महिलेचे वाचविले प्राण

### महाजनपुरा येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** भातकुली मार्गावर महाजनपुरा येथील पंचीबाई वाडीमध्ये राहणारी एक महिला तोल बिघडल्याने विहिरीत पडली. आपदा विभागाने वेळेवर घटनास्थळी दाखल होऊन महिलेचे प्राण वाचवले. तिला सुखरूप विहिरीतून बाहेर काढण्यात आले. ही घटना आज शुक्रवार १२जूनच्या सकाळी ८ वाजता सुमारास समोर आली आहे.आशा सुरेश दुधे (वय ५८) असे विहिरीत पडलेल्या महिलेचे ☞(पान २ वर)



## परतवाडा अश्लील व्हिडिओ प्रकरण

# मानव सुगंधेला उच्च न्यायालयाकडून जामीन

### -अद्याप एकही पीडित पुढे नाही


**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा पोलीस ठाणे हद्दीत नोंद झालेल्या अश्लील व्हिडिओ व्हायरल प्रकरणात अटक करण्यात आलेल्या २० वर्षीय विद्यार्थी मानव दीपकराव सुगंधे याला नागपूर खंडपीठाने नियमित जामीन मंजूर केला आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणात आतापर्यंत कोणतीही कथित पीडित युवती अथवा अल्पवयीन मुलगी अधिकृतरीत्या पुढे आलेली



नसल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. प्रकरणातील माहितीनुसार, परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २९१/२०२६ दाखल करण्यात आला होता. टेलिग्राम ॲपवर काही युवती व अल्पवयीन मुलींचे आक्षेपार्ह फोटो व व्हिडिओ त्यांच्या संमतीशिवाय प्रसारित करण्यात आल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर भारतीय न्याय संहिता (BNS), पॉक्सो कायदा आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यातील विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.आरोपी मानव सुगंधे☞(पान २ वर)

# वेतनासाठी स्वच्छता कामगारांचे काम बंद

### -कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर विरोधात आक्रमक पवित्रा



**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या बडनेरा झोन क्रमांक चार मध्ये कार्यरत स्वच्छता कामगारांनी आज शुक्रवार १२ जून रोजी तीन महिन्याचे मानधन न मिळाल्याने कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अमरावती मनपाचा स्वच्छतेचा कंत्राट कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड कंपनीकडे आहे. मात्र या कंपनीमार्फत कार्यरत असलेल्या सफाई कर्मचाऱ्यांनी वेतनासह विविध मागण्यासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे. गेल्या गेल्या तीन महिन्यापासून ☞(पान २ वर)

# शहरातील अस्वच्छेतेविरुद्ध शिवसेना उबाठाचा संताप

### अमित शाह, स्मृती इराणी, देवेंद्र फडणवीस यांचा मुखवटा घालून घोषणाबाजी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील मुख्य मार्गावर पसरलेल्या अस्वच्छता व घाणीच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने आज शुक्रवार १२ जून रोजी आक्रोश व्यक्त करण्यात आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, स्मृती इराणी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मुखवटा घालून शिवसैनिकांनी प्रतिकात्मक आंदोलन केले. अमरावती रेल्वे स्टेशन ते डेपो मार्गावरील दुभाजकाला लागून कचरा पडून आहे. वाहनाच्या वर्दळीमुळे रस्त्याला कचरा पसरलेला आहे. घाणीमुळे नागरिकांना मोठी अडचण येत आहे. मनपा प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दुर्गंधी वाढलेली आहे. वाहनांच्या येण्याजाण्यामुळे कचरा इकडे तिकडे पसरत आहे. यासंदर्भात तक्रारी करून ही मनपा प्रशासनाने याकडे लक्ष नाही दिले. तात्काळ☞(पान २ वर)



# उपनिरीक्षकाने गेटमॅनला केली मारहाण

### अमरावती - जबलपूर एक्सप्रेस ४० मिनिटे रखडली

**वरुड/प्रतिनिधीः-** वरूड रोडवरील रेल्वे क्रॉसिंगचे गेट उघडण्याच्या क्षुल्लक कारणावरून एका पोलीस उपनिरीक्षकाने गेटमनला बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या खळबळजनक प्रकारामुळे गुरुवारी अमरावती-जबलपूर एक्स्प्रेस (१२१५९) पांढुर्णा स्थानकावर सुमारे ४० मिनिटे रखडली होती. या घटनेमुळे रेल्वे वर्तुळात आणि प्रवाशांमध्ये संताप व्यक्त होत



आहे. माहिती नुसार, वरुड रोडवरील रेल्वे क्रॉसिंगवर ड्युटीवर असलेल्या गेटमनवर एका पोलीस उपनिरीक्षकाने केवळ गेट लवकर उघडले नाही म्हणून राग काढला. संतप्त झालेल्या या पोलीस☞(पान २ वर)

# अचलपूर विद्युत वितरण कंपनीच्या कार्यकारी अभियंता पदी प्रशांत चौधरी

अचलपूर/प्रतिनिधीः- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अचलपूर विभागात कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत असलेले प्रदीप अंधारे यांच्या स्थानांतरणानंतर त्यांच्या जागी प्रशांत चौधरी यांची कार्यकारी अभियंता पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशांत ☞(पान २ वर)



RB GHODKE INFRA PVT LTD
BASE CAMP,NEAR VILLAGE KODPAKHINDI
TAL-ZARI JAMINI,
DIST-YAVATMAL, Pin-445305